म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क. ५९८



# महाराष्ट्र वैभव

## मार्गदर्शिका

REFBK-0022618

१
जिल्हा
कुलाबा

मुं.प्रवास
२२६१८
३१।३।७९
संदर्भ
५९८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

**सूचना** :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र.मा.प.)



शिवरायाचे आठवावे रूप   शिवरायाचा आठवावा साक्षेप
शिवरायाचा आठवावा प्रताप   भूमंडळी ।।१

RFFBK-0022618

## "महाराष्ट्र वैभव" मासिक

ऐतिहासिक, भौगोलिक, शैक्षणिक, औद्योगिक, राजकीय, व्यापार, शेती, धार्मिक, आध्यात्मिक, पौराणिक, वैदिक, प्रवासिक अशा महत्त्वपूर्ण विचारांचे व साहित्य नाट्यकथा व काव्य यांनी परिपूर्ण भरलेले असे आगळे व वैशिष्ट्यपूर्ण मासिक लवकरच प्रसिद्ध होणार.

□
□
□
□

## महाराष्ट्र वैभव मासिक

**पुरुषार्थ प्रकाशन,**
१३, मिडल् क्लास हौसिंग सोसायटी,
पनवेल, जि. कुलाबा.

---

**लवकरच प्रकाशित होणार !**

### "महाराष्ट्र सहकार वैभव"

[ महाराष्ट्रातील सहकारी कार्याचे विविधांगी दर्शन ]

### "जशास तसे"

[ एक उत्कृष्ट नाटक ]

### "नवजीवन वैभव"

[ आकर्षक, नाविन्यपूर्ण, रोमांचकारक, प्रदीर्घ व महान ध्येयवादी प्रयोग ]

### "अध्यात्म वैभव"

[ या विषयावरील एक वाचनीय पुस्तक ]

महाराष्ट्राची पूण्य भू ही, भारताची शान ।
महाराष्ट्राची आन राखण्या, इथे जन्मले अनेक महान ॥
वीर माता इथे जन्मल्या, प्रसविले वीर महान ।
परंपरेची शान राखण्या, नेते जन्मले पुढील महान ॥

(अपूर्ण)

जगातले सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणजेच "भारत". त्यातला अग्रगण्य प्रांत म्हणजे "महाराष्ट्र" भारतातच काय पण संपूर्ण विश्वात महाराष्ट्राच्या इतिहासाला, भूगोलाला, शिक्षणाला, उद्योगाला, विशेषेकरून राजकारणाला तर आगळे व वैशिष्ट्यपूर्ण असे महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राला इतिहास व भूगोल बदलण्याचे सामर्थ्य आहे ! याला महान परंपरा आहे.

ही महान परंपरा टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी स्वातंत्र्यानंतर ज्या नेत्यांनी प्रयत्न केले त्यांचे निर्भीड कार्यदर्शन.


# " महाराष्ट्र लोकशाही वैभव "

[महाराष्ट्राच्या लोकशाही नेतृत्वाचे व सूत्रधारांचे निर्भीड कार्यदर्शन]

## पुरुषार्थ प्रकाशन पनवेल

लवकरच सादर करीत आहे.



महाराष्ट्र वैभव-पुरुषार्थ प्रकाशन पनवेल तर्फे प्रकाशित झालेल्या प्रकाशनांचे सर्व हक्क प्रकाशिकेकडे राखीव.


कुलाबा जिल्हा
उत्तर
ठा
णे जि ल्हा
पु णे जि ल्हा
सा ता रा जि ल्हा
र त्ना गि री जि ल्हा
नेरे
पनवेल
गव्हाण
उरण
साई
आपटा
कर्जत
कशेळे
वैजनाथ
चौक
खालापूर
खोपोली
होनाड
जांभुळपाडा
पेण
गडब
पोयनाड
अलिबाग
रेवदंडा
नागोठणे
पाली
रोहा
घोसाळे
आंबेवाडी
निजामपूर
इंदापूर
नांदगाव
मुरुड
माणगांव
शिरवली
गोरेगाव
म्हसळा
खामगाव
बोर्ली
जसवली
श्रीवर्धन
महाड
बिरवाडी
जुई
पोलादपूर
दवाखाने
एस्. एस्. पी. सेंटर
१-५-६५ पूर्वी
१-५-६५ नंतर
प्राथमिक आरोग्य केंद्र
लेप्रसी कंट्रोल युनिट
कुटुंब नियोजन केंद्र

'महाराष्ट्र वैभव' 'कुलाबा जिल्हा मार्गदर्शक' प्रकाशनास

## हार्दिक शुभेच्छा.

PIONEER **manufacturers of :-**

- Acetyl Salicylic Acid (Aspirin) I. P.
- Sodium Salicylate. I. P.
- Methyl Salicylate. I. P.
- Salicylic Acid I. P. (Technical)
- Salicylamide N. F.
- P-hydroxy Benzoic Acid.
- Other products : Methyl & Propyl-Esters of P-hydroxy Benzoic Acid, Dioctyl Phthalate, Benzyl Benzoate etc.

# ALTA LABORATORIES PVT. LTD.

KHOPOLI, DIST. KOLABA

TELEPHONE/ **27**

GRAMS : **ALTALABS.**


श्री द्रोणागिरी प्रसन्न
कारंजा वासिनी द्रोणागिरी माते।
सुखी ठेवी तूं सकलां जनांतें ॥

# वैदिक राष्ट्रगीत

यो नो द्वेषत पृथिविः यः पृत न्या धोडा भिदासान्मनसा ।
योवधेनो ते भूमे रन्धय पूर्वकत्वरि ॥

हे मातृभूमे !

जे आमचा द्वेष करतात, जे आमचा नाश व्हावा म्हणून टपून बसले आहेत, जे आम्हास परतंत्र व गुलाम बनवू इच्छितात, जे मनाने सुद्धा आमचे अनिष्ट चिंतितात, त्या आमच्या सर्व शत्रुंना आमच्या हितासाठी नष्ट कर ! !

# सप्रेम सादर

शारीरिक व आर्थिक प्रतिकूल परिस्थितीतूनही, ऐतिहासिक, भौगोलिक, औद्योगिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, या क्षेत्रांतील असलेल्या उद्दिष्टांच्या मानसिक तृप्तीसाठी का होईना, तीव्र तळमळीने हे 'महाराष्ट्र वैभव' मार्गदर्शक प्रकाशीत करून, कुलाबा जिल्ह्यातील ज्या अनेक थोर, निष्ठावंत, ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी आपल्या मगदूराप्रमाणे ग्राम, शहर, जिल्हा व राष्ट्र यांची सेवा केली व करीत आहेत त्यांच्या चरणी कृतज्ञतापूर्वक सादर समर्पण.

विनम्र

व्यवस्थापक

राष्ट्रपती सचिवालय,
राष्ट्रपती भवन,
नई दिल्ली ४.
संख्या 5– आर्. एल्. / 70

President's Secretariat,
Rashtrapati Bhavan,
New Dehli–4
ज्येष्ठ ५, (शके) १८९२
मई, २६, १९७०

प्रिय महोदय,

राष्ट्रपतिजी के नाम भेजे ४ मई १९७० के आपके पत्रसे यह जानकर प्रसन्नता हुयी की, 'महाराष्ट्र वैभव' नामक मासिक गाईड के प्रकाशन का आयोजन किया जा रहा है.

शुभकामनाओ सहित

भवदीय
**खेमराज गुप्त**
राष्ट्रपतिके अपर निजिसचिव

---

क्र. रा. स. २२९१
राजभवन,
मुंबई ३५
१ जून, १९७०

महोदय,

आपले क्रमांक ७।७० दिनांक ८ मे १९७० चे पत्र राज्यपालांना पोचले. 'महाराष्ट्र वैभव' नावाचे मासिक पद्धतीवर गाईड प्रकाशित करीत आहात हे ऐकून त्यांना आनंद झाला.

राज्यपाल आपल्या मासिकास यश इच्छितात.

आपला,
**पी. सुब्रह्मण्यम्**
राज्यपालाचे सचीव

शिक्षण मंत्री
महाराष्ट्र
सचिवालय, मुबई ३२
१९ मे १९७०

आपल्या पुरुषार्थ प्रकाशनातर्फे आपण 'महाराष्ट्र वैभव' नावाची एक मार्गदर्शिका जिल्हा निहाय काढण्याचे योजिले असून ती मासिक पद्धतीवर प्रकाशीत केली जाईल हे वाचून आनंद झाला.

अशा ह्या उपयुक्त उपक्रमात मी आपणास हार्दिक सुयश चिंतितो.

आपला,
**म. ध. चौधरी**

---

Reg No V C.-204

University of Poona
Ganeshkhind-Poona-7
Date मे, १४, १९७०
- सौर वैशाख २४-१८९२

स. न. वि. वि.

आपले दि. ८-७-७० चे पत्र पोचले. आपण 'महाराष्ट्र वैभव' या नावाचे मार्गदर्शक सुरू करणार असल्याचे वाचून आनंद झाला.

आपण लिहिल्याप्रमाणे योग्य प्रकारे ग्रंथरचना झाली तर जनतेला त्याचा खरा उपयोग होईल.

आपल्या ह्या उपक्रमाबद्दल माझे शुभ आशीर्वाद आहेत, कळावे.

आपला,
**दत्तो वामन पोतदार**

Maharashtra Vaibhav, Purushartha Prakashan is publishing a directive guide for the 26 Districts of Maharashtra

The idea is worth encouraging and will also serve the business interests of District industrial projects

Dr. V. S Randive,
M. B B S
Ranade Road, Bombay 28

V S Randive

---

# महाराष्ट्र वैभव

ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक, पौराणिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक, प्रवासिक व इतर सर्वांगीण माहितीपूर्ण मार्गदर्शक.

## जिल्हावार आगामी प्रकाशने–

१. ठाणे
२ रत्नागिरी
३. पुणे
४. सांगली
५. सातारा (उ.)
६. सातारा (द.)
७. सोलापूर
८. कोल्हापूर
९. अहमदनगर
१०. धुळे
११. जळगांव
१२. औरंगाबाद
१३. परभणी
१४. नांदेड
१५. बीड
१६. उस्मानाबाद
१७ नागपूर
१८. अमरावती
१९. वर्धा
२०. यवतमाळ
२१. बुलढाणा
२२. चांदा
२३. अकोला
२४. भंडारा
२५. नासिक व मुंबई महानगर.

यांची माहिती मिळविण्याचे कार्य पूर्ण झाले असून हे भाग प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

व्यवस्थापक,
महाराष्ट्र वैभव – पुरुषार्थ प्रकाशन, १३, मिडल् क्लास हौसिंग सोसायटी पनवेल, जि. कुलाबा.

# संपादकीय

'महाराष्ट्र वैभव' मार्गदर्शक वाचकाच्या हाती आम्ही मोठ्या आनंदाने देत आहो.

गेले कित्येक दिवस या आमच्या मार्गदर्शकाचा खूप गाजावाजा होत आहे—किंवा आम्हीच केला आहे. गेले काही महिने आम्ही त्याकरिता पराकाष्ठेचे श्रम घेत आहोत

नुसती कल्पना उराशी बाळगून, जवळ काहीच माहिती नाही येथपासून सुरुवात होत होत शेवटी 'आता पुरे नको' म्हणण्यापर्यंत सर्व तऱ्हेचे अनुभव घेत घेत आज आम्ही आमच्या योजनेप्रमाणे व आमच्या कल्पनेप्रमाणे चांगला अंक वाचकाच्या हाती मोठ्या समाधानाने देत आहोत.

यात अनेक तऱ्हेच्या उणिवा असल्याची आम्हाला जाणीव आहेच. तरीही वाचकाच्या उंचावलेल्या अपेक्षा हे 'मार्गदर्शक' तृप्त करील अशी रास्त आशा आहे.

जिल्ह्यातल्या ऐतिहासिक, भौगोलिक, शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक, प्रेक्षणीय, स्थलवर्णन यांचे विविधांगी वर्णन तर आहेच, तसेच नामवंत व्यक्तिमत्त्वाचे उल्लेख असून ते वाचल्यावर वाचकाच्या स्मृती उजळल्या जातील. यात जास्तीत जास्त माहिती असून इतर वाटाड्यापेक्षा हे 'मार्गदर्शक' वेगळे आहे.

हे आदर्श व महत्त्वपूर्ण 'मार्गदर्शक' तयार करण्यात आम्हाला अनेकांचे साहाय्य झाले.

प्रथम मानायला पाहिजेत ते सल्लागार व साहाय्यक यांचे आभार. त्याचप्रमाणे या मार्गदर्शकात जाहिरात देऊन सहकार्य करणाऱ्यांचे मन:पूर्वक आभार मानणे कर्तव्यच आहे. या यशस्वितेत त्यांचा फार मोठा वाटा आहे.

सरते शेवटी आमच्या माधव मुद्रणालयाचे श्री. चिंतामणराव जोशी व त्यांच्या कामगारांचे कितीही आभार मानले तरीही त्यांचे कार्य थोरच !

ɸ ɸ ɸ

# आकांक्षा....

वैभव म्हणजेच दारिद्र्याचा नाश !

दारिद्र्याचा नाश झाला की, आपोआप वैभव निर्माण होते.

राष्ट्राला स्वातंत्र्य मिळून २३ वर्षे झाली, विज्ञानाच्या साहाय्याने निसर्गावरसुद्धा विजय मिळविण्याचे कार्य प्रगतीशील आहे. अनेक योजनांतून विधायक विकास-कार्ये घडली व घडत असली तरी आपण अजून दारिद्र्याचा नाश करू शकलो नाहीत.

आज आपले राष्ट्र अल्पशी श्रीमंती व विपुल दारिद्र्य याच्या संघर्षातून व संक्रमणावस्थेतून जात आहे. अशा वेळी विकासाच्या प्रत्येक क्षेत्रातील प्रगतीच्या मार्गावर पसरलेले दारिद्र्य म्हणजे राष्ट्रापुढील एक भयंकर मोठी समस्या आहे.

अनेक वर्षे पारतंत्र्याच्या बेडीने जखडलेला आणि कित्येक शतके परकीय आक्रमणाने पिचून गेलेला आपला भारत ह्या दारिद्र्याच्या पाशात पुरताच गुरफटलेला आहे.

स्वातंत्र्याचे महान् तेजस्वी समर घडले आणि पारतंत्र्याचे पाश तोडून भारत स्वतंत्र झाला.

परंतु दारिद्र्याच्या पाशातून मात्र अजून आपली मुक्तता होऊ शकली नाही.

ते पाश तोडून टाकण्याकरिता अविरत प्रयत्नाची आजही अतिशय आवश्यकता आहे.

अनेक कार्यकर्ते तळमळीने रात्रंदिवस कष्ट करून देशात विकासाच्या अनेक योजना कार्यान्वित करीत आहेत. परंतु व्हावी तशी प्रगती होत नाही.

अन्न, वस्त्र, निवाऱ्यासारखे मूलभूत प्रश्न अजून सुटू शकले नाहीत.

प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयापर्यंत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी शिक्षणाची सोय नाही.

शेतीप्रधान देश असूनही व शेतकऱ्यास जास्तीत जास्त उत्पन्नाचे उत्तेजन व सवलती देऊनही हरित क्रांतीच्या घोषणा असफल झाल्या आहेत.

हातमाग व खादीसारखे लघु उद्योगधंद्याचे प्रमाण कमी होऊ लागले आहे.

स्वस्त घरबांधणी योजना काही विशिष्ट शहरातूनच आढळतात.

मोठमोठ्या उद्योगधंद्याची वाढ विशेषत विशिष्ट शहरातच मर्यादित होत आहे.

प्रत्येक वस्तूंची भाववाढ इतकी विपरीत झाली आहे की, सर्वत्र असंतोष दिसत आहे व एकूण नैराश्याचेच वातावरण देशभर पसरलेले आहे.

जातीयतेबाबत आम्ही प्रगती केली असली तरी उल्लेखनीय खासच नाही.

अशा परिस्थितीत निश्चित गरज काय आहे, त्यासाठी काय केले पाहिजे, ते कसे करायचे व त्यातील कशाचा किती उपयोग करून घ्यावयाचा याचा विचारपूर्वक निर्णय घेणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

भारत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक प्रसंगाना तोंड देऊन २३ वर्षानंतर समाजवादोन्मुख होत आहे. अशा वेळी नवी समाज रचना आवश्यक आहे. त्यासाठी वरील विषयावर विचार करून योग्य प्रकारे कोण कार्य करणार ?

नागरिकांनी विश्वासाने निरनिराळ्या क्षेत्रात निवडून दिलेल्या नेत्यांच्यावरच याची पर्यायाने जबाबदारी येते.

नेता समाज उभवू शकतो, निर्मू शकतो, पण सामान्य नागरिकच पुढारी निर्माण करू शकतो.

नवनिर्मितीच्या या पर्वात नागरिक व पुढारी आपली सत्प्रवृत्ती व सचोटी जितकी अधिक ठेवील तेवढे नवनिर्मितीचे कार्य सुकर होईल.

याला पाचपंचवीस वर्षे लागतीलही, पण पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे याला देशात शांततामय वातावरण व सर्व पक्षांची सहकार्यासाठी समान तत्त्वावर एकजूट व स्थिर मजबूत सरकार असणे अत्यंत आवश्यक आहे.

सुशिक्षित, विचारवंत व बलवान समाज उभारून , प्राप्तीतील विषमता दूर करून, आर्थिक विकासाचा वेग व साधन संपत्ती वाढविण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या किंवा गावच्या अंगी असलेल्या नैसर्गिक व सुप्त शक्तीचा, तज्ञाच्या योग्य सल्ल्याचा व कसबी मनुष्यबळाचा, कोणतेही राजकारण आडवे न आणता, सर्वंकष युद्ध पातळीवरून प्रयत्न केल्यास निश्चितच जनतेचे राहणीमान सुधारून दारिद्र्याचा नाश होईल व वैभव प्राप्त होईल.

हीच ' महाराष्ट्र वैभव ' ची आकांक्षा !

ψψψ

१
कुलाबा



# महाराष्ट्र वैभव

( पुरुषार्थ प्रकाशन, पनवेल )

ऐतिहासिक, भौगोलिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, प्रवासिक, शैक्षणिक, औद्योगिक, व्यापारी व इतर सर्वांगीण माहितीपूर्ण जिल्हानिहाय ' मार्गदर्शक '.


संकलिका : सौ. भाग्यश्री मुदकवी

साहाय्यक : सौ. जयश्री घरत
कु. शोभा मोकाशी

प्रकाशिका : सौ. भाग्यश्री मुदकवी

माहिती विभाग : श्री. जनार्दन घरत

जाहिरात विभाग : श्री. शि. ल. वैद्य

सल्लागार : श्री. विष्णू शेटे

व्यवस्थापक : श्री. वसंत मुदकवी

मुद्रक : श्री. चिंतामण जोशी
माधव प्रिंटिंग प्रेस,
अलिबाग–कुलाबा

महाराष्ट्र वैभव
पुरुषार्थ प्रकाशन
१३, मि क्ला. हौसिंग सोसायटी
पनवेल, जि. कुलाबा.


मूल्य रु ५/-
भा. भ. मुदकवी

## अंतरंग....


◇ १. शुभ संदेश
◇ २. संपादकीय
◇ ३. आकांक्षा
◇ ४ सप्रेम सादर
◇ ५. वैदिक राष्ट्रगीत
◇ ६. कुलाबा जिल्हा
◇ ७. सत्याग्रह
◇ ८. सहकार संस्था
◇ ९ महापुरुष–थोर–विद्वान रत्ने
◇ १० कुलाबा जिल्हा अधिकारी व नेते
◇ ११ अलिबाग
◇ १२. उरण
◇ १३ पनवेल
◇ १४ खालापूर
◇ १५. पेण
◇ १६ रोहा
◇ १७. श्रीवर्धन
◇ १८ सुधागड
◇ १९. मुरुड
◇ २० पोलादपूर
◇ २१ म्हसळा
◇ २२. माणगांव
◇ २३. महाड
◇ २४. कर्जत
◇ २५. समालोचन

२२६७६ प्रवास

# कुलाबा जिल्हा

## सर्वसामान्य माहिती

**हा जिल्हा** एका बाजूने सह्याद्रीच्या तटबंदीने व दुसऱ्या बाजूने अथांग सिंधू सागराने वेढलेला आहे

या भागाला विशेष प्रकारे ऐतिहासिक महत्त्व छत्रपती श्रीशिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत प्राप्त झाले त्या वेळच्या परिस्थितीला आवश्यक व योग्य म्हणून त्यानी राजधानी रायगड किल्ल्यावर ठेवली डोंगरी किल्ल्यांवर त्यानी लक्ष पुरविले त्याचप्रमाणे जलदुर्गांचे महत्व त्यांचे लक्षात आले त्यांच्या काळात पाश्चात्यांचे पाय भारतात पसरण्यास सुरुवात झाली होती त्याची झळ महाराष्ट्रास पण लागत होती मुंबईत इंग्रज, गोव्यात पोर्तुगीज व जंजिरा येथे हबशी ठाण मांडून बसले होते त्यांना शह देण्यास, शक्य तर त्यांना पिटाळून लावण्यास व त्यांच्यापासून आपल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण करण्यास जलदुर्गांची जरूरी आहे, हे त्यानी हेरले होते त्यासाठी त्यानी १६७९ मध्ये 'कुलाबा किल्ला' बांधण्यास सुरुवात केली मात्र तो त्यांचे कारकीर्दीत संपूर्ण पुरा न होता त्यांच्या मृत्युनंतर पुरा झाला मराठी आरमाराचे प्रमुख ठाणे म्हणून ह्या किल्ल्यास मोठे महत्त्व प्राप्त झाले पुढे आंग्रे यांच्या काळातही या किल्ल्याने चांगला नावलौकिक मिळविला

मराठ्यांच्या आरमारी सामर्थ्याचे व कामगिरीचे अभिमानास्पद असे प्रतीक असणारा कुलाबा किल्ला आजही मान ताठ करून विशाल सिंधू सागरात उभा आहे

या कुलाबा किल्ल्यावरूनच या जिल्ह्याचे नाव '**कुलाबा जिल्हा**' असे पडले

मराठ्यांच्या शक्तीचे महान् दर्शन याच कुलाबा जिल्ह्याने जगाला घडविले आहे

या जिल्ह्यात पसरलेल्या सह्याद्रीच्या असंख्य फाटयातून रायगड, कर्नाळा, द्रोणागिरी, सुधागड, अवचितगड, रायगड, इत्यादी डोंगरी किल्ले, समुद्रातला कुलाबा किल्ला आजही महाराष्ट्राच्या पूर्व वैभवाची व शौर्याची साक्ष देत आहेत

उज्वल ऐतिहासिक स्थानाप्रमाणेच या जिल्ह्यातील धार्मिक भक्तिस्थानेही पूर्वीप्रमाणेच आजही महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यांतील भाविक जनांची मने ओढून घेत आहेत घारापुरीचा त्रिमुखी शिव, कनकेश्वर येथील श्रीशंकराचे स्वयंभू स्थान, चौलचे प्रसिद्ध दत्तमंदिर व शितळामातेचे मंदीर, श्रीवर्धनमधील श्रीहरिहरेश्वर मंदिर ही प्राचीन मंदिरे असून मढ व पाली येथील अष्टविनायकात मोडणारी व नांदगाव येथील गणपतींचे प्रसिद्ध मंदिर ही तीर्थस्थाने आजही भाविकांची श्रद्धास्थाने आहेत

प्राचीन भारतीय शिल्पकलेच्या या जिल्ह्यातील कलाकृती, नयनमनोहर सृष्टिसौंदर्याची व थंड हवेची स्थाने, हौशी प्रवाश्यांना व कलावंतांना आजही या जिल्ह्यात आकर्षून घेत आहेत घारापुरीच्या लेण्यातील त्रिमुर्ती, ठाणाळे, कुडे-मांडाळ आणि पाले येथील लेण्यातील कलाकृती भारतीय शिल्पकलेची महती सांगतात, तर महाड तालुक्यातील दासगांव आणि सुधागडमधील पालीजवळचे उन्हेरे येथील सतत वाहणारे गरम पाण्याचे झरे आपल्या गंधकीय जलाने चर्मरोगावरील नैसर्गिक इलाज तर ठरले आहेतच, शिवाय वर्षानुवर्षे त्यातून वाहणारे उष्ण गंधकीय पाणी पाहून त्यात स्नात होणारा सृष्टिकर्त्याच्या अगाध लीलेबद्दल अचंबा व्यक्त करतो

थंड हवेचे व नयनरम्य मनोहारी सृष्टीसौंदर्याचे 'माथेरान' हेही याच जिल्ह्यात आहे

औद्योगिक क्षेत्रात या जिल्ह्यातील तांब्या-पितळेची भांडी व गणपती तयार करण्याचा गृहोद्योग राज्यात प्रसिद्धच आहे पेण येथील चाकू कात्र्याचा कारखाना फार जुना आहे खोपोली येथे पुष्कळ निरनिराळे औद्योगिक कारखाने आहेत पनवेल येथे धूतपापेश्वर आयुर्वेदी कारखाना व उरण येथील हत्यारांना धार लावण्याची विविध प्रकारची ग्राईंडिंग व्हील्स तयार करण्याचे कारखाने प्रसिद्धच आहेत जिल्ह्यात १२० भाताच्या गिरण्या आहेत

भिवपुरी, खोपोली व भीरा येथील विद्युत्पादन केंद्रेही प्रसिद्धच आहेत

औद्योगिक क्षेत्रात जिल्हा मागे असला तरी उत्कर्षाच्या दिशेने सर्वांगीण प्रयत्न होत असून लवकरच हा जिल्हा भरभराटीस येईल अशी चिन्हे आज दिसत आहेत

अलिबाग येथील वेधशाळा जगप्रसिद्धच आहे

हा जिल्हा कोकणपट्टीचाच एक भाग असून संस्थाने विलीन व्हायच्या पूर्वीच्या मुंबई राज्यातील कुलाबा जिल्ह्याचा भाग, पूर्वीच्या भोर संस्थानातील सुधागड महाल, पूर्वीचे जंजिरा संस्थानचे तीन महाल व रत्नागिरी जिल्ह्यातील दोन खेडी यांचा समावेश होऊन झालेला आहे

या जिल्ह्याच्या उत्तरेला ठाणे जिल्हा, दक्षिणेस रत्नागिरी जिल्हा, पूर्वेस पुणे जिल्हा व पश्चिमेस सिंधूसागर आहे जिल्ह्याच्या पश्चिमेला दक्षिणोत्तर सह्याद्रीचे लहान मोठे डोंगर असल्याने कोकणपट्टीचा हा जिल्हा लांब अरुंद पट्टीसारखा पसरलेला आहे दक्षिणोत्तर लांबी सुमारे १०० मैलांची असून पूर्व पश्चिम रुंदी सुमारे ४० मैल आहे उंच पर्वत, खोल दऱ्या आणि भरपूर पाऊस हे या जिल्ह्याचे नैसर्गिक वैशिष्ट्य आहे

या जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ २७१५ चौ मैल असून सर्व भाग डोंगराळ व उताराचा आहे पावसाचे प्रमाण सुमारे २५ इंचापर्यंत आहे जिल्ह्यात १६ नद्या असल्या तरी त्यापैकी सावित्री, कुंडलिका, काळ, अंबा, भोगावती, पाताळगंगा, उल्हास व गांधारी या प्रमुख असून उल्हास, कुंडलिका व पाताळगंगा यांना शेतकऱ्यांची गंगा म्हणतात बाकीच्या पर्जन्य-काळापुरत्याच मर्यादीत असतात

या जिल्ह्यात खनिज संपत्ती विपुल आहे

जिल्ह्यातील एकूण १६,९८,५८० एकर जमिनीपैकी ४०९६८४ एकर जमीन जंगल भाग असून त्यात आंबे, जांभूळ, अन्सा, हिरडा, ऐन,

बेहडा, काकड, वारस, कुबी, उवर, अजनी, किरीमिरी, कुडा, माळे, कुबळ, काटे, पिसा, कोभा, कळकुडा, अटकी, कडुलिंब व डोंगर-उतारावर सागवान, धावडा, बोनदारा, कोशिंबा, बिवळा, खैर, नाना, शिशम, हेद, कळम, सावर, उक्षी, करवद, ध्येयाती, निरगुडी, गुळवेल पळसवेल, गुज, चिलार, कुसारी, कुईली, जुलारी व भुरी ही झाडे फार आहेत ५,४१,१०७ एकर जमीन पिकाखाली आहे त्यापैकी ४,३५,१३५ एकर जमीन अन्नोत्पादन पिकाखाली असून ३०,१४२ एकर जमिनीवर दुबार पिके काढण्यात येतात. बागायत शेती फक्त ५,०५० एकरात आहे सपूर्ण पश्चिम किनारा समुद्रामुळे खाऱ्या जमिनीत मोडतो जिल्ह्यातील ३,२८,००० एकर जमीन भाताखाली असून दरसाल सुमारे अडीच लक्ष टनापर्यंत भाताचे उत्पन्न होते म्हणून महाराष्ट्राचे 'तांदळाचे कोठार' असे सार्थ नाव या जिल्ह्यास मिळाले आहे याशिवाय नाचणी, वरी व कडधान्ये इत्यादी पिकेही होतात

जिल्ह्यात नारळ सुपारीची आगरे प्रख्यात असून 'श्रीवर्धनी रोठा सुपारी' भारतात प्रसिद्ध आहे

शिवाय मच्छिमारी, कोळसा पाडणे, इमारती लाकूड व मीठ तयार करणे हे उद्योगही चालतात

पेण, पनवेल व उरणचे मीठ प्रख्यात आहे दरवर्षी ४० लाख टन मीठ तयार होत असते

कर्जत व खोपोली येथे प्रख्यात शेतकी सशोधन केंद्रे आहेत

रेवस, धरमतर, श्रीवर्धन आणि जजिरा ही जिल्ह्यातील मोठी बदरे आहेत

मोरा हे उरणपासून २॥ मैलावर असून मोऱ्यापासून घारापुरी तीन मैल आहे

जिल्ह्याची लोकसख्या सुमारे ११॥ लाख असून त्यात आदिवासी सुमारे एक लाख व सुमारे ७५००० हरिजन व इतर आहेत.

जिल्ह्याचे एकूण १४ तालुके आहेत त्यात १७७६ खेडी, १२ शहरे व १० नगरपालिका असून ५१४ ग्रामपचायती आहेत

जिल्ह्यात अलिबाग, माथेरान, महाड, पनवेल, पेण, रोहा, मुरुड, उरण, श्रीवर्धन व नवखोपोली या गावी नगरपालिका आहेत

जिल्ह्यात ९४ टक्के लोक मराठी भाषा, ४॥ टक्के लोक उर्दू भाषा व बाकी १॥ टक्के लोक इतर भाषा बोलणारे आहेत

जिल्ह्यातील पहिले साप्ताहिक १८७० साली सत्यसदन नावाचे सुरू झाले त्यानतर अनेक आणखी साप्ताहिके सुरू झाली व तशीच बद पण झाली सध्या जिल्ह्यात कुलाबा समाचार, राष्ट्रतेज, नव-कृषीवल, निर्धार, प्रज्ञा व किल्लेरायगड ही साप्ताहिके आहेत

विविध तऱ्हेच्या कार्यात वेगवेगळ्या सुमारे एक हजार सहकारी सस्था कार्य करीत आहेत शिवाय जिल्हा व तालुका विकास मडळे पण आहेत जिल्ह्याचा सपूर्ण भाग विकासयोजना क्षेत्रात आहे सर्वोदय व ग्रामराज्य योजनाचे पण कार्य या जिल्ह्यात आहे सहकारी क्षेत्रात कुलाबा जिल्ह्यात पहिली सस्था १९१० साली दहिवली, ता कर्जत येथे सुरू झाली

नैसर्गिक हवामानानुसार या जिल्ह्यातील एकूण ११,५७,८५० पशुधनात गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, घोडे, कोंबड्या यांचा प्रामुख्याने समावेश होतो

जिल्ह्यात आग्री व कोळी समाजामध्ये कोळीनृत्य प्रसिद्ध आहे प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतही एस् टी सर्व्हिसेसनी आपल्या मार्गाचे जाळे जिल्ह्यात चागले पसरले आहे

राज्यात शिक्षण खात्याने १९५४-५५ साली १०० व्या वर्षात पदार्पण केले. त्यानतर शिक्षण खात्यात जुन्या परपरा मोडून ज्या काही जागतिक व राष्ट्रीय पातळीवर क्रांतीकारक (सक्तीचे व मोफत) सुधारणा झाल्या त्याच्या परिणामानेच या जिल्ह्यात देखील शैक्षणिक प्रगती चागलीच होत आहे

जिल्ह्यातील प्राथमिक शाळा सन १८४० मध्ये महाडला, १८५६ मध्ये नागोठणा, १८६१ मध्ये अलिबाग येथे स्थापन झाल्या पहिली मुलीची शाळा १८६१ मध्ये अलिबाग येथे सुरू झाली आज जिल्ह्यात २३ मुलीच्या शाळा आहेत

१८७९ साली रोहा, अलिबाग, महाड व पेण येथे इग्रजी शाळा सुरू करण्याचा प्रयत्न झाला परतु पुरेसे विद्यार्थी न मिळाल्याने बद कराव्या लागल्या परतू अलिबाग येथील मिशन हायस्कूल मात्र चालू राहिले

जिल्ह्यात सुमारे १,४२५ शैक्षणिक सस्थांतून सुमारे ३,५०,००० विद्यार्थ्यांस शिक्षण दिले जात आहे

जिल्ह्यात अलिबाग, महाड व पनवेल येथे प्रत्येकी एक अशी एकूण तीन महाविद्यालये आहेत त्यात साहित्य, वाणिज्य व विज्ञान या शाखा असून ही महाविद्यालये पुणे विद्यापिठाशी सलग्न आहेत जिल्ह्यात २०० लोकवस्तीचे शाळा नसलेले एकही खेडे नाही जिल्ह्यात मुलोद्योग शिक्षण, तात्रिक शिक्षण, प्रशिक्षण व प्रौढशिक्षण याची सोय आहे

राष्ट्रीय शिस्त योजना प्रत्येक शाळेत असून, वैद्यकीय तपासणी पण होते

जिल्ह्यात बालवाड्या व सस्कार केंद्रेही आहेत

जिल्ह्यातील पहिले वाचनालय १८६६ साली अलिबाग येथे सुरू झाले व त्याच साली दुसरे पेणला सुरू झाले जिल्ह्यात सध्या लहान मोठी धरून ८० वाचनालये आहेत

जिल्ह्यात विश्रामस्थाने, इन्स्पेक्शन बगले व निवासस्थाने बहुतेक ठिकाणी आहेत अगाऊ परवानगीने त्यात उतरण्याची सोय होते

शेतकरी कामकरी पक्षाचे कार्य या जिल्ह्यात जोरदार असून येथील जिल्हा परिषदेत सध्या त्याचे बहुमत आहे त्या खालोखाल काँग्रेस पक्षाचे कार्य असून, जनसघाचे व हिंदुमहासभेचे कार्य पण चांगले आहे प्रजासमाजवादी पक्षाचे साधारणच आहे

काही बाबतीत हा जिल्हा जरी मागे होता तरी, छत्रपतींच्या व आंग्र्यांच्या सिद्दी व इतर परदेशीय लोकांच्या काळातल्या धडामोडी-मुळे निदान राजकारणात तरी आघाडीवर राहिला जिल्ह्यातील सर्व-साधारण व्यक्ती पण जागृत आहे असे म्हणावे लागेल

मुबईसारख्या औद्योगिक महानगरापासून हा जिल्हा समुद्र व रस्त्याच्या मार्गानें अगदी जवळ असल्याने, औद्योगिक क्षेत्राच्या वाढीला येथे योग्य वाव असून भावी भवितव्याच्या दृष्टीने या जिल्ह्याचे भवितव्य उज्वलच आहे

असा आहे हा कुलाबा जिल्हा!

# सत्याग्रह

घटनाकार डॉ आबेडकर यानी महाड येथे १९२७ साली त्याच्या अनुयायांबरोबर सत्याग्रह करून तेथील सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी सर्वांनाच खुले केले व हिंदू धर्माच्या सनातन रूढीच्या प्रतिकारार्थ, निषेधात्मक कार्य समजून मनुस्मृती जाळली

१९२७ मध्येच महाडला डॉ आबेडकरानी अस्पृश्याची पहिली सभा घेतली व तेथूनच त्यांच्या राजकीय जीवनाला सुरुवात झाली

उरणपासून जवळच असलेल्या चिरनेरच्या आक्कादेवीच्या डोगरात महात्मा गांधीच्या प्रेरणेने दि २५-९-३० रोजी भारताचा इतिहासप्रसिद्ध चिरनेरचा राजकीय जगल सत्याग्रह झाला त्यात १२ हुतात्मे झाले तेथे त्याच्या स्मृतिस्तंव हुतात्मा स्मारक स्तभ उभारण्यात आला

गोवा सत्याग्रहात हुतात्मा झालेले हिरवे गुरुजी पनवेलचे व शेषनाथ वाडेकर हे अलिबाग तालुक्यातील रेवदडा येथील होते १९४२ च्या राजकीय क्रान्तीत महाडचे श्री वसत दाते व माथेरानचे श्री कोतवाल यानाही हौतात्म्य पत्करावे लागले

# कुलाबा जिल्हा : सहकारी-संस्था

कुलाबा जिल्ह्यात जिल्हा पातळीवरील सहकारी सस्था, नोकर लोकाच्या सहकारी मडळ्या, विविध उद्देशी सोसायट्या, अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका, सहकारी भात गिरण्या, विविध कार्यकारी सस्था, जगल कामगार सोसायट्या, मजूर कामगार सहकारी सस्था, कुलाबा जिल्हा प्राथमिक सहकारी भांडारे, तालुका खरेदी विक्री सघ, मच्छीमार सहकारी सस्था, तालुका सुपरवायझिंग युनियन्स, सहकारी घरबाधणी सस्था अशा विविध सहकारी क्षेत्रात सुमारे १ हजार सस्था कार्य करीत आहेत

कुलाबा जिल्ह्यात सहकाराची जी आज प्रगती दिसते त्या प्रगतीस जिल्ह्यातील सहकारी कार्यकर्त्यांचे परिश्रम कारणीभूत ठरले आहेत त्यातील काही प्रमुख व्यक्ती पुढीलप्रमाणे (१) कै हिरू महादू म्हात्रे (वाशी), (२) श्री बाबूराव भागवत (पेण), (३) डॉ आर आर म्हात्रे (झिराड), (४) श्री गगाधरपत ओक (महाड), (५) कै गोविंद चिमणाजी व गोपाळ चिमणाजी भाटे (रोहा), (६) कै पितांबर, भाई मेहता महाड (७) श्री मदनशेट आटवणे (पनवेल), (८) तात्यासाहेब सुगवेकर (नेरळ), (९) श्री केशवराव लिमये (पाली), (१०) श्री भाऊसाहेब नेने (पेण), (११) श्री नानासाहेब बेडेकर (आपटे), १२) श्री र भि. मोरे (चिचवली शेकीन), श्री हुसेन महमद वागारे (मुरुड), (१४) श्री मामासाहेब कोठारी (पेण) (१५) श्री शाताराम फिलसे (महाड), (१६) श्री बी आर वाडकर (महाड), (१७) श्री अण्णासाहेब धारकर (पेण)- (१८) श्री ल ये घरत (अलिबाग), (१९) श्री श्यामसुदर शेट (गोरेगाव), (२०) श्री. भाई सुळे (माणगाव), (२१) श्री चिंतामणराव जोशी (अलिबाग)

## कुलाबा जिल्हा मुद्रक संघ

मार्च १९५५ मध्ये महाराष्ट्र मुद्रण परिषदेचे त्या वेळचे सरचिटणीस श्री वसतराव देवकुळे याचे प्रेरणेने व कुलाबा जिल्ह्यातील एक प्रसिद्ध मुद्रक श्री चितामणराव जोशी याच्या प्रयत्नाने कुलाबा जिल्हा मुद्रक सघाची स्थापना झाली कै नारायण नागू पाटील हे पहिले अध्यक्ष होते जिल्ह्यात आज ४५ मुद्रणालये असून अलिबाग व पनवेल येथे हा व्यवसाय प्रगत अवस्थेत आहे

## कोकण एज्युकेशन सोसायटी

कुलाबा जिल्ह्यात सर्वश्री रानडे, टिल्लू, आठवले, घाटे वगैरे महत्त्वाकांक्षी व स्वार्थत्यागी पदवीधरांनी जिल्ह्यात माध्यमिक शिक्षणाचा प्रचार करण्याच्या प्रखर व उच्च ध्येयाने प्रेरित होऊन सन १९१७ साली रोहे येथे ही सस्था स्थापन केली व ठिकठिकाणच्या पुढाऱ्याची सहानुभुती मिळवून अनेक ठिकाणी विद्यालयाची स्थापना केली सस्थेने चागली प्रगती केली असून जिल्ह्यात सस्थेच्या २३ शाळा असून त्यात ३ मुलीच्या स्वतत्र आहेत १९६० सालापासून सगीत, नृत्य व चित्रकला हे विषयही पेण व पनवेल येथे सुरू झाले आहेत सस्थेने १९४४ साली डॉ राधाकृष्णन् याचे अध्यक्षतेखाली रौप्य महोत्सव उत्साहाने साजरा केला होता व १९६७ साली डॉ कोठारी याचे अध्यक्षतेखाली सुवर्णमहोत्सवही साजरा झाला श्री. नानासाहेब मेहेंदळे रोहा व श्री तुळशीदास शेट अलिबाग हे अनुक्रमे अध्यक्ष व कार्याध्यक्ष आहेत या सस्थेच्या अलिबाग व पनवेल केंद्रात मुद्रण कलेचे शास्त्रीय शिक्षण दिले जाते जिल्ह्यातील ही एक आदर्श शिक्षण सस्था आहे

## जनता शिक्षण मंडळ

सन १९६१ मध्ये अलिबाग येथे जनता शिक्षण मडळ या सस्थेने गरीब व मध्यम वर्गीय विद्यार्थ्यांच्यासाठी वसतीगृहयुक्त असे जे एस् एम् नावाचे महाविद्यालय सुरू केले त्यात साहित्य, विज्ञान व वाणिज्य शाखा असून हे महाविद्यालय पुणे विद्यापिठाशी सलग्न आहे

## डॉ. आंबेडकर मेमोरियल कमिटी

कै डॉ आबेडकर याच्या स्मृत्यर्थ, डॉ आबेडकर मेमोरियल कमेटीने वर्गणी गोळा करून व महान् प्रयत्नाने १९६१ साली महाडला महाविद्यालय सुरू केले महाविद्यालयाची स्वतंत्र इमारत आहे त्यात ज्ञान, विज्ञान व वाणिज्य शाखा असून हे महाविद्यालय पुणे विद्यापिठाशी सलग्न आहे

## रयत शिक्षण संस्था

स्व पद्मभूषण कर्मवीर डॉ भाऊराव पाटील याच्यासारख्या कर्मवीराची तपश्चर्या व सस्थेच्या कर्तव्यनिष्ठ सेवकाचा त्याग व महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे अपार प्रेमरूपी भव्य व्यासपीठ लाभलेल्या साताऱ्याच्या रयत शिक्षण सस्थेतर्फे या जिल्ह्यात १४ माध्यमिक विद्यालये असून, पनवेल येथे साहित्य, विज्ञान व वाणिज्य शाखायुक्त असे नुकतेच सुरू झालेले महाविद्यालय पण आहे

## शैक्षणिक इतर संस्था

अभिनव ज्ञान मदिर कर्जत शिक्षण प्रसारक मडळ अलिबाग व पेण

*With Best Compliments*
*From :*

**M. A. I. D. C.**
**H. O.** Phone 458211
Rajan House
3rd Floor, Charni Galli
Prabhadevi, Bombay-25 D D.

**RASAYANI**
Taluka Panvel, Dist Kolaba

Well Wishes
From

Fertilizer Corporation
Of India
" Trombay Unit "
Bombay-74

**आता एसटी वाहतूक ८८ टक्के ग्रामीण जनतेला आठ किलोमीटरच्या टप्प्यात**



महाराष्ट्र राज्यात ९५ टक्के रस्ते वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण झाले असून आता एसटी वाहतूक ८८ टक्के ग्रामीण जनतेला आठ किलोमीटरच्या टप्प्यात आली आहे. राष्ट्रीयीकरणानतर प्रवासी जनतेला उपलब्ध झालेल्या सुखसोयी व एसटी कर्मचाऱ्याना मिळालेले फायदे अभूतपूर्व असे आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ५,६८१ वसगाड्या निरनिराळ्या ५,०५१ प्रवासमार्गांवर दररोज १५ लाख उतारूंची ने-आण करीत असतात. हे महामंडळ देशातील राष्ट्रीयीकृत रस्ते वाहतूक संस्थामध्ये सर्वात मोठी संस्था गणली जाते.

**एसटी म्हणजेच 'प्रवाशांची सेवा'**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
महाराष्ट्र वाहतूक भवन, बेलासिस मार्ग, मुंबई ८

एज्युकेशन सोसायटी या संस्थासुद्धा चांगल्या कार्य करीत आहेत जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुटतर्फे उरणला एक प्रसिद्ध विद्यालय चालते

# महापुरुष – थोर-विद्वान रत्ने

## छत्रपती श्रीशिवाजी महाराज

जन्म १९–२–१६३० शिवनेरी, मृत्यु ३–४–१६८० रायगड

शहाजी राजाकडून सरजाम, जिजामातेकडून धर्मकारण, दादोजी कोंडदेवांकडून व्यवहारकारण, तुकारामाकडून परमार्थसाधन व रामदासांकडून राजकारण, या बीजाचे सुफलाम मनोभूमीवर आरोहण झाले, ती बिजे वृद्धिंगत झाली, फोफावली आणि त्यामुळेच बाणेदार अशा महाराष्ट्राचे आराध्यदैवत, उत्साही व कर्मयोगी असे महाराष्ट्राचे अखंड स्फूर्ती स्त्रोत्र, स्वाभिमानी, तडफदार अशी महाराष्ट्राची मूर्तीमत अस्मिता, छत्रपती श्रीशिवाजी महाराज, समर्थ महापुरुष झाले मंगलमय महाराष्ट्रात जे अद्वितीय महापुरुष होऊन गेले त्यात श्रीशिवाजी महाराज अग्रगण्य होत

अनुकरणीय शासक आणि सेनानायक, एक आदर्श सद्‌गृहस्थ आणि अद्वितीय राष्ट्रनिर्माता, महान् सदाचारी आणि कुशल राजनितीज्ञ, धर्मप्रसारक आणि धर्मरक्षक असे आदर्श व दुर्लभ गुण त्याचे अंगी होते

छत्रपतींनी प्रतिकूल परिस्थितीत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्यांनी महाराष्ट्राला सिंहासन दिले, कणा दिला व महा-राष्ट्र बनवून त्यात सुराज्य निर्माण केले

राजधानी रायगड किल्ल्यावर होती

त्याची समाधी रायगडावरच आहे

## सेना सरखेल कान्होजी आंग्रे

महाराष्ट्राच्या अत्यंत कठीण काळात ज्याच्या आधिपत्याखाली मराठ्यांच्या आरमाराने ' समुद्राची राणी ' म्हणून गाजणाऱ्या इंग्रजांनाही जबरदस्त धडाका देऊन धास्ती बसविली व सागरावरच्या सर्व सत्तांना ' आम्ही सिंधूसागराचे मालक आहोत, आमची परवानगी दस्तक घेऊन सागर संचार करा ' असा ठणठणीत इशारा दिला व कार्यपूर्तीसाठी त्यांच्याशी संग्राम दिला अशा आरमाराचे प्रमुख, देश, धर्म व संस्कृतीला संभाळणारे, मराठ्यांच्या इतिहासातील सागर व समर झुंझार वीर, सेना सरखेल कान्होजी आंग्रे यांच्यामुळेच कुलाबा किल्ला जगप्रसिद्ध झाला

## आचार्य विनोबा भावे--एक ज्ञानमूर्ती

जन्म ११–९–१८९५

अंतरिक्षातील सत्तावीस नक्षत्राच्या विभूषीत मेखलेत अतुल प्रकाशाने तळपणाऱ्या मृग नक्षत्राशी स्पर्धा करू शकणारा एक तारा कुलाबा जिल्ह्याच्या नभोमंडळात प्रकाशला आणि गागोदे या गावी मानवरूपी अवतीर्ण होऊन ' जयजगत ' व ' सब भूमी गोपालकी ' या सर्वोदयी विचारांनी त्याने आधुनिक भारताचे पुनरुज्जीवन केले भूदान चळवळ सुरू करून संबध भारताच्या सर्वांगीण पुनरुत्थानास कारणीभूत झालेले, महामानव संतश्रेष्ठ आचार्य विनोबा भावे, यांची कर्मभूमी भारतभर असली तरी जन्म गागोदे येथील जिल्हा कुलाब्यातलाच

भूदान चळवळीचे यशापयश अजून ठरायचे आहे पण त्यांच्या या चळवळीने कायदा किंवा सैन्य जे करू शकत नाही ते केले, हे मान्य करावयास हवे जमिनीवरचा हक्क सोडावयाची प्रवृत्ती जमीन मालकामध्ये निर्माण करण्यातच त्यांच्या प्रतिभेचे महत्त्व आहे राष्ट्रातील जमीन फेरवाटपाचा मार्ग त्यांनी सिद्ध केला आहे

ज्ञान, कर्म व भक्ती या चालत्याबोलत्या विद्यापीठाचे ते आचार्यच होत

## नानासाहेब पेशवे

१८५७ च्या महान् स्वातंत्र्य युद्धाचे सरसेनापती नानासाहेब पेशवे (वेणगाव) कर्जतचेच होत

## हुतात्मा वासुदेव बळवंत फडके

जन्म ४ नोव्हेंबर १८४५ शिरढोण, ता. पनवेल

१८५७ च्या स्वातंत्र्य युद्धानंतर ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरुद्ध सुशिक्षित समाजाला ते एकत्र आणू बघत होते त्यासाठी पुणे कोर्टातील नोकरी सोडून दिली व देशभर प्रवास केला त्यांना पैशाची मदत मागूनही कोणीही केली नाही तेव्हा सशस्त्र दरोडे घालून त्यांनी स्वातंत्र्य लढ्यासाठी पैसा जमविला व हतवीर्य बनलेल्या लोकांना स्वातंत्र्य प्रेमाने उचंबळविले व त्यांना पुन्हा सज्ज करून ब्रिटिश सत्तेला हादरून सोडले शेवटी फितुरीने दगा दिल्यामुळे हे गाणगापुरात पकडले गेले एडन येथे जन्मठेप भोगत असतानाच परलोकवासी झाले स्वातंत्र्याची विझू लागलेली ज्योत त्यांनी आत्मबलिदानाने तेवत ठेवली

शिरढोण येथे त्यांचे स्मृतिमंदिर आहे

## कै. श्रीमंत सरदार परशराम कृष्ण बिवलकर

इतिहासप्रसिद्ध आंग्रे यांच्या घराण्याचे मुख्य कारभारी बिवलकर होत अलिबागजवळ वेश्वी येथे ते राहात असत ते मोठे परोपकारी व उदार वृत्तीचे होते शेतकऱ्यांची गरिबी नष्ट होऊन त्यांचे जीवन सुखी व्हावे म्हणून त्यांनी फार प्रयत्न केला व त्याकरिता त्यांनी सहकारी चळवळीचा खेड्यातून प्रसार केला याच तळमळीने त्यांनी ' विलिंग्डन शेतकरी शाळा ' काढली पण पुढे ही शाळा बंद पडली त्यांनी सहकारी तत्त्वावर दुग्धालय पण चालविले होते त्यांना सरकारने ' कैसर– इ– हिंद ' हे सुवर्णपदक दिले होते जिल्ह्यातील अनेक संस्थांशी त्यांचा संबंध होता

## कै. तपस्वी रामजी लक्ष्मण घरत

यांचा जन्म आवास येथे सन १८५३ मध्ये झाला पेशाने शिक्षक. कुलाबा जिल्ह्याच्या जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर प्रसिद्ध वर्तमानपत्रातून त्यांनी निर्भिड लेख लिहिले जिल्ह्यातील सर्वांगीण चळवळीशी त्यांचा जवळचा संबंध होता निर्व्यसनी, साधी राहणी होती वयाच्या ९६ व्या वर्षी ते सासवने येथे मृत्यु पावले

## कै. गोविंद चिमणाजी भाटे

हे मूळचे बोरवाडी (ता माणगाव) येथील राहणारे. पुढे

महाडला स्थायिक झाले एम् ए ची परिक्षा पहिल्या वर्गात पास झाल्याने त्याना सुवर्णपदक मिळाले होते डे ए सोसायटीचे आजीव सदस्य सागलीच्या विलिंग्डन कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते ते आगरकर मतवादी होते मिश्र पुनर्विवाह केल्याने त्याना सनातनी समाजाचा फारच जाच सहन करावा लागला त्यानी अनेक प्रवास वर्णने प्रसिद्ध केली आहेत प्रेम की लौकिक, समर्थ रामदास, कार्लाईल, हिंदू चाली-रीती इत्यादी त्याची पुस्तके प्रसिद्ध आहेत

## कै. आत्माराम महादेव आटवणे

जन्म ११-४-१८८५, मृत्यू ५-४-४४ पनवेलीतील दानशूर व प्रसिद्ध जमीनदार, व्यापारी व पेढीवाले लहानपणापासून व्यायामाचा नाद चागले कुस्तीगिर होते शेती व बागायतीची आवड होती ते शेतीसबधी नेहमी निरनिराळे प्रयोग करीत असत पनवेल म्युनिसि-पालिटीचे अनेक वर्षे ते अध्यक्ष होते काँग्रेस पक्षाचे जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्ते होते १९३६ मध्ये मुबई कौन्सिलचे सभासद. सत्या-ग्रहाच्या चळवळीत १९४१ मध्ये भाग घेतला होता

## कै. महादेव बजाजी वीरकर B A, LL. B

महाड शहरात आपल्या बुद्धिवैभवाने व कर्तृत्वाने अनेक प्रकारची सार्वजनिक कामे केली अनेक सस्थांचे त्याचे निकटवर्ती सबध होते डिस्ट्रिक्ट बोर्डाचे काही वर्षे ते सभासद होते महाड म्युनिसीपालिटीचे पहिले अध्यक्ष सन १९३७ मध्ये मुबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद

## कै. श्रीपाद बाबाजी ठाकूर

हे सन १८६८ मध्ये बी ए झालेले कुलाबा जिल्ह्यातील पहिले ग्रॅज्युएट होत परदेशागमन निषिद्ध मानले जात असल्याच्या काळात इग्लडात जाऊन इडियन सिव्हिल सर्व्हिसेसची परीक्षा देणारे पहिले धाडशी गृहस्थ, पेणचे रहिवासी होत

## कै. आर्. एन्. मंडलिक

कै रामभाऊ मडलीक कुलाबा समाचार या साप्ताहिकाचे निर्भिड सपादक व सस्थापक त्याच्या बेडर, सत्य व निस्वार्थ कृतीमुळे ते लोकप्रिय व आदरणीय होते प्रतिपक्षात त्याचा चांगलाच दरारा होता धार्मिक वृत्तीचे व स्थितप्रज्ञ असे जिल्ह्यातील झुजार देशभक्त

## कै. राम गणेश गडकरी १८८५–१९१९

प्रसिद्ध नाटककार व मराठी वाङ्मयातील प्रति कालीदास म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो ते कै राम गणेश गडकरी याचे प्राथमिक शिक्षण कर्जतला झाले तेथील आबराईत बसून त्यानी बरेच लिखाण केले आहे एकच प्याला, भावबधन, पुण्यप्रभाव ही नाटके वाङ्मयीन दृष्ट्या अमर ठरली आहेत

## कै. डॉ. ना. भा. खरे

कै डॉ. नारायण भास्कर खरे, पनवेल तालुक्यात नेरे या गावी १६ मार्च १८८२ साली मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुबात जन्म पुरीच्या शकराचार्यांकडून शिक्षण पजाब विश्वविद्यालयातून १९०७ साली एम् बी बी एस् व याच विश्वविद्यालयाचे पहिले एम् डी १९१३ मध्यप्रदेश कौन्सिलचे व व्हॉईसरॉयच्या कौन्सिलचे सभासद असताना बरीच मोलाची कामगिरी केली होती प्रथम काँग्रेसचे थोर नेते होते पण महात्मा गाधीशी व सरदार पटेलाशी न पटल्याने काँग्रेस् सोडली हिंदुमहासभेत प्रवेश १९४९ कलकत्ता, १९५० पुणे व १९५१ जयपूर असे हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष शेवटपर्यंत लोकसभेचे हिंदुमहासभेचे सभासद होते उच्च चारित्र्य, निर्भिड वक्ता, व परखड विचाराचा महान् नेता

## श्री. चिंतामणराव देशमुख

आतरराष्ट्रीय कीर्तीचे महान विद्वान व थोर अर्थतज्ञ व भारताचे माजी अर्थमत्री श्री चिंतामणराव देशमुख हे रोहचाचे आहेत भारताचे अर्थमत्री म्हणून आणि प्लॅनिंग कमिशनचे उपाध्यक्ष म्हणून त्याचे कार्य महत्त्वाचे ठरते सयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर त्यानी अर्थ-मत्रीपदाचा राजीनामा दिला, त्यावेळी त्यानी ससदेत केलेले भाषण अजरामर व्हावे इतके रामशास्त्री बाण्याचे आहे अशा या जागतिक कीर्तीच्या या जिल्ह्याच्या या सुपुत्राने आपल्या वयाचे पाऊण शतक नुकतेच उलटले आहे

## श्री. द. वा. पोतदार

स्वदेशी बाणा, राष्ट्रीय वृत्ती, भारतीय इतिहासाची नितात आवड, वैदिक सस्कृतीचा अभिमान, चतुरस्र विद्वत्ता, अमोघ वक्तृत्व, असामान्य कर्तृत्वाचा महान् सगम, आमरण ब्रह्मचारी, इतिहासतज्ञ म्हणजेच महामहोपाध्याय डॉ श्री दत्तो वामन पोतदार होत पुणे विद्यापीठाचे दोन वेळा कुलगुरू होते याचे जन्मगाव बीरवाडी हे महाड तालुक्यात आहे

## कै. गोपाळ नारायण अक्षिकर (पाटील)

हे मूळचे अलिबाग तालुक्यातील आक्षीचे– कै लोकमान्य टिळक, कै विष्णुशास्त्री चिपळूणकर, यांचे हाताखाली शिक्षण स्वत: शिक्षक असल्याने शिक्षण प्रसार कार्याची तीव्र तळमळ. महाराष्ट्रातील शैक्षणिक जागृतीच्या आद्य प्रवर्तकापैकी एक कर्तबगार पुरुष व बहुजनाच्या शिक्षणाचा जनक जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट (स्थापना १८९२) मुबईचे आद्य सस्थापक

## श्री. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे

(जन्म १७–९–१८८५) सन १९०० पासून वृत्तपत्रलेखन व्यवसाय त्यानी लिहिलेले प्रकाशित ग्रथ, (१) वक्तृत्व शास्त्र, (२) कोदडाचा टणत्कार, (३) कुमारिकाचे शाप, (४) ग्रामण्याचा साद्यत इतिहास, (५) हिंदु धर्माचे दिव्य आणि सस्कृतीचा सग्राम, (६) भिक्षुकशाहीचे बड, (७) हिंदु जनाचा ऱ्हास आणि अध:पात, (८) शेतकऱ्याचे स्वराज्य, (९) रगो बापुजी अर्थात सातान्याच्या राज्यक्रांतीचा इतिहास १०) श्री गाडगेबाबाचे चरित्र व (१) खरा ब्राह्मण (२) विधी निषेध (३) टाकलेले पोर ही तीन प्रसिद्ध नाटके

काही काळ कर्जतला वास्तव्य झाल्याने त्याचे चिरजीव मार्मिकचे

सपादक व शिवसेना प्रमुख श्री बाळ ठाकरे याचे बालपण कर्जतला गेले आहे

### श्री. पद्मनाभ शास्त्री पालये

ज्यांचा सल्ला भारताचे घटनाकार डॉ आंबेडकर मानीत असे बुद्धिमान शास्त्री पडित पद्मनाभ शास्त्री पालये कर्जतलाच राहतात

### श्री. र. वा. दिघे (जन्म १८९६)

पूर्वी हे पुण्याला राहात होते हल्ली खोपोली येथे वास्तव्य त्याना शेतकऱ्याच्या ग्रामीण जीवनाची सहानुभुती असून त्यानी लिहिलेल्या ' पाणकळा या कादबरीमुळे ते उच्च दर्जाचे मराठी कादबरीकार ठरले

### श्री. सिताराम विश्वनाथ टिळक, B Ag

(जन्म १८८९ वावोशी, ता खालापूर ) हे सुविद्य घराण्यातील असून त्यांचे सार्वजनिक जीवन प्रदीर्घ ४२ वर्षांचे आहे कुलाबा जिल्हा लोकलबोर्डाचे ते अनेक वर्षे पदाधिकारी होते त्यानी जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्व क्षेत्रातून अमोल विधायक कार्य केले आहे ते राजकीय व सामाजिक कार्यकर्ते होते गेल्या ४० वर्षाचा जिल्ह्याचा विकास व इतिहास त्याचे चरित्राशी निगडित आहे

### श्री. त्रि. ना. बेडेकर B A , LL B (जन्म १९०५, आपटे )

आतापर्यंत जिल्ह्यात जी राजकीय आदोलने झाली व महाराष्ट्राच्या राजकारणात जिल्ह्यातील जे थोडे लोक चमकले त्यातील नानासाहेब हे एक चिरतेर सत्याग्रहाचे प्रमुख प्रणेते कुलाबा जिल्हा लोकल बोर्डाचे ते अध्यक्ष होते

### श्री. वाय्. ए. हफीज

कुलाबा जिल्हा लोकलबोर्डाचे माजी अध्यक्ष व जिल्ह्यातील तळमळीचे व धडाडीचे कार्यकर्ते उरण हे मुबई महानगराचे उपनगर व्हावे या योजनेचे सादरकर्ते त्याची कोकण विकास महामडळावर नुकतीच नेमणूक झाली आहे

### कै. नारायण नागू पाटील

शहापूर धेरडसारख्या अति मागासलेल्या खेड्यात एका अशिक्षित शेतकरी कुटुबात जन्मले व्यवसायाने शिक्षक कुलाबा जिल्ह्याचे पहिले लोकनियुक्त आमदार, जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष, जि स्कूलबोर्ड चेअरमन

कृषिवल (स्थापना १९३७ पेझारी) ह्या साप्ताहिकाचे निर्भिड सपादक, शेतकरी चळवळीचे चारित्र्यसपन्न नेते

### दे. भ. आण्णासाहेब तथा प. रा. दाते (पेण)

त्यागी व सार्वजनिक कार्यकर्ते, इतिहास सशोधन छद, सुप्रसिद्ध साहित्यिक व इतिहासतज्ञ गाधीवादावर नितान्त श्रद्धा असणारे म गाधींचे अनुयायी, प्रभावी वक्ते

### कै. वामन गोविंद उर्फ बाबासाहेब लिमये

कुलाबा जिल्ह्यातील विधायक कार्यांची घडण व सवर्धन आपल्या कर्तृत्वाने आणि धडाडीने करणारे म्हणून प्रसिद्ध कुलाबा जिल्ह्यात काँग्रेसचे कार्य सजविण्यात सिंहाचा वाटा राज्यसभेचे उपसभापती होते धरमतर पूल व अलिबागचे मॅटर्निटी हॉस्पिटल ही दोन कर्तबगारीची स्मारके

### कै. ज. वि. उर्फ भाऊसाहेब लेले

जिल्ह्यातील एक नामवत वकील (गोल्ड मेडॅलिस्ट) स्वातत्र्य चळवळीतील कार्यकर्ते, जिल्ह्यातील अनेक प्रमुख सस्थाचे अध्यक्ष, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे

### श्री. द. का. उर्फ नानासाहेब कुंटे B A , LL B

एक हुशार व तडफदार व्यक्ती १९३० साली स्वातत्र्याच्या चळवळीत सामील झाले १९४२ च्या लढ्यातले भूमीगत कार्यकर्ते, खेर मत्रिमडळात पार्लमेंटरी सेक्रेटरी, महाराष्ट्र हौसिंग बोर्डाचे अध्यक्ष, सभापती मुबई असेंब्ली या विविध पदावर त्यानी कार्य केले आहे शिक्षण कार्याकडे त्याचा विशेष ओढा असून जिल्ह्यातले आजही ते थोर पुढारी आहेत

### श्री. दत्ताजीराव खानविलकर

एक तरुण तडफदार वकील, राष्ट्र सेवादलाचे सुरुवातीचे कार्यकर्ते, जिल्हा होमगार्ड सघटनेचे प्रमुख ओजस्वी वक्तृत्व, महाराष्ट्राचे मजूर व खार विकास खात्याचे माजी उपमत्री निर्धार साप्ताहिकाचे सस्थापक

### श्री. तु. ह. वाजेकर (जन्म ६–७–१९०७ जसखार ता उरण)

जेमतेम शिक्षण उरणलाच झाले १९३० ते १९५१ कॉंग्रेसच्या सत्याग्रहाच्या चळवळीत अग्रेसर होते १९५७ मध्ये सयुक्त महाराष्ट्र समितीत गेले व लोकलबोर्डावर निवडून आले मीठ कामगाराचे यशस्वी सघटक व नेते जिल्हा परिषदेचे निष्ठावत सभासद व सध्या अध्यक्ष

### वेदमूर्ती श्री. केळकर

श्री विनायक केशव केळकर याचा जन्म नागाव (ता अलिबाग) येथे शके १८१८ मध्ये झाला वय ७४ वर्षांचे आहे त्यांचे अध्ययन वाई येथे झाले अकरा वर्षे त्यानी अध्ययन केले ऋग्वेदाचे, ब्राह्मण, वेदशास्त्र, विकृती, सहिता गृह्यसूत्रादी सपूर्ण अध्ययन झाले आहे त्यानी विद्वान शिष्यगण तयार केला आहे महाराष्ट्र सरकारतर्फे त्याचा गौरव झालेला आहे

### श्री. केशव गोविंद लिमये (पाली, जन्म २८ नोव्हेंबर १९०९)

समर्थ विद्यालय तळेगाव येथून शिक्षण झाले शेतकी व मधमाशापालन व ग्रामोद्योग शिक्षण पूर्ण केले १९३० पासून पालीस शेती व्यवसाय १९४२ मध्ये पाली येथे भातगिरणी, १९४६ पाली येथे सॉ मिल १९४८ मध्ये नागोठणा येथे भातगिरणी १९४७ मध्ये सुधागड टॉकीज व जाभुळपाडा येथे पिठाची गिरणी असे अनेक उद्योग श्री जमशेटजी नौरोजी पालीवाला याचे बरोबर भागीदारीत सुरू केले सर्व उद्योग स्वतत्र व मालकीच्या इमारतींत आहेत सुधागड सहकारी बँक लि ही सस्था स्थापून २० वर्षे चालविली.

PHILIPS

जगप्रसिद्ध फिलिप्स रेडिओ अगर ट्रान्झीस्टर घेऊन आपल्या घरी आरामात आपले आवडते सिने संगीत, नाट्य संगीत अगर नाटके व बातम्या ऐका.

रॅलिज् किंवा उषा सिलिंग अगर टेबल फॅन घेऊन उन्हाळ्यातही आरामात राहा.

फॉवर ल्युबा, हेस, जयको अगर स्वीटो अलार्म घड्याळे घेऊन अचूक वेळेवर आपली कामे करा.

हे सर्व आपणास मिळण्याचे ठिकाण :

# महाराष्ट्र रेडिओ

८३०, बाजार पेठ, अलिबाग
जि. कुलाबा.

आमचेकडे रेडिओ, ट्रान्झीस्टर, पंखे खात्रीपूर्वक दुरुस्त केले जातील.

---

# SATISH ENGINEERING WORKS

**Manufacturers of Electrical, Mechanical Spares and All types of Dies Work.**

C-30, Royal Optical Industrial Estate
5-B, Naigaum Cross Road,
Wadala-Bombay 31 (D D)

**Mfg. Div. at**
**CHENDHARE**, Tal **ALIBAG**, Dist **KOLABA.**

---

# अलिबाग मच्छिमार सहकारी सोसायटी अलिबाग

आमची सोसायटी मच्छीमारी लोकास जास्तीत जास्त आर्थिक मदत करून त्याची उन्नती करण्याचा प्रयत्न करीत आहे व त्याच्या धंद्यात प्रगती घडवून आणण्यासाठी नाना तऱ्हेचे उपाय योजित आहे. तसेच शैक्षणिक व सामाजिक सुधारणांचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून कार्य करीत आहे.

सोसायटीच्या पुढील निरनिराळ्या विभागामार्फत मच्छीमार समाजाची सेवा घडत आहे.

**मुख्य कचेरी : मच्छिमार लोकांस कर्ज व मच्छिमार सामान पुरवठा व्यवहार.**

**सुकी मासळी विभाग : मच्छिमार लोकांच्या सुक्या मासळीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार.**

**बोट कारखाना : (बोट बिल्डिंग यार्ड) मच्छिमार लोकांच्या बोटी बांधणे.**

**जी. पी. राईलकर,** सेक्रेटरी
**मारुती लक्ष्मण पोरे,** चेअरमन

कुलाबा जि सहकारी बँकेचे चीफ प्रमोटर व डायरेक्टर भूविकास बँकेचे सुरवातीपासून आजपर्यंत डायरेक्टर, राष्ट्रतेजचे सचालक सुधागड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष (ह्या सोसायटीची ४ हायस्कूल्स् आहेत ) अनेक आदिवासी आश्रमशाळा स्थापन केल्या आहेत जिल्हा दारूबदी मडळ, जिल्हा होमगार्ड कमिटी, जिल्हा पर्यटण समिती, जिल्हा ग्रथालय कमिटी वगैरेचे सभासद जिल्हा लोकलबोर्डाचे माजी सभासद, जिल्हा परिषदेचे माजी सभासद व अध्यक्ष भोर सस्थान कायदे मडळाचे माजी सभासद राजमाता जिजाबाई ट्रस्ट, रायगड पुण्यनिधी तानाजीचा उमरठ येथे पुतळा व पोलादपूर तालुक्यात ताराचा झुलता पूल बाधला असा पूल महाराष्ट्रात दुसरीकडे नाही वगैरे महत्त्वाची कामे केली हजारो रुपये निधी जमवून वरील कामासाठी ट्रस्ट बनविला कुलाबा जिल्हा काँग्रेस कमिटीचे गेली ३० वर्षे सभासद आहेत

## श्री. ना. य. नेने

राष्ट्रीय वृत्तीचे झुझार व ज्वलत देशभक्त जिल्ह्यातील अग्रगण्य नेते मनमिळाऊपणा, गोड वाणी, दुसऱ्यावर छाप टाकणारे व्यक्तीमत्व, हिशोबीपणा, सावधगिरी, कार्य करण्याची अफाट जिद्द व धडाडी व अभ्यासू वृत्ती यामुळे ते सवध महाराष्ट्रात लोकप्रिय झाले त्यानी ज्या सस्थेत कार्य केले त्या सर्व सस्था चागल्या चालल्या आहेत त्यांनी सहकारी क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीचे कुलाबा जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेची गगनचुबी इमारत व पेण अर्बन बँकेची इमारत ही चिरतन स्मारकेच आहेत स्वच्छ व्यवहार, सडेतोड स्वभाव व चारित्र्यवान् नेता

## बॅ. ए. आर्. अंतुले

प्रखर ध्येयवादाने प्रेरीत झालेला माणूस ध्येयपूर्तीकरिता काय करू शकतो त्याचे श्री अतुले म्हणजे चक्षुर्वैसत्यम् उदाहरण आहेत म्हसळे महालातील आबेत गावी अत्यत मागास प्रदेशातील गरीब मुस्लीम समाजात जन्म घेतलेल्या या तरुणाने अत्यत हालअपेष्टा भोगून परदेशात जाऊन बॅरिस्टरीची सनद घेतली त्याच्या मनात असते तर या पदवीच्या जोरावर त्याना अमाप धनसपदा मिळवता आली असती परतु आपली विद्वत्ता आपल्या जन्मभूमीच्या विकासाप्रित्यर्थ कारणी लागावी या उच्च विचाराने प्रेरीत झालेली जी काही हाताच्या बोटावर मोजण्याइतकी ध्येयवेडी व्यक्तिमत्त्वे आढळतात त्यात ना अतुले याचे स्थान मोठे आहे गेल्या दहा-पधरा वर्षांत त्यानी सरकारी आणि सामाजिक पातळीतील अनेक सस्थात काम केले नुकतीच त्याना महाराष्ट्राच्या मत्रिमडळात प्रतिनीधित्व करण्याची सधी मिळाली आणि ही सधी मिळताच आपल्या मायभूमी कुलाबा जिल्ह्याचे आर्थिक आणि सामाजिक चित्र बदलून टाकण्याचा त्यानी जणू ध्यास घेतला आहे

## श्री. तु. वि. शेट

अलिबागच्या प्रसिद्ध शेट घराण्यात जन्म यशस्वी व्यापारी परतु मुले कर्ती झाल्यावर व्यापार त्यांच्यावर सोपवून या माणसाने समाजसेवकाचे व्रत स्वीकारले शैक्षणिक सस्थात काम करण्याची विशेष आवड अलिबागच्या जे एस् एम् कॉलेजच्या स्थापनेत आणि सवर्धनात सिंहाचा वाटा को ए सोसायटीचे कार्याध्यक्ष व्यापारी प्रवृत्तीचे असले तरी एक आघाडीचे रायकीय मुत्सद्दी

## श्री. रामचंद्र पितांबर दोसी, LL B

हे गोरेगाव ( जि कुलाबा ) येथील राहणारे असून, त्यांचे वय ४० आहे गेली १०–१२ वर्षे माणगाव तालुक्यात काँग्रेस पक्षाचे काम करतात त्याचा व्यवसाय इन्कमटॅक्स व सेलस्टॅक्स् सल्लागार हा आहे तालुक्यातील विशेषत गोरेगाव येथील एज्युकेशन सोसायटी, अर्बन बँक, तालुका वाचनालय, ग्रामपचायत या सस्थामध्ये काँग्रेस पक्षाचेच बहुमत असून त्या सर्व ह्यानी सघटित केल्या आहेत माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे हे अध्यक्ष असून तालुक्यातील धडाडीचे, जिद्दीचे व सघटना कुशल असे कार्यकर्ते आहेत

## श्री. कृ. ना. धुळप

श्री कृष्णराव धुळप याचे प्रतिकूल परिस्थितीतूनच शिक्षण झाले शालेय जीवनात बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध मराठी पाचवीत असताना त्यानी पहिले नाटक लिहिले त्या नाटकाचे प्रयोग शाळेत व गणेशोत्सवात करून त्यायोगे स्वतःच्या पायावर उभे राहून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुरे केले वडोदे कॉलेजातून B A व मुबईच्या एल्फिस्टन कॉलेजातून M A झाले १९४२ च्या स्वातत्र्याच्या चळवळीत तुरुगवास शिक्षकाचा व्यवसाय करून राजकारणात प्रवेश १९४८ पासून शेतकरी कामकरी पक्षाचे कार्यकर्ते व नेते १९५६ साली LL B. झाले सयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे विधानसभेवर १९५७ साली निवडून गेले ते आजपर्यंत आमदार आहेत विधान सभेत व बाहेरही त्याचे भाषण लालित्यपूर्ण अभ्यासू, सूक्ष्म माहितीने व पूर्ण अर्थाने भरलेले असते सध्या विधानसभेत विरोधी पक्षनेते आहेत त्याचा जन्म जामुळपाडा जि कुलाब्याचाच परिस्थितीच्या विरोधातून शिक्षण घेणारे, विरोधी पक्षाचेच नेते असावेत हा योगायोग !

## श्री. शंकरराव बाबाजीराव सावंत

B A (Hons ), LL B
(आमदार महाराष्ट्र विधानसभा महाड)

जन्म २५ एप्रिल १९१० सालचा प्राथमिक शिक्षण पोयनाड, माध्यमिक अलिबाग व महाविद्यालयीन शिक्षण मुबई व पुणे येथे झाले आहे महाड येथे वकिली सुरू केली समाजकार्याच्या तळमळीने महाड शहराच्या सुधारणेत भाग घेतला नगरविकासाच्या दृष्टीने, नळाची योजना, काँक्रिट रस्ते, नवीन आराखडे वगैरे केलेच, त्याशिवाय महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यानी शहरातील गोर गरीब वस्तीतील वीज, पाणी, रस्ते याची केलेली विशेष सुधारणा होय महाड नगरपालिकेचे १२ वर्षे ते अध्यक्ष होते, हे त्याच्या लोकप्रियतेचे द्योतकच आहे १९५६ साली सयुक्त महाराष्ट्राच्या प्रचड आदोलनात नगरपालिकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन त्यांनी हिरिरीने भाग घेतला व महाड तालुक्याचे नेतृत्व केले १९६२ साली झालेल्या निवडणुकीत अत्यत अटीतटीच्या सामन्यात महाड मतदार सघातून महाराष्ट्र

विधानसभेवर निवडून आले त्यांनी विधानसभेत अत्यत मोलाची कामगिरी केली कुलाबा जिल्हा व कोकण विभागाच्या बाबत चालविलेल्या उपेक्षेबाबत त्यानी शासनावर कडाडून हल्ला केला व निस्पृह आणि निभिड आमदार म्हणून ख्याती मिळविली विकासाच्या दृष्टीने दुसरी अडचण म्हणजे दळणवळणाची त्यासाठी सोयीस्कर व चागल्या मार्गाची म्हणून महाड-विन्हेरे, महाड-म्हाप्रळ, नादगाव-बीरवाडी, वगैरे महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला चालना दिली त्यामुळे या भागात सर्वत्र S T गाड्या धावत आहेत याचे लेखन अल्प प्रमाणात झाले असले तरी त्याची दोन्ही पुस्तके चागली गाजली आहेत पैकी पहिले 'प्रकाश झोत' हे महाजन अहवालावर लिहिलेले असून, महाजन अहवालातील विसगतीच नव्हे तर तर्कदुष्टता आणि कायद्याचे अतिक्रमण वगैरे दोष त्यांनी प्रखरपणे माडले आहेत आणि दुसरे 'कोंकणच्या कथा आणि व्यथा' या नावाचे पुस्तक लिहून कोकणच्या उपेक्षेची कारणमीमासा व त्यावरील उपाय याच्याकडे त्यानी आम जनतेचे लक्ष वेधले आहे ही लेखनमाला प्रथम नवशक्तीत प्रसिद्ध झाली व अत्यत लोकप्रिय झाली अशी ही मनमिळाऊ व अत्यत लोकप्रिय व्यक्ती सन १९६२ पासून आजतागायत या विभागातील आमदार आहे

## श्री. गंगाधर विष्णू पुराणिक

प्रसिद्ध धूतपापेश्वर आयुर्वेद औषधी कारखान्याचे सस्थापक कै तात्यासाहेब पुराणिक याचे हे चिरजीव त्यानी कारखान्याची नवी इमारत बांधून व नवीन यत्रसामुग्री बसवून कारखाना अद्ययावत केला व कारखान्याचे पब्लिक लिमिटेड कपनीत रूपातर केले ते अनेक बँका व कारखान्यावर डायरेक्टर म्हणून आहेत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे ते अध्यक्ष होते १९४६–४७ साली सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांच्या नेतृत्वाखाली परदेशी गेलेल्या शिष्टमडळाचे ते सभासद होते

## श्री. सदाशिव कृष्ण फडके

मुळचे वसईचे १९०४ मध्ये वकिलीच्या व्यवसायानिमित्त स्थायीक निष्णात वकील निर्व्यसनी व साधी राहणी ते उदात्त विचारसरणीचे असून त्यांचा विद्याव्यासग, लेखन व मनन फार दांडगे आहे सनातन आर्यधर्म, तत्त्वज्ञान व वेदाताची त्याना फारच आवड आहे ज्ञानेश्वरी व दासबोध या ग्रथांचा त्यांनी सखोल व विवेचक अभ्यास केला आहे ते उत्तम वक्ते आहेत त्यांची नवयुग धर्ममाला, श्रीमद्दयानद चरित्र, लाला लजपतराय चरित्र अशी अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत 'भारतधर्म महामडळ' बनारस या सस्थेने त्याना डी ओ सी (Doctor of Oriental Culture) ही पदवी दिली आहे

## श्री. वसंत माधव वेदक

कुलाबा जिल्ह्यातील एक थोर काँग्रेस कार्यकर्ते व पुढारी कुलाबा जिल्हा काँग्रेस कमिटीचे काही वर्षे अध्यक्ष त्यानी काँग्रेस लढ्यात भाग घेऊन कारावासही भोगला आहे

महाराष्ट्र प्रातिक काँग्रेस कमिटीचे सभासद होते पनवेल म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते मुंबईच्या वरिष्ठ कायदेमडळाचे सभासद होते विधान परिषदेचेपण सभासद होते.

## कॅ. डॉ. गं. र. ढबू L C P S

अलिबागेतील लोकप्रिय डॉक्टर, सार्वजनिक कामात हौस, अलिबाग म्युनिसिपालिटीचे उपाध्यक्ष होते अनेक सस्थाशी त्याचा सबध आहे

## श्री. अहमद अब्दुल्ला खतीब

नऊ वर्षे कुलाबा जिल्हा बोर्डाचे सभासद पनवेल म्युनिसिपालिटीचेही सभासद होते वक्फ जिल्हा कमिटीचे अध्यक्ष कुलाबा स्कूलबोर्ड सभासद अनेक सार्वजनिक कार्याशी सबध

## श्री. केशव गोविंद लिमये B A, LL. B

हे पनवेलचे प्रख्यात व निष्णात वकील असून अनेक चागल्या सस्थांशी याचा निकट सबध आहे

## श्री. परशराम केशव लिमये B A, LL. B

हे पनवेलमधील एक हुशार व प्रसिद्ध वकील समजले जातात हे तरुण व उत्साही कार्यकर्ते असून अनेक सस्थाशी सबधीत आहेत पनवेल येथे यदा नवीनच सुरू झालेल्या महाविद्यालयाचे ते सेक्रेटरी आहेत

## श्री. केशव हरी गोखले

हे आयुर्वेद विशारद असून पनवेलमधील प्रख्यात डॉक्टर पनवेल म्युनिसीपालिटीचे अध्यक्ष होते चारित्र्यवान व अत्यत साधा माणूस म्हणून ह्यांचा लौकिक आहे ते तळमळीचे समाज कार्यकर्ते असून अनेक सस्थाशी त्याचा सबध आहे

## श्री. बाळू विठ्ठल नाखवा

राष्ट्रहिताकरिता आजपर्यंत अनेकानी प्रतिकूल व अनुकूल परिस्थितीतून विविध क्षेत्रात अल्प वा महान् कार्ये केलेली आहेत काहीना प्रसिद्धी आवडते व काही प्रसिद्धी विन्मुख असतात

श्री बाळू विठ्ठल नाखवा ह्यानी केलेल्या कार्याचा कुलाबा जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने उल्लेख होणे आवश्यक आहे

त्याचा जन्म करजे (ता उरण) येथे झाला लहानपणीच आई निवर्तल्यावर व दुर्दैवाने वडिलाना अधत्व प्राप्त झाल्याने, निराधार व कठीण परिस्थितीत त्याच्या आत्याने त्याना सभाळले अर्थातच त्यामुळे ते आत्याच्या धद्यावर विनामूल्य काम करू लागले त्यावेळेस त्याना व्यायामाचा नाद लागून नरसू चुडामणीच्या (कुलाबा, मुबई) तालमीत नियमाने जाऊ लागले परिस्थितीने त्याना योग्य खुराक मिळाला नाही. मिळेल ते खाऊन, तीन वर्षे सातत्याने मेहनत घेऊन ते कुस्तीगीर झाले आखाड्याबाहेर अनेक कुस्त्या मारल्यावर ते नामांकित पैलवान बनले ओघानेच अनेकाकडून मग थोडीफार मदत मिळू लागली वयाच्या बाविसाव्या वर्षी मुबई सोडून करजे गावी परत आले विवाहबद्ध झाले व्यवसायासाठी ते मच्छीमारीच्या धद्यावर जात ह्या पैलवानाला चैन न पडून त्याने करजे येथे लगेच, एक कुस्त्यांचा मोठा आखाडा स्थापन केला प्रसिद्ध कुस्त्याचे फड येथे भरू लागले. एका नागपचमीच्या मुहूर्तावर झालेल्या भव्य कुस्तीत (त्याचा गाय बरा नसतानाही) आव्हान स्वीकारून एका दुरूच्या

प्रचड पैलवानाला अनपेक्षित चीत करून विजयी झाले त्यामुळे कुलाबा जिल्ह्यातच काय पण बाहेरही त्याचे मोठे कौतुक झाले

त्यानतर त्यानी अनेक शिष्य तयार केले व ते पण विजयी होत गेले शारीरिक दृष्टचा आपला समाज सदृढ व्हावा या उदात्त प्रेरणेने व निरपेक्ष बुद्धीने त्यानी शिष्याना उत्तेजन देऊन नवगाव, वरसोली, थळ येथेही आखाडे स्थापन करून पैलवानी पेशात भर टाकली आजही त्याचे शिष्य जिल्हा व राज्य पातळीवर होणाऱ्या सामन्यात विजयी होऊन मानधन मिळवितात व दरमहा त्याना सरकारकडूनही मानधन दिले जाते

आत्याकडे लहानपणी असताना त्यांचा देवभक्तीकडे ओढा लागला त्यामुळे गेली दोन तपे सतत ते पढरपूर, गाणगापूर, तुळजापुरची वारी करतात शक्तीनुसार सर्व ठिकाणी दान धर्म करतातच

गाणगापूरच्या श्रीदत्तगुरुमहाराज मदिर सभामडपाच्या सपूर्ण फरसबदीचे काम त्यानीच केले आहे तसेच श्रीसत गाडगे महाराज मठाच्या एका खोलीचे सपूर्ण कामही त्यानीच केले तसेच जीवन्मुक्त महाराजाच्या मठात त्यानी प्रशस्त धर्मशाळा पण बाधली आहे त्यांची साधुसताच्या ठिकाणी अपार भक्ती असून, त्याचीच कृपा आहे असे ते समजतात

गेली काही वर्षे येथील कुस्त्यांचे सामने बद होते त्यासाठी चाणजे गावचे सरपच श्री कृ प मसण यांनी तळमळीने सामने पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न चालविले आहेत राज्य पातळीचे तालीम सघाचे सभासद श्री शकर भाऊ कोळी हे सुद्धा आत्मियतेने मार्गदर्शन करीत असतात

कुलाबा जिल्ह्यातील एक उत्तम सोसायटी (करजा येथील मच्छीमार सोसायटी) स्थापन करण्यात श्री बाळू विठ्ठल नाखवा हे अग्रभागी होते

# शासनाने सत्कार केलेले वेदोनारायण

## वे. मू. गोविंदभट्ट काशीनाथ धारप, (पाली)

यांचा जन्म २४ मे १८९६ रोजी झाला वयाच्या बाराव्या वर्षी त्यानी वेदाभ्यासाला प्रारभ केला. पाली येथील वे मू वामन विनायक पावगी यांजकडे त्याचे वेदाध्ययन झाले कृष्ण यजुर्वेद सहिता, ब्राह्मण, अरण्यक हा सर्व अभ्यास घनान्त करून वेदशास्त्रोत्तेजक सभेची सर्वोच्च परीक्षा देऊन प्रमाणपत्र मिळविले सागली, सातारा, पुणे, मुबई, दिल्ली इत्यादी अनेक शहरात त्याचा व्यासगाबद्दल सत्कार करण्यात आला आहे

## वे. मू. कृष्णंभट्ट बापूभट्ट परांजपे, (अलिबाग)

सन १८५० चे सुमारास अलिबाग येथील श्री पाटणकर नामक एका धनवान वकिलानी 'सर्वस्वदान' करण्याचे ठरविले त्याकरिता तीन हयात पिढचा वेदपठण करीत असलेल्या घराण्याचे शोधात ते होते त्याना वाई येथील हे परांजपे घराणे आढळले याचे पणजोबा, आजोबा, वाई येथे भिक्षुकी करीत होते व वडिलाचे अध्ययन सुरू होते हे पाहून श्री पाटणकर वकिलानी याचे आजोबांना सर्वस्वदान केले त्याचे अलिबाग येथील घरदार, जमिनजुमला त्याना मिळाला ह्या वेळेपासून पराजपे कुटुब अलिबागेत स्थायिक झाले

अशा गेल्या सात पिढचा अखडपणे वेदपठणाचे कार्य सुरू असलेल्या वाई येथील ख्यातनाम वैदिक घराण्यात याचा जन्म ३ ऑगस्ट १९०४ रोजी झाला वयाच्या आठव्या वर्षी त्यानी वेदाभ्यासाला प्रारभ केला सतत ४५ वर्षे ऋग्वेदाचा सांगोपांग व्यासग करून त्यानी वैदिक आणि याज्ञिक अशा दोन्ही क्षेत्रात अलौकिक प्रभुत्व मिळविले वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या या विषयातील सर्वोच्च परीक्षा सर्वोत्तम श्रेणीने एप्रिल १९३१ मध्ये उत्तीर्ण झाले ते सर्वोत्कृष्ट घनपाठी आहेत

श्रीमत् शकराचार्य सकेश्वर पीठ (जेरेस्वामी) यानी 'वेदाचार्य' पदवीने गौरविलेले वे मू कृष्णभट्ट यानी काशीतही विजय मिळवून राज्यपाल श्री विश्वनाथ दास याच्या हस्ते बहुमान सपादित केला अलिबाग ही त्याची तपोभूमी असून त्यांच्या चिरजीवाना वेदाभ्यास शिकवून मागील सात पिढ्यांचा हा अखड वारसा पुढे चालविण्याकरिता ते प्रयत्नशील आहेत

## वे. मू. वासुदेव हरी भातखंडे, (नागाव)

वेदमूर्ती हरी वामन भातखडे याचे सुपुत्र वैदिक वातावरणात १८ जुलै १९१२ रोजी नागाव (ता अलिबाग) येथे जन्मले वडिलांच्या मार्गदर्शनाखाली लहानपणीच त्यांनी वेदाभ्यासाला सुरुवात केली

सन १९२२ ते १९२९, नागाव येथील वेदमूर्ती विनायक केशव केळकर याच्याकडे व नतर १९२९ ते १९३६ पर्यंत सागली येथे वेदमूर्ती काशिनाथभट्ट नारायणभट्ट केळकर, घनपाठी याचे मार्गदर्शनाखाली अध्ययन पूर्ण केले

पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेत ऋग्वेद शाखेची ऋग्वेद शाखा परिक्षा १९३७ मध्ये उत्तीर्ण झाले त्याना सर्व ग्रथ मुखोद्गत असून ते याज्ञिकी उत्तम प्रकारे जाणतात व कर्मकाड यथासाग करतात

वेदाभ्यासानतर वेदाचार्यांनी कुलाबा जिल्ह्यातील नागाव येथे अध्यापनाचे कार्य सुरू करून शिष्यगण निर्माण केला आपल्या वाक्‌चातुर्याने आणि बुद्धिकौशल्याने निरनिराळ्या वैदिक परिक्षा देऊन प्राविण्य सपादन केले १९६४ साली वाराणसी येथे त्याचा सत्कार झाला गुजराथ मधील वेदस्पर्धेमध्ये सर्व प्रथम क्रमाक मिळविला तिरूपती, आध्र येथे अखिल भारतीय वैदिक गुरू-शिष्य समारोहात सत्कार झाला श्रीमत् शकराचार्यांनी (जेरेस्वामी-करवीर) त्याना 'वेदाचार्य' म्हणून भुषविले पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेने त्याना वेदचूडामणी म्हणून भूषविले

सतत २८ वर्षे अध्ययन व अध्यापन करणारे हे वेदाचार्य वेद म्हणण्याच्या सर्व विकृती पद्धतीत प्रवीण आहेत ऋग्वेद शाखेचा त्याचा व्यासग व उत्साह वयाच्या ६० व्या वर्षी देखील उल्लेखनीय आहे

आणखी अनेक व्यक्तीचा उल्लेख होणे अवश्य होते पण वेळेवर माहिती उपलब्ध नसल्याने या आवृत्तीत समावेश करता आला नाही

# कुलाबा जिल्हा अधिकारी व नेते

### प्रमुख शासनाधिकारी

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | श्री आर वासुदेवन् |
| २) | शल्य चिकित्सक | श्री बावळे |
| ३) | जिल्हा न्यायाधीश | श्री गाडगीळ |

## कुलाबा जिल्हा सहकारी मुद्रण आणि प्रकाशन संस्था

पेण–जिल्हा कुलाबा.

**मुकुंद कोलटकर**, व्यवस्थापक सचिव  **ना. य. नेने**, अध्यक्ष

## श्रीकृष्ण बेकरी, शिरढोण

**उत्कृष्ट ताजे पाव, बनपाव, खारी, नानकटाई, केक्स्, क्रिमरोल, बिस्किटस् आणि सडे स्पेशल (पॅटिस) मिळण्याचे एकमेव प्रसिद्ध व विश्वसनीय ठिकाण**

ऑर्डरप्रमाणे माल घरपोच केला जातो शिरढोणला याल तेव्हा अवश्य भेट द्या आपल्या भेटीचे स्वागत होईल

**प्रो. विश्वनाथ कृष्णाजी बापये**

## वि ला स इं जि नि य रिं ग व र्क्स

**कचेरी रोड, कर्जत (C. Rly.), जि. कुलाबा.**

मशिनरी स्पेअर पार्टस् ऑर्डरप्रमाणे योग्य भावी, खात्रीशीरपणे व वेळेवर करून दिले जातील तसेच सर्व तऱ्हेच्या मशिनरीचे जनरल रिपेअरिंग करून देऊ

**प्रो. एस. एल्. सुतार ब्रदर्स**

## सुंदर मंडप डेकोरेटर

टे. नं. ४२५

**१३८, मिडल क्लास को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, पनवेल (कुलाबा)**

आमचे येथे शुभ कार्यास लागणारे मंडपाचे व स्टेजचे सामान, खुर्च्या, सोफा टेबले, चिनी मातीचे सामान, गाद्या व उशा, लाईट सामान व लाऊडस्पीकर वगैरे सामान भाड्याने मिळेल.

**विना सहकार नही उद्धार**

टे न ३६०

महाराष्ट्र शासनाकडून लहान लहान उद्योगधंद्याना मिळणाऱ्या सवलतीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी––

■ मुबईपासून २८ मैलावर ■ प्रतिमुबई योजनेच्या परिसरात ■ मुबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर ■ पनवेल रेल्वे स्टेशनजवळ ■ पनवेल म्युनिसिपल हद्दीत ■ पनवेल एस् टी स्टँडलगत ■ इडस्ट्रियल झोनमध्ये ■ रस्ते, पाणी, इलेक्ट्रिसिटी इत्यादी सुसज्ज सुखसोयीसह, प्लॉटस्मध्ये लहान उद्योगधद्याकरिता सस्थेकडून फॅक्टरी शेडस् बाधून मिळतील आपल्या आवडीप्रमाणे उद्योगधदा सुरु करण्याकरिता सस्थेकडून सर्व बाबनीत मार्गदर्शन आणि सहकार्य मिळेल तरी स्वत च्या आर्थिक उन्नतीसाठी व पर्यायाने राष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीची वाढ करण्यासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा

मॅ : व्ही. एस. पाबसे] **पनवेल इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह इस्टेट लि. पनवेल, जि. कुलाबा** [चेअरमन : **जे. एस. फासट**

## पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड

**मिरची गल्ली, पनवेल–जि. कुलाबा**

मध्यमवर्गीय व लहान लहान व्यापाऱ्याच्या आर्थिक अडचणी निवारणार्थ निर्माण झालेली आपणा सर्वांची बँक बँकिगचे सर्व व्यवहार केले जातात अत्यत सवलतीचे दराने ठेवी स्वीकारतो अत्यल्प बचत योजनेने बँक घराशी आणा

चेअरमन : **रवजी भिमजी रंगपरिया**  मॅ डायरेक्टर : **ज. शि कासट**  मॅनेजर : **सि. ह. भिडे**

स्थापना १९३१) ***दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.*** (ऑडिट वर्ग १

**महाड–जि. कुलाबा.**

■ बँकिगचे सर्व व्यवहार करण्यास सदैव तत्पर ■ आकर्षक व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात ■ भाग भाडवल १,२५,२२५ रुपये ठेवी ७,८२,२४७ रुपये ■ सभासद सख्या २८७१

चेअरमन : **एस. एस. सावत** B Sc, LL. B  व्हॉ चेअरमन : **पा ना डोंगरे**  मॅनेजर : **एस. एन. ओक**




पुरुषार्थ प्रकाशन पनवेल

४) जिल्हा पोलीस अधिक्षक — श्री नारायणस्वामी
५) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद — श्री आर डी सिंग

## लोकशाहीचे नेतृत्व

१) लोकसभा सदस्य — श्री द का कुटे
२) राज्यसभा सदस्य — श्री म ल दांडेकर
३) राज्य उपमंत्री शिक्षण, कायदा, बंदरे खाते महाराष्ट्र सरकार (म्हसळे) — बॅ श्री अंतुले
४) आमदार विधानसभा (अलिबाग) श्री द ना पाटील
५) आमदार ,, (पनवेल) श्री डी बी पाटील
६) आमदार ,, (कर्जत) श्री स रा राऊत
७) आमदार ,, (पेण) श्री अ प शेटे
८) आमदार ,, (रोहा) श्री पा रा सानप
९) आमदार ,, (महाड) श्री श बा सावंत
१०) आमदार विधान परिषद (मुरुड) श्री म ल दांडेकर

## जिल्हा परिषद.

१) अध्यक्ष — श्री तु ह वाजेकर
२) सभापती बांधकाम व आरोग्य समिती — श्री पी एन् पाटील
३) सभापती शिक्षण व अर्थसमिती — श्री रा स पवार
४) सभापती कृषि व सहकार समिती — श्री कों न उतेकर
५) सभापती समाज कल्याण समिती — श्री श भि गायकवाड
१) सभापती पंचायत समिती, अलिबाग — श्री च रा सामंत
२) सभापती पंचायत समिती, मुरुड — श्री एच् एम् वांगारे
३) सभापती पंचायत समिती, श्रीवर्धन — श्री र ना राऊत
४) सभापती पंचायत समिती, उरण — श्री कृ द जोशी
५) सभापती पंचायत समिती, म्हसळा — श्री ना म दळवी
६) सभापती पंचायत समिती, कर्जत — श्री रा द शितोळे
७) सभापती पंचायत समिती, पोलादपूर — श्री सि दौ सकपाळ
८) सभापती पंचायत समिती, महाड — श्री शा शि फिलसे
९) सभापती पंचायत समिती, माणगाव — श्री आर् व्ही महाळुंगे
१०) सभापती पंचायत समिती, पेण, — श्री एल् एस् म्हात्रे
११) सभापती पंचायत समिती, पनवेल — श्री डी एन् पाटील
१२) सभापती पंचायत समिती, खालापूर — श्री वाय् ए देशमुख
१३) सभापती पंचायत समिती, पाली — श्री जे एन् पालीवाला
१४) सभापती पंचायत समिती, रोहा — श्री एन् आर सानप

## कोंकण विकास महामंडळाचे कुलाबा जिल्ह्याचे सदस्य

१) श्री श बा सावंत — महाड
२) श्री युसुफ अब्दुल हफीज — पेण

# अलिबाग

पहिल्यापासून अलिबाग हे शहर जिल्ह्याची राजधानी असल्याने इतर तालुक्यापेक्षा अलिबाग तालुका पुष्कळशा बाबतीत प्रगतीशील आहे

अलिबाग तालुक्याची भौगोलिक परिस्थिती इतर तालुक्याहून थोडी निराळी आहे पूर्वेला धरमतर खाडी, पश्चिमेस सिंधूसागर, दक्षिणेला रेवदंड्याची खाडी, पूर्व दक्षिणेस रोहे तालुक्याचा भाग व उत्तरेस उरण तालुका

धरमतर खाडीवर पूल झाल्याने पूर्वी अलग असलेला हा तालुका आता सर्व ठिकाणांना सलग्न झालेला आहे

आजच्या अलिबागची स्थापना मराठ्याच्या आमदानीतील आहे. प्राचीन इतिहासात अलिबागबद्दल विशेष उल्लेख कोणत्याच स्वरूपात आढळत नाहीत अलिबागचे जे महत्त्व आहे, ते अर्वाचीन इतिहासातीलच आहे विशेषकरून मराठी राज्यातील काळात या शहराला विशेष महत्त्व प्राप्त झाले

आज जरी या शहरास अलिबाग म्हणून ओळखत असले, तरी सुमारे २७५ वर्षांपुर्वी अलिबागचे अस्तित्वच नव्हते याठिकाणी पूर्वी शहर नव्हतेच आजच्या अलिबाग शहराच्या जागी समुद्राचा भाग पुढे आलेला होता व तेथे दलदलीची जागा होती असे म्हणतात व त्याच्या अलीकडे नारळी पोफळीच्या बागा होत्या त्या एका अली नावाच्या श्रीमान गृहस्थाच्या मालकीच्या होत्या व त्याने त्या बागा कमी करून शहर विस्तारास वाव दिला म्हणून या गावाचे नाव 'अलिबाग' असे पडले असेलही, पण मराठ्याच्या पत्रव्यवहारात बऱ्याच वेळा 'श्रीबाग' म्हणूनही अलिबागचा उल्लेख आढळतो. इतिहासात अलिबागचा उल्लेख कुलाबा किल्ल्यावरून कुलाबा असाच आढळतो

इ स १६९८ मध्ये कान्होजी आंग्रे मराठी आरमाराचे प्रमुख झाले व त्यानीच अलिबाग शहर वसविले व अलिबागमध्येच त्यानी आपल्या राजधानीचे ठिकाण ठेवले

सागराच्या सान्निध्यामुळे अलिबागच्या वाटेला आलेले काहीसे समशितोष्ण हवामान इंग्रज सत्ताधिकाऱ्याना आकर्षक वाटले व त्यानी जिल्ह्याचे मुख्य ठिकाण म्हणून या शहराची निवड केली यात आश्चर्य नाही

या शहरास लांबच लांब, विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे सागराचे सौंदर्य, विविध प्रकारचे, नयनरम्य, प्रसंगी रौद्र व भीषणही अनुभवण्यास मिळते पावसाळ्या व्यतिरिक्तच्या दिवसात सायंकाळची सागर शोभा मन रमविणारी अशी असते अलिबागच्या समुद्र किनाऱ्यास कोंकणच्या नारळी सुपारीच्या, सुरूच्या दाट व रम्य बागा दृष्टीस पडतात पूर्वेकडे नजर टाकल्यास लहान मोठे डोंगर दृष्टीस पडतात या डोंगरावर देवळे व सागरगडासारखे किल्ले आहेत. सागराचे सान्निध्य आणि डोंगराचे दुरून दिसणारे नयनमनोहर दृश्य ही अलिबागच्या सौंदर्यात भर टाकणारी ठरतात

या शहरात नवी व जुनी देवळे बरीच आहेत यापैकी मध्यवस्तीतील उंचच उंच कळसाचे, आतील कोरीव कामाने सुशोभित हेमाडपंत रचित, असे डोळ्यात भरण्यासारखे प्रेक्षणीय श्रीबालाजी मंदिर आहे शिवाय जुने श्रीकाशीविश्वेश्वर व श्रीगणपती मंदिरही आहे श्रीसमर्थ रामदास स्वामीनी स्थापन केलेली मारुतीची देवळे पण आहेत याशिवाय अलिबागची ग्रामदेवता म्हणून श्रीकाळंबदेवीचे देऊळही आहे काळीचाड्यात दत्त मंदिर असून घरत आळीत गणपती मंदिर, कर्ण राम मंदिर आहे त्यासमोर श्रीविष्णू मंदिर

२२९६८

असून देवळास सभामडप आहे शेजारी पुष्करणी आहेत रामनाथ येथील रामाचे देऊळ प्रसिद्धच आहे या मदिरात राम, लक्ष्मण व सीता याच्या मनमोहक व सुदर मूर्ती आहेत मदिरास मोठा सभामडप आहे चैत्रात रामजन्मोत्सवाचा सोहळा मोठा पाहण्यासारखा असतो शहरात २ मशिदी, ज्यू लोकाचे प्रार्थना मदिर (सिनेगॉग) पैकी एक मशीद २०० वर्षापूर्वीची जुनी असून दुसरी ८० वर्षापूर्वीची बाधलेली आहे सिनेगॉग १२५ वर्षापूर्वीचे बाधलेले आहे येथे ख्रिस्ती प्रार्थना मदिर नाही हे विशेष !

अलिबाग येथील आणखी एक ऐतिहासिक आकर्षण म्हणजे रामनाथ भागातील हिराकोट हा छोटासा भुईकोट किल्ला पण आज तेथे जिल्ह्याचा तुरुग आहे या किल्ल्यासमोर एक सुदर तळे आहे येथून जवळ असलेल्या वरसोली गावात एक प्रसिद्ध विठ्ठल मदिर आहे

इ स १८५० साली अलिबागची लोकसख्या ४३२९ होती व आज सुमारे ११००० लोकसख्या आहे

अलिबागचे एक जागतिक महत्त्वाचे आकर्षण आणि वैभव म्हणजे मॅग्नेटिक ऑब्झर्व्हेटरी (चुबकीय वेधशाळा) होय या वेधशाळेचा जगात दुसरा क्रमाक आहे स्थापना १९०४ साली झाली पृथ्वीच्या अतरगातील लोहचुबकीय शक्तीचे सशोधन आणि आलेखन करणारी ही भारतातील पहिली वेधशाळा होय या आधुनिक काळात या वेधशाळेमुळे अलिबाग शहराला जागतिक महत्त्व प्राप्त झाले आहे

अलिबागेत १८६१ साली १ मुलाची व १ मुलीची अशा सरकारी शाळा स्थापन झाल्या आज शहरात माध्यमिक शिक्षणाची उत्तम सोय असून औद्योगिक शिक्षणही दिले जाते १९६१ साली अलिबाग येथे महाविद्यालय सुरू झाले

अलिबाग नगरपालिका १८६४ साली स्थापन झाली असून तिचा शताब्दि उत्सव साजरा झालेला आहे

अलिबागला पाण्याची सोय बरी आहे पुरेशा विहिरी आहेत पण विहिरीचे पाणी मचूळ आहे

अलिबाग आज तरी औद्योगिक केंद्र आहे असे म्हणता येणार नाही पण शैक्षणिक केद्र होऊ शकेल

शहरामध्ये प्रसिद्ध जिल्हा ग्रथालय आहे क्रीडाभवन, बँका, हॉस्पिटल व क्लब अशा सस्थापण आहेत कुलाबा जिल्ह्यातील पहिला छापखाना अलिबाग येथेच सुरू झाला अनेक थोर पुढारी, शिक्षणतज्ञ, गव्हर्नर, व्हॉईसरॉय इ मोठे अधिकारी निरनिराळचा क्षेत्रातील समाज कार्यकर्ते यानी भेटी दिल्या आहेत तसेच महात्मा गाधी डॉ राजेद्रप्रसाद, डॉ राधाकृष्णन हे पण येथे येऊन गेले आहेत कॉंग्रेस अधिवेशने, मराठी कुमार साहित्य सम्मेलन, महाराष्ट्र ग्रथालय परिषद, महाराष्ट्र महिला परिषद, महाराष्ट्र मुद्रण परिषद अशी महत्त्वाची अधिवेशने अलिबागेत भरली आहेत या साऱ्या घटनानी अलिबागच्या कीर्तीत महत्त्वाची भर टाकली आहे

अलिबागेत अकरा छापखाने आहेत शहरात पुष्कळ उपहारगृहे असून दोन तीन हॉटेल्समधून प्रवाशाची राहण्याची सोय आहे शिवाय सरकारी डाक बगला आहे

अलिबाग तालुक्यात ४३ ग्रामपचायती आहेत तालुक्यात १२६ प्राथमिक शाळा असून १२ हायस्कुले आहेत या तालुक्यात शाळाची व हायस्कूलाची सख्या सर्वात जास्त आहे

तालुक्याचे मुख्य उत्पन्न भात असून नारळ, सुपारी व आब्याच्या बागा असल्याने हेपण उत्पन्न आहेच शिवाय भाजीपाल्याचे मळे करून उत्पन्नाचे चांगले साधन आहेच सर्व सरकारी मुख्य कचेऱ्या, हायस्कुले, कोर्ट व इतर सस्था अलिबागलाच असल्याने शहराला चागलीच शोभा आलेली आहे

अलिबागच्या निसर्ग सौदर्याच्या तसेच किल्ला, वेधशाळा, कनकेश्वर मदिर, सुदर सागर किनारा यासारख्या आकर्षणामुळे अलिबागेस येणाऱ्या प्रवासी पाहुण्याची सख्या वाढती आहे

अलिबागच्या किनाऱ्यावर उभे राहिल्यावर समोर विशाल सागरात उभ्या असलेल्या कुलाबा किल्ल्याचे मनोहर दर्शन होते यात रमणीयता तर आहेच, पण इतिहासाची भव्य आणि दिव्य स्मृती आहे

## कुलाबा किल्ला

ज्या किल्ल्याच्या अस्तित्वामुळे आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे या जिल्ह्याला कुलाबा हे नाव पडले तो कुलाबा किल्ला अलिबागपासून सुमारे दोन फर्लांगावर समुद्रात आहे तो एका खडकाच्या रांगेवर वसलेला आहे ओहोटीच्या वेळी या किल्ल्यात जाता येते या किल्ल्याची लाबी ९०० फूट व रुदी ३५० फूट व किल्ल्याच्या तटबदीची उची २५ फूट आहे किल्ल्यात देवळाचे पचायत आहे श्रीशकर, श्रीगणपती, देवी व कान्होबा ही देवळे व पद्मावतीची समाधी आहे भोवताली खाऱ्या-पाण्याचा सागर असताना मध्येच एक झाकलेली विहीर गोड्या पाण्यानी भरलेली आहे ते पाणी फारच मधूर व पाचक आहे हा चमत्कार मानला जातो एका बुरुजावर समुद्राकडे रोखलेल्या अशा इतिहासकालीन दोन तोफा आहेत आज किल्ल्यात पोलीस लोकाच्या गोळीबाराच्या सरावासाठी सोयी केलेल्या आहेत किल्ल्यात एक मनुष्य बसलेला असतो समुद्राचे व जहाजाचे निरीक्षण करता यावे यासाठी दुर्बिणी आहेत किल्ल्याला पुर्वी १७ बुरुज होते हा जल-दुर्ग मराठेशाहीत बाधला गेला, नावलौकिकास आला व त्याला भारतीय इतिहासात मोठे महत्व प्राप्त झाले आणि याच जलदुर्गाच्या मदतीने इग्रज पोर्तुगीज या पाश्चात्य दर्यावर्दी राष्ट्राना पराक्रमाचे पाणी मराठ्यानी मोठ्या प्रमाणात दाखविल्याने पाश्चात्य राष्ट्रात सुद्धा कुलाबा जलदुर्गाची चागली प्रसिद्धी झाली

इतिहासकाळात कुलाबा किल्ल्याला असलेले महत्त्व आज जरी नसले तरी शिवाजी महाराजानी ओळखलेले, किनारपट्टीचे देश सरक्षणाच्या दृष्टीने असणारे महत्त्व आजही कायम आहे याची साक्ष म्हणजेच कुलाबा किल्ला !

## कनकेश्वर

अलिबागेपासून ८ मैलावर १२६१ फूट उचीच्या सुवर्ण डोगरावर श्रीकनकेश्वर नामे श्रीशिवशकराचे स्वयभू स्थान फार पुरातन काळापासून प्रसिद्ध आहे

पृथ्वीतलावर कुर्माकृती असा हा एकच डोगर असून वनश्रीने नटलेला आहे पूर्वीच्या ऋषीमुनीनी भू-भागाचे जे नियम ठरविलेले आहेत त्यात कुर्माकृती डोगरावरील रहिवास ज्ञान सिद्धिदायक असतो असे लिहून ठेवलेले आहे

या डोगरावर पुराणपूर्व काळापासून ऋषीचे आश्रम असून, त्यातून

शिष्यगणास ज्ञानसाधना उपदेशिली जात असे, याचे अनेक पुराण ग्रथातून वर्णन केलेले आहे आजसुद्धा कित्येक ज्ञानसाधनी या स्थानी रहिवास करीत असून मन शांती प्राप्त करू घेत आहेत

मापगावी पायथ्याशी आल्यावर समोर डोंगराकडे पाहता नागमोडया बांधलेल्या पायऱ्या पाहूनच आनदाने माणूस पायऱ्या चढू लागतो या पायऱ्या बाधल्याला ९०० वर्षे झाली असूनसुद्धा त्याची बाधणी पाहून दिङ्मूढ होतो पायऱ्यामध्ये अतराची विषमता आहे दुतर्फा झाडे लावलेली असल्याने उन्हाचा त्रास होत नाही विश्रांती-साठी वाटेत कट्टे बाधलेले आहेत

डोंगर आकार कुर्माकृती असून कूर्माचे तोंड ईशान्येकडे व शेपूट नैऋत्येला शेपटीकडूनच चढावयास पायऱ्या कुर्माचे चारही पाय चहुकडे रुदावलेले असून, कोणत्याही दुसऱ्या डोंगरास जोडले गेलेले नाहीत कुर्माचे हृदयस्थान डावे स्कधावर मानेचे खाली व त्याच ठिकाणी बरोबर श्रीकनकेश्वर स्वयभू लिंगस्थापना हेच पूर्वीचे स्थापत्य कलेचे अन् आकलनीय प्रगल्भ वैशिष्ट्य

जेथे चढाव सपतो तेथे गोसमाधी आहे त्या ठिकाणास गाय-माडी म्हणतात येथे वर पोचताच शितल वारा शरीरास आल्हाद-दायक वाटून प्रवासाचे श्रम हरण करतो पुढे एक ब्रह्मकुड नावाची पुष्करणी लागते दुतर्फा केतकी वने सोडून थोडे पुढे जाताच श्रीकनकेश्वराचे भव्य मदिर दिसू लागते हे मदिर देवगिरी प्रधान हेमाडपत यानी तेराव्े शतकाचे अखेरीस बांधले मदिरावरील शिल्प उच्च दर्जाचे आहे कळसावर चढलेला मनुष्य एकाच दगडात कोरलेला असून त्याचे पायातील दगडी वाळा सहजी पायाभोवती फिरतो कारागिराने आपले कसब अजरामर करून ठेविले आहे धन्य ते शिल्प ! धन्य ते शिल्पकार !! धन्य ते स्थापत्य प्रविण !!! देवळाची उची ५४ फूट असून प्राकार फरसबदी आहे बाजूस सुदर धर्मशाळा आहे

मदिराच्या सभामडपात प्रवेश करताच प्रशाततेचा साक्षात्कार होतो इ स १६६८ चे सुमाराम श्रीछत्रपती शिवाजी महाराजानी राजापूरची इग्रजांची वखार लुटून तेथील चर्च मधील घटा स्वतः बरोबर आणून येथे टागली आहे असे सांगतात

हे स्वयभू व जागृत तसेच भक्तप्रिय असे श्रीशकराचे स्थान आहे येथे त्रिपुरी पौर्णिमा व महाशिवरात्रीला फार मोठी यात्रा भरते

हे स्थान उचावर असून व हवा थड असल्याने लाब लाबून इतर ठिकाणचे भक्त, प्रवासी व विद्यार्थी हे स्थान पाहावयास येतात कनकेश्वर डोगराच्या माथ्यावरून मुबई शहराचा देखावा फारच रमणीय दिसतो

वर जाण्यासाठी नवीन वाहन रस्ता तयार झालेला आहे कनकेश्वर देवस्थानामुळे अलिबाग तालुक्याचे महत्त्व विशेषच आहे

## अक्षी

अलिबागपासून तीन मैलावर गर्द बागायतीचे गाव, येथे सोमेश्वर महादेव व काली माता याची सुदर देवालये आहेत

## आवास

अलिबागपासून उत्तरेकडे ८ मैलावर एक लहानसा किल्ला आहे येथे नागेश्वर मदिर असून कार्तिक शु त्रयोदशीला यात्रा असते स ८ चावलेल्या माणसास त्वरित या देवळात आणले तर ते विष उतरते असे सागतात

## चौल

हे अलिबागपासून जवळच अतिप्राचीन, पौराणिक, ऐतिहासिक सर्व धर्मीय स्मृतीचे स्थळ असून एक दिवस तरी राहून बघण्यासारखे आहे. येथे शितळा मातेचें प्रसिद्ध मदिर असून सोमेश्वर मदिर पण आहे. रायवतक या लहानशा डोंगरावर दत्तात्रयाचे प्रसिद्ध मदिर आहे जव-ळच मारुतीचे मदिर असून येथे सुपारीचा कौल लावून प्रश्नाचे उत्तर दिले जाते असे सागतात किल्ला, चर्च, हॉस्पिटल, सेंट बार्बरा टॉवर, ऑगस्टेनियन चर्च, डोमीनीकन चर्च, सेट झेवीयर चॅपल कलावती-णीचा वाडा, मशीद, बुद्धकालीन गुहा, भगवती देवी मदिर, हमाम-खाना, राजकोट, महालक्ष्मी देऊळ, रामेश्वर मदिर, आंग्रेस्मारक, ही बघण्यासारखीच आहेत येथून जवळच हिंगुळणेची लेणी आहेत

## खांदेरी–उंदेरी

अलिबाग जवळ लहानशी बेटे आहेत दोन्ही बेटामध्ये खाडी आहे. उदेरी पेक्षा खादेरी पूर्वी जास्त सुरक्षित होते व उच पण आहे. खादेरी बेटावर १८६७ साली बेटाच्या उच जाग्यावर १६१ फूट उचीवर लाईट हाऊस बाधले आहे समुद्रातून सुमारे २०-२५ मैला-वरून लाईट दिसतो किल्यासारखी तटबदी आहे उदेरी हे लहान असून गोलाकृती आहे

## किहीम

अलिबागपासून उत्तरेकडे ५ मैलावर हे गाव असून त्याच ठिकाणी प्रथम बेने ईस्त्राईल हे लोक समुद्रात त्याचे जहाज फुटले असताना येथे उतरले हे बागायती गाव असून उत्तम हवेचे ठिकाण आहे

## मांडवा

अलिबागच्या उत्तरेस १२ मैलावर हे उत्तम बदर आहे येथे नारळ सुपारीच्या दाट बागा आहेत रेतीचा किनारा आहे करजा डोंगर व कनकेश्वर डोंगर येथून फारच छान दिसतात

## थळ

अलिबागच्या उत्तरेस ३ मैलावर हे गाव आहे समुद्र किनाऱ्यावर व नारळी पोफळीच्या दाट गर्द झाडीत हे गाव आहे येथे मच्छी-मारीचा प्रमुख व्यवसाय आहे येथून जवळच उदेरी बेटाच्या सुमारे १ मैल पूर्वेकडे भग्नावस्थेत 'खूब लढा' नावाचा किल्ला आहे

## सासवने

येथे ट्रेनिंग कॉलेज असून येथे उत्तम केळी पिकतात

## शहाबाज

शेतकी वस्तीचे मोठे गाव

## रेवदंडा

बदर व जुना भुईकोट किल्ला

## दि पनवेल तालुका इलेक्ट्रिकल डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड

वर्धमान सदन, टिळक रोड, पनवेल

मॅ डायरेक्टर

आर सी. शहा
इंजिनियर
प ता इ डे क लि पनवेल

" महाराष्ट्र वैभव " मार्गदर्शक प्रकाशनास हार्दिक शुभेच्छा

## वरसोली विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेड, वरसोली, जि. कुलाबा

चेअरमन
श्री विश्वनाथ जगन्नाथ म्हात्रे

With Best Wishes
From

PRINCIPAL

## NOVELTY TYPEWRITING INSTITUTE

JALNA

शु भ का म ना ए

# मोतीलाल आगरवाल

अकोला

## धरमतर

बदर, येथे नवीन पूल झाल्याने अलिबाग व पेण जोडले आहेत

## धोकवडे

या गावात मोठचा प्रमाणात कोंबड्या पाळल्या आहेत

## नागांव

अलिबागपासून सुमारे तीन मैलावर विस्तीर्ण असे गाव आहे नारळी सुपारीच्या गर्द बागा आहेत येथे सन १७७० मध्ये अहिल्या-बाई होळकरांनी दुरुस्त केलेले वखनाथाचे मोठे मदिर आहे देवळा-समोर मोठे तळे आहे तलावाच्या समोरच भिमेश्वराचे मोठे मदिर आहे

## पोयनाड

अलिबागेपासून साडेदहा मैलावर धरमतर रस्त्यावर धरमतर पासून दक्षिणेकडे अडीच मैलावर आहे हे सतत रहदारीचे गाव आहे दर सोमवारी येथे मोठा बाजार भरतो येथे बुद्धवीरा नावाचे देऊळ आहे दुसरे ७५ वर्षापूर्वी बाधलेले जैन मदिर पण बघण्यासारखे आहे जुन्या पोयनाड किल्ल्याकडे सिवा देवी देवळाकडून जाण्याचा रस्ता होता येथून जवळच तीन विरा धरण आहे या धरणातून अनेक गावाना पाणी पुरवठा होतो

## रामधरण डोंगर व लेणी

अलिबागपासून पाच मैल उत्तरेकडे व कार्ला खिडीच्या पण उत्तर बाजूस स स पासून ८०० फूट उचीवर आहे १२ लहान गाळे आहेत येथील जागा चांगली असून देखावा सुदर आहे

## रामराज

रेवदडयाच्या पलीकडे रामराज खोऱ्यातच हे गाव आहे येथे जुने देवस्थान आहे कान्होजी आग्रे व तुकोजी आंग्रे यानी येथे स्वारी केली होती

## रेवस

अलिबागपासून १४ मैलावर हे खाडीचे मोठे बदर आहे येथील बदराचा धक्का १८६४–६९ या काळात बाधला आहे मच्छीमारीचा व्यवसाय मोठा असून, येथून मुबईला सारखी ये–जा चालू असते

## सागरगड

अलिबागपासून ६ मैल पूर्वेकडे व धरमतरपासून ६ मैल पश्चिमे-कडे समुद्रसपाटी पासून १३५७ फूट उचीवर हा किल्ला आहे गडा-वरील हवा आरोग्यदायक आहे डोंगराच्या आजूबाजूच्या परिसरात गर्द झाडी आहे किल्ल्यावरून लाब लाबचा उत्कृष्ट देखावा दिसतो. किल्ला पाहण्यासारखाच आहे–

# उरण

**उरण** हे शहर कुलाबा जिल्ह्यातील प्राचीन शहर असून सध्या तालुक्याचे ठिकाण आहे जिल्ह्याच्या वायव्य टोकाला आहे

उरणमधील उरणावती देवीच्या नावावरून शहराला ' उरण हे नाव पडले हे बेट होते

प्राचीन काळी उरणच्या परिसरात अनेक राज्यकर्ते होऊन गेले द्रोणागिरीच्या आसपासची गावे मोठ्या वैभवाची होती

पुरातन काळी करजे ते मोरेपर्यत मौर्यांची सत्ता होती राजा पुष्पकेशीने मौर्यांना पराभूत केले इ स ८१० च्या काळात दोन लढाया झाल्या हिंदू राजा पुलकेशी याचा शूर सेनापती चदनगड याने शभर जहाजाच्या साहाय्याने मोरा घारापुरी जिंकले त्यानतर शिलाहार राजाचा अमल बरीच शतके होता शके १११० मध्ये भोजबाणाने उरण जिंकले इ स १२६० नतर उरण-करजा बेट देवगिरीकर यादवाच्या ताब्यात १३३९ पर्यंत होता काही काळ उरणवर नागरशहाचे राज्य होते शके १२७० मध्ये मुसलमानानी प्रदेश व्यापला नतर सन १४२२ मध्ये पोर्तुगिजांनी घनघोर युद्ध करून लढाई जिंकली सन १३६६ मध्ये विजयनगरचे माधव मत्री यानी स्वारी केली होती सन १७५१ मध्ये अहमदनगरच्या सैन्याने पण भयकर युद्ध केले तरी माघार घेतली

छत्रपती श्रीशिवाजी महाराजानी हा मुलुख मराठ्याच्या ताब्यात आणला नतर पुन्हा अहमदनगरच्या निजामशाहीकडे ४-५ वर्षे हा भाग राहिला परतु १८६२ साली सभाजी राजानी पुन्हा जिंकून घेतला १८६५ साली पोर्तुगीजानी मराठ्यांना मागे हटविले पुढे चिमाजी आप्पानी त्याना नमविले सन १७७३ मध्ये माधवराव पेश-व्यानी हा भाग काबीज केला सरखेल कान्होजी आग्रे यानी पोर्तु-गिजांना हरवून भगवा झेंडा उरण कोटावर फडकविला

उरण-करजा बेटावरील मुख्य अवशेष, द्रोणागिरीवरील किल्ला, गार्ड हाऊस, चर्च, पाण्याचा खजिना व खारवळीच्या पूर्वेकडील बौद्ध-लेणे होय दारू तयार करण्याबद्दल उरणची प्रसिद्धी होती

उरण शहर मुबई महानगरच्या नजिकचा भाग असल्याने त्याचे महत्त्व पूर्वीपासून मोठ्या दर्जाचे आहे

उरण-मुबई हा पूल कोंकणच्या प्रगतीच्या दृष्टीने अत्यत आवश्यक असून मुबईच्या विकासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे ह्या प्रचड व भव्य पुलाची शास्त्रशुद्ध सपूर्ण योजना, जागतिक कीर्तीचे महान स्थापत्य विशारद–इजिनियर श्री जे जी बोधे यानी तयार केली आहे ह्या पाच मैलाच्या झुलत्या पुलाने मुबईचे अनेक प्रश्न सुटतील.

मुबई–कोकण राजमार्ग होईल व निसर्गरम्य कोकणाचा विकास होईल उरण जवळील न्हावा-शेवा हे आतरराष्ट्रीय बदर होईल रानसई धरणापासून मुबईस पाणी पुरवठा होऊ शकेल मुबईतील अनेक उद्योगधदेवाल्याना हे फायदेशीरच ठरेल

उरण नगरपालिकेची स्थापना १ मार्च १८६७ साली झाली शहरातील मुख्य रस्ते चागले असून नेहमी गजबजलेले असतात

उरणच्या जवळ मोरा येथे ग्राइडवेल अॅब्रासिव्ज फॅक्टरी असून अॅब्रासिव्ज उत्पादनात जागतिक स्पर्धेमध्ये प्रख्यात आहे तसेच इड-स्ट्रियल अॅब्रासिव्ज को ऑपरेटिव्ह सोसायटी या सस्थेने सुद्धा मोठी प्रगती केली आहे हे दोन्ही कारखाने उरणचे भूषणच आहेत

उरण शहराचा व्यापारधदा बराचसा मीठ व्यवसायावर अवलबून असून महाराष्ट्राला मीठ पुरविणारे एक प्रमुख केंद्र आहे या धदयाचे

दाताच्या स्वच्छतेसाठी व आरोग्याकरिता आमची चचल टुथ पावडर वापरा तसेच आमचे सुवासिक चमकदार सुहास व मिस इडिया गध वापरा
निर्माते **एम् एस. प्रॉडक्टस्**, उरण, जि कुलाबा
प्रो श्रीमती **इंदिराबाई वैजनाथ समेळ,** उरण

**इंडिया आर्ट वुडन वर्क्स**
**दहिवली–कर्जत**
आमचेकडे उत्तम प्रकारचे वुडन टाईप व रबर स्टॅपची पट्टी तयार मिळेल स्टॅप हॅंडल पण लवकरच तयार होणार आहेत
प्रो **राजकुमार शर्मा**

## शुभेच्छा
**अनंतराव पटवर्धन**
मिरज

**म धू मि ल न**
**सरकारी दवाखान्यासमोर, पेण**
सर्व प्रकारचे कोल्ड ड्रिंक्स, शुद्ध व सकस आहार असलेले फन–एन्–फूड जॉग्र आइस्क्रीम मिळेल सुसज्ज असे लॉजिंग–बोर्डींग व रेस्टॉरंट चालू करणार आहोत
प्रो **व्ही ए जाधव**

Well Wishes From
**Ms. N. R. Jethalal & Co. Panvel**

**मधुकर भोजनालय**
**पेण एस टी स्टॅंडसमोर, पेण**
स्वच्छ उपहारगृह व राईसप्लेट पद्धतीचे उत्तम भोजन मिळेल
केळकर याचा स्पेशल चिवडा मिळण्याचे एकमेव ठिकाण
प्रो **म वा केळकर**

**संगम प्रिंटिंग प्रेस**
टिळक रोड, पनवेल
लोकसत्तेचे अधिकृत एजट, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, पान तबाकू मर्चट, उदबत्ती स्पेशॅलिस्ट
**खरे ब्रदर्स,** पनवेल, जि कुलाबा

**श्रीकृष्ण बोर्डिंग** (विरुपाक्ष मदिराजवळ)
**पनवेल**
शाकाहारी जेवणाची उत्तम सोय मासिक व राईस प्लेट पद्धत आहे

**शहा भुरमल ओंकाजी**
मु पो **कर्जत,** जि **कुलाबा**
होलसेल व रीटेल कापडाचे व्यापारी बिन्नी मिल्सचे अधिकृत विक्रेते

**नंदवाणी रेडियो सर्व्हिस** तसेच **नंद वॉच**
सर्व प्रकारचे रेडिओ, घड्याळे याच्या दुरुस्तीचे विश्वासार्ह ठिकाण
प्रो **ना पु. पोथरकर**
महात्मा गाधी चौक,
स्टेशन नाका, **कर्जत**

**श्रीकृष्ण बोर्डींग अॅन्ड टी हाऊस**
**शिळफाटा, खोपोली एस. टी. स्टॅंडसमोर**
फराळाचे ताजे पदार्थ, थड पेये मिळतील.
उत्तम राईस प्लेटची सोय
फो न ७९ प्रो **के के साखरे**

**मे. लोणशीवाला मेडिकल स्टोअर्स**
**बॉम्बे–गोवा रोड, माणगाव–कुलाबा**
सर्व प्रकारची देशी, विदेशी औषधे, स्टेशनरी, सौंदर्य प्रसाधने, शेतीची अवजारे, फर्निचर, जनावराची औषधे वगैरे सर्व वस्तू मुबई भावाने मिळण्याचे दक्षिण कुलाब्यातील एकमेव ठिकाण
प्रो **अमृत डी. दोशी**

**संगम रेस्टॉरंट**
**शिळफाटा, खोपोली**
आमचे वैशिष्ट्य स्पेशल बटाटावडा व बासुंदी पुरी
जेवणाची उत्तम सोय मोठ्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील
प्रो **साखरे ब्रदर्स**

**" महाराष्ट्र वैभव " मार्गदर्शक प्रकाशनास,**
## हार्दिक शुभेच्छा
**मे. युसुफ सोडा फॅक्टरी, उरण.**

हार्दिक शुभेचछा !
**विजय सॉ मिल्स, गोरेगांव, जि. कुलाबा**
सर्व प्रकारचे इमारती सागी–इंजायली, चिरीव लाकूड योग्य दरात मिळेल.
प्रो **एस. पी. मेहता**

दृष्टीने येणाऱ्या अडचणी व सहकार्य यासाठी धी उरण सॉल्ट मर्चंटस् ॲण्ड शिलोगीज सिंडिकेट ही सस्था कार्य करते

मच्छीमारीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात असून त्यात अनेक सहकारी सस्था कार्य करीत आहेत

उरणमध्ये महाविद्यालयाची सोय नाही इग्रजी शिक्षणासाठी उरण हायस्कूल प्रसिद्ध आहे मोरे येथे एक हायस्कूल असून एक एडेड उर्दु शाळा पण आहे कन्याशाळा असून एकूण शिक्षणाची सोय चागली आहे

शहरात गोपालकृष्ण वाचनालय आहे श्रीहितवर्धक सन्मित्रमडळ, जनता सेवा मडळ, श्रीशिवकला मदिर, वनिता समाज, गुजराथी महिला मडळ, रिगल व्हॉलीबॉल क्लब, भगिनी मडळ वगैरे प्रमुख सामाजिक सस्था आहेत

उरण येथील दवाखाना हा मुबई प्रांतातील २ रा दवाखाना असून १८६० साली स्थापन झालेला आहे उरण शहरात दहा दवाखाने असून एक खाजगी सुप्रतीगृह आहे

उरण जवळ नागाव येथे गुराचा दवाखाना आहे

भिमला तलावामुळे उरणची शोभा वाढली आहे

उरण रेल्वे स्टेशन उरणपासून अर्ध्या किलोमीटरवर असून, रेल्वेने मालाची ने आण होते पॅसेजरची वाहतूक अजून सुरू झालेली नाही

उरण ते मुबई समुद्रमार्गे वाहतूक सारखी चालू असते उरणला नेव्हल आर्मामेंट डेपो (Naval Base) आहे

उरणची भिवंडीवाला बाग प्रसिद्ध आहे

उरणच्या परिसरात नद्या नाहीत

तालुक्याचे मुख्य पीक भात असून नागली व वरी पण होते जमिनीच्या हिशेबाने १३८६५ एकरात भात, ८४ एकरात नागली व २८०० एकरात वरी होते जमीनधारकांची सख्या १२४५० आहे ६४१२ एकर खारी जमीन व १०४२४ एकर गोडी जमीन आहे बागायत जमीन नाही शेतकऱ्याना पावसावरच अवलबून असावे लागते पावसाचे प्रमाण दरवर्षी सरासरी २०० मि मी इतके आहे शेतीच्या उपयोगात असणाऱ्या सुमारे १६५ विहिरी तालुक्यात आहेत व ४० तळी आहेत

तालुक्यात ४८५० बैल व गायी, २५९६ म्हशी व टोणगे, २८९६ बकऱ्या व शेळी, २९८०० कोंबडी व १५० घोडागाडी अशी जनावराची सख्या आहे

तालुक्यातील जगल विभागात खनिज सपत्ती नाही

उरणला स्टेट बँक ऑफ इडिया, महाराष्ट्र बँक जिल्हा सहकारी बँकेच्या शाखा आहेत

उरण तालुक्यात ६९ गावे असून ४२ वसाहती व २७ पायखस्त आहेत तालुक्याचे क्षेत्रफळ ७५ २ चौ मैल असून नागरी १०२२९ व ग्रामीण ४६२३३ अशी एकूण ५६४६२ लोकसख्या आहे तालुक्यात २८ ग्रामपचायती आहेत तालुक्यात राज्य सरकारी १, जि परिषद ५०, नगरपालिका ३, मदतीच्या १, अशा ५६ प्राथमिक शाळा असून त्यामध्ये ५०० मुली व ७२०० मुले अशी एकूण १२२०० मुले शिक्षण घेत आहेत शिक्षकाची सख्या ३२६ असून पैकी २४५ पुरुष व ८१ स्त्रिया शिक्षक आहेत तालुक्यात ७ माध्यमिक विद्यालये असून १०२६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत

उरण येथील सगमेश्वर महादेवाचे प्रसिद्ध देऊळ १८७२ साली बांधलेले आहे

जामा मशीद १७५० साली बाधली आहे शिवाय उरण शहरात उरणावती देवी, शितळादेवी, महादेव, शकर पार्वती, विठोबा, बालाजी, राम, गणपती, मारुती, अशा देवाची अनेक निरनिराळी सुदर देवालये आहेत मुबई महानगराच्या अगदी जवळ असल्याने लवकरच उरण हे एक मुबईचे उत्कृष्ट उपनगर होईल

## द्रोणागिरी

प्रेक्षणीय स्थळ म्हणून द्रोणागिरी पर्वताचा (किल्ला) प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल हा अतिप्राचीन पर्वत व किल्ला होय सजिवनीसाठी हनुमताने द्रोणागिरी पर्वत उचलून आणला अशी दतकथा आहे हा किल्ला अनुक्रमे शिलाहार राजे, यादव, आदिलशहा, पोर्तुगीज, कान्होजी आग्रे व नतर इग्रजाच्या ताब्यात गेला

## श्री द्रोणागिरीमाता

'श्री द्रोणागिरीमाता' हे उरण तालुक्यातील करज्याच्या रम्य परिसरातील एक पौराणिक व इतिहासप्रसिद्ध असे दैवत आहे 'श्री द्रोणागिरीमाता' ही अनेकाचे कुटुबदैवत असून जागृत व पवित्र क्षेत्र आहे येथील मुख्य यात्रा चैत्र वद्य अष्टमीला असते व नवरात्रात मोठा उत्सव असतो

## करवलीचा डोंगर

उरणच्या उत्तर भागात करवलीचा डोंगर आहे त्याच्या उच्च शिखरावर एका पीरबाबाचे थडगे आहे परिसर फारच चागला व रम्य आहे

## घारापुरी

उरण जवळील घारापुरी हे लेण्याबद्दल प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे ही लेणी बाणासूर याने तयार केली असून येथे त्याची कन्या उषा राहात असे बाणासूर हा शिवभक्त होता घारापुरी बेटावर ठिकठिकाणी मोठमोठी शिवलिंगे पडलेली दिसतात अशी दतकथा आहे इ स ८१० ते १२६० पर्यंत शिलाहार राजाची राजधानी घारापुरी येथे होती राजा पुळकेशी याने घारापुरीची लेणी खोदविली घारापुरीची उत्पत्ती, पालन व सहार या तिन्ही स्वरूपात एकवटलेली त्रिमूर्ती व कोरीव लेणी जगप्रसिद्ध आहे येथे ७ व्या शताब्दीच्या काळातील उत्कृष्ट शिल्पकलेचे नमुने पाहावयास सापडतात मुख्य लेण्यात नऊ शिल्पकृती आहेत

१) शिवाचे ताडव नृत्य, २) शिव अधकाचा वध करीत आहे, ३) शिव पार्वती विवाह, ४) गगावतरण, ५) महेश्वर, ६) अर्धनारी नटेश्वर, ७) कैलास पर्वताचा देखावा, ८) कैलास पर्वत उचलून धरलेला, ९) तपस्वी

यातील प्रलय काळचे ताडव नृत्य पाहून मती गुग होऊन जाते

## चिरनेर

उरण पासून जवळच असलेल्या चिरनेरच्या अक्कादेवीच्या डोंगरात महात्मा गाधीच्या प्रेरणेने दि २५-९-३० रोजी भारताचा

इतिहास प्रसिद्ध चिरनेरचा राजकीय जंगल सत्याग्रह झाला त्यात १२ हुतात्मे झाले म्हणून तेथे त्याच्या स्मृतीस्तव हुतात्मा स्मारक स्तंभ आहे

# पनवेल

पनवेल हा तालुका, कुलाबा जिल्ह्यातील मोठ्या तालुक्यापैकी, एक असून प्रसिद्ध आहे व्यापारी पेठ ह्या दृष्टीने सबंध जिल्ह्यात पनवेलचे महत्त्व जास्त आहे

पनवेलचे भौगोलिक स्थान उत्तर अक्षांश १८ ५८ व पूर्व रेखांश ७३ १२ वर आहे जिल्ह्याच्या उत्तरेस असल्याने मुंबई जवळ आहे

महाराष्ट्राची सात कोकणे आहेत १) लाट, २) बाग, ३) शुर्पारिकात, ४) अष्टागर, ५) कोकण, ६) गोमांतक ७) वनवासी, यापैकी शुर्पारिकात या भागात पनवेलचा समावेश आहे गेल्या सात आठशे वर्षापासून पनवेल हे कोकणातील एक प्रमुख शहर म्हणून प्रसिद्ध आहे

पुरातन काळी नाग लोकांचे राज्य होते तेव्हा या शहराचे नाव पवनपल्ली होते सन १६३७ चे सुमारास कल्याणच्या अदिलखानच्या ताब्यात हा भाग होता तेव्हा या बंदरास पावळ म्हणत यादवानी हा भाग जिंकला तेव्हा समुद्रकाठचे व्यापारी गाव म्हणून त्याचे नाव पण्यवेळा असे ठेवले त्याचाच अपभ्रंश पनवेल असा झाला असेल असे वाटते

पनवेलच्या भूमीवर अनेक घटना घडलेल्या आहेत वसईच्या लढ्यातील एक आरमारी चकमक पनवेलला झाली होती वसईचा वेढा उठवून परत जाताना चिमाजी अप्पाच्या सैन्याचा तळ पनवेलला पडलेला होता मराठ्यांच्या फौजेने कर्नल गोडार्ड याच्या हाताखालील कुशल इंग्रज सैन्याचा पनवेल जवळच पराभव केला

पनवेलच्या बाजूस मलंगड, चंदेरी, प्रबळगड, कर्नाळा, माणिकगड, असे किल्ले आहेत एके काळी कर्नाळा किल्ल्यावरून पनवेलचा राज्यकारभार होत असे

छत्रपती श्रीशिवाजी महाराजांचे लहानसे आरमाराचे ठाणे पनवेल येथे होते

इंग्रज व मराठ्यांच्या राज्याच्या सिमेवर पनवेल असल्याने मराठेशाहीच्या अखेरीस पनवेलला लढायांचा फारच उपद्रव झाला १८०३–१८०४ साली पनवेलीस फार मोठा दुष्काळ पडून अनेक माणसे मेली १८१७ साली इंग्रज व पेंढाऱ्यांची लढाई झाली व १८१८ साली कर्नाळा किल्ला इंग्रजांचे ताब्यात गेला नाना फडनिसांची पत्नी बाजीरावाचा त्रास चुकविण्यासाठी इंग्रजांचे आश्रयासाठी काही दिवस पनवेल येथे राहात होती ती ज्या वाड्यात होती तेथेच हल्ली धूत पापेश्वर रुग्णालय आहे

इ स १५७० साली पनवेल बंदराचा, युरोप देशाशी व्यापार चालत असे विस्तीर्ण धक्क्याशिवाय बंदराच्या प्राचीन व्यापाराचे आज अवशेष उरले नाहीत

पनवेलमध्ये अनेक धर्म मंदिरे आहेत त्यात विरुपाक्ष, महादेव मंदिर, श्री बल्लाळेश्वर मंदिर, श्रीराम मंदिर, श्रीकृष्णेश्वर मंदिर, श्रीरामेश्वर मंदिर, बालाजी मंदिर, विठ्ठल मंदिर तसेच पीर करमल्ली, पीर वाळुमिया, पीर शाहुजमाल, असे तीन दर्गे व चार मशिदी असून एक इस्माईल देऊळ प्रसिद्ध आहे

वडाळे तळे, विश्राळे तळे, कृष्णाळे तळे, लेंडाळे व दुदोळे अशी सहा तळी आहेत व चार धर्मशाळा आहेत

पनवेलपासून पूर्वेकडे जवळच गाढी नदीला बंधारा बांधून पिण्याचे पाणी पनवेलला पुरविले जाते

गेल्या शतकापासून पनवेलचे नाव बैलगाड्यांच्या चाकजोड्या बनविण्याबद्दल प्रसिद्ध आहे आजही पनवेलच्या चाकजोड्या सर्व महाराष्ट्रभर वाखाणल्या जातात महाराष्ट्रात पनवेल खेरीज चाकजोड्यांचे कारखाने इतरत्र फारसे नाहीत

येथील धूतपापेश्वर औषधी कारखाना हा भारतातील आयुर्वेदीय औषधे बनविणारा सर्वांत जुना व प्रसिद्ध कारखाना आहे.

तालुक्याचे मुख्य उत्पन्न भाताचेच असून, भात सडून तांदूळ करावे लागतात म्हणून, अनेक गिरण्या आहेत पनवेल शहर व तालुका मिळून ५५ गिरण्या आहेत जिल्ह्यातील एक तृतियांश गिरण्या पनवेल तालुक्यातच आहेत तसेच पाच पोहा मिल्स पण आहेत

सॉ मिल्स पण असून, कौलांचे, विटांचे, व रंगीबेरंगी कृत्रिम फरशी बनवण्याचे कारखाने पण आहेत

पनवेलमध्ये एक ज्ञान व विज्ञान महाविद्यालय असून १ मुलांचे व १ मुलींचे हायस्कूल पण आहे प्राथमिक शाळेची सोय पण चांगली आहे स्वतंत्र उर्दु व गुजराती शाळा आहेत बेसीक ट्रेनिंग कॉलेज व औद्योगिक प्रशिक्षण संस्था पण आहे तालुक्यात १०० चे वर प्राथमिक शाळा आहेत

जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे वाचनालय पनवेललाच आहे

पनवेलमध्ये वैद्यकीय मदत देणाऱ्या संस्थेत श्रीधूतपापेश्वर आयुर्वेद रुग्णालय प्रमुख असून, त्याशिवाय म्युनिसिपल हॉस्पिटल, मिशन हॉस्पिटल व माता बाल संगोपन मंडळे आहेत

कुष्ठरोग निवारण समिती पण आहे

पनवेल व्यायाम प्रसारक मंडळ, कन्या आरोग्य मंडळ, कन्या आरोग्य मंदिर, हनुमान व्यायाम मंदिर अशी व्यायामाच्या क्षेत्रातील मंडळे आहेत

बहिश्याल शिक्षण केंद्र, पनवेल भगिनी समाज, पांजरपोळ, गोरक्षण संस्था, दि मिडल् क्लास को ऑ हौसिंग सोसायटी वगैरे सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था आहेत

याशिवाय लायन्स व रोटरी क्लब आहेतच

पनवेल तालुक्याचे क्षेत्रफळ २१५ २ चौ मैल असून त्यात एकदर १९८ खेडेगाव आहेत खेडेगावात ११९७६ घरे आहेत तालुक्याची एकूण लोकसंख्या ९१३८६ असून त्यापैकी खेडेगावांमध्ये ७६५२५ लोकसंख्या पैकी ३८९९१ पुरुष व ३७५३४ स्त्रिया आहेत पनवेल शहरात सुमारे १५०० घरे आहेत लोकसंख्या सुमारे १६००० आहे.

गोवा सत्याग्रहात आत्मबलिदान करून अमर झालेले कै हिरवे गुरुजी पनवेलचेच

मुंबई पासून जवळ ४० मैलावर मुंबई-पुणे व मुंबई-गोवा या राष्ट्रीय राजमार्गावर पनवेल असून, वाहतुकीची प्रचंड प्रमाणात सोय, नवीनच रेल्वे स्टेशनपण झाल्याने व सोयी उपलब्ध झाल्याने पनवेलचे भविष्य उज्वल आहे असेच म्हणावे लागेल।

## रसायनी

पनवेल पासून १३ मैलावर रसायनी येथे भारत सरकारचा हिंदुस्थान औद्योगिक केमिकल्स या नावाचा फार मोठा कारखाना आहे आजु-बाजूचा परिसर अतिशय रम्य आहे तसेच महाराष्ट्र सरकार तर्फे महाराष्ट्र अॅग्रि-इडस्ट्रिज डेव्हलप्मेंट कॉर्पोरेशनचा खत कारखाना पण आहे

## चंदेरी फोर्ट

मगलगड व पेब या दोन डोगरामध्ये हा किल्ला आहे वर जाण्यास कच्च्या वाटा आहेत

## गुळसुंदे

पनवेल पासून दक्षिणेकडे सुमारे दहा मैलावर सिद्धेश्वराचे सुदर मदिर आहे मदिर पाताळगगा नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे हे मदिर पेशव्याचे गव्हर्नर रामजी महादेव यानी बाधले आहे येथे महाशिवरात्रीस मोठी जत्रा भरते मोठी धर्मशाळा आहे जवळच लक्ष्मीनारायणाचे मदिर आहे

पाताळगगा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर कराडे गावात रामेश्वराचे मदिर आहे

गुळसुदे गावाच्या परिसरात आंब्याची व फणसाची दाट व अतिशय रम्य झाडी असून, आल्हाददायक हवा असल्याने औट डोअर शुटिंगसाठी अनेक सिनेव्यवसायिकाना व प्रवाशाना हे स्थान फारच आवडते

## कर्नाळा किल्ला

पनवेलच्या दक्षिणेस आठ मैलावर १५६० फूट उचीवर हा किल्ला आहे मुबई-गोवा या रा रा मार्गावरून हा किल्ला दिसतो व शिर-ढोणपासून पायी जाण्याचा कच्चा रस्ता आहे किल्याचा परिसर 'राखीव पक्षीवन' आहे

## शिरढोण

मुबई-कोकण-गोवा रा रा मार्गावरच हे गाव असून येथून कर्नाळा किल्ल्यास जाता येते आद्य क्रांतीकारक कै वासुदेव बळवत फडके याचे हे जन्मग्राम स्मारक समितीने महाराष्ट्र सरकारच्या मदतीने या गावात त्याचे स्मारक म्हणून दीपस्तभ उभा केला आहे तसेच ४०००० रु खर्चून तीन खोल्यांची इमारत स्मृती मदिर म्हणून बांधली आहे एकात प्रसुतीगृह व दुसऱ्या खोलीत बकऱ्याची गाडी व तिसऱ्यात ऑफिस आहे येथे सर्व क्रातीकारकाचे फोटो लावण्याचे प्रयत्न चालू आहेत

## नेरे

पनवेलपासून ६ मैलावर हे गाव आहे प्रख्यात निर्भिड लोकसभा-सदस्य, हिंदुत्वनिष्ठ कै ना भा खरे याचे जन्मग्राम.

## माणिकगड

पनवेलच्या दक्षिणेस पधरा मैलावर स स पासून १८७८ फूट उचीवर हा किल्ला आहे जुने अवशेष काही नाहीत

## पळस्पे

पनवेलपासून सुमारे २॥ मैलावर हे लहानसे गाव आहे या ठिकाणी झोशे यांनी बाधलेले एक सुदर देऊळ व घाट आहे हे गाव मुबई–कोकण गोवा या राष्ट्रीय मार्गावर आहे

## पेबकिल्ला

पनवेलच्या उत्तरेस ९ मैलावर सुमारे १००० फूट उचीवर हा किल्ला आहे या किल्याला विकटगड असेही म्हणतात पायथ्याशी मालडुगा गाव आहे नेरळपासून सहा मैलावर आहे पायथ्याशी पेबी देवीचे देऊळ आहे किल्यावर गणपतीचे देऊळ आहे किल्यावर पाणी असून काही घरे आहेत

# खालापूर

**खालापूर** तालुका हा काही वर्षांपूर्वीच स्वतत्र तालुका म्हणून करण्यात आला

हा तालुका क्षेत्रफळाच्या मानाने फारच लहान आहे तालुक्याचे ठिकाण असूनही खालापूर लहान गाव आहे

खालापूर हे गाव सेनापती खोळेश्वर यानी स्थापिल्याने याला खेळापूर असे नाव पडले, तेच पुढे खालापूर झाले

येथेच परशरामभाऊ पटवर्धन यानी इग्रजी फौजेचा पराभव केला होता हेच या गावचे ऐतिहासिक वैशिष्टच

तालुक्याचे एकूण क्षेत्र १००३४९ एकर आहे त्यात ३५४८८ एकर जगल भाग २५० एकर फळभाग व ६०० एकर भाजीपाला भाग आहे उत्पन्नाखाली २१३८८ एकर शेती असून पैकी १९४३६ एकरात भात, ७५८ एकरात नागली व ४३४ एकरात वरी व ७०० एकरात इतर पीक होते तालुक्याचे प्रमुख उत्पन्न भात आहे तालु-क्यात पावसाचे प्रमाण सुमारे १५० इच आहे तालुक्यात दूध दुभती जनावरे १५००० आहेत दोन कुक्कुट पालन केंद्रे आहेत

तालुक्यात १४० खेडी असून २२ ग्रामपचायती आहेत त्यातील ८५ गावांतून ८९ प्राथमिक शाळा आहेत पैकी ८४ मराठी व ५ उर्दु आहेत तालुक्यात २ हायस्कुल्स आहेत.

खालापूर व खोपोली येथे प्रत्येकी एक अशी एकूण दोन साधारण ग्रथालये आहेत

तालुक्याची लोकसख्या सुमारे ६५००० असून त्यात १३०० हरिजन व सुमारे १५००० आदीवासी आहेत

तालुक्यात १८ उद्योगधदे असून त्यात ११ मोठे व ७ लहान आहेत

मुबई–पुणे हा रा रा मार्ग या तालुक्यातून जातो

## खोपोली

खालापूर तालुक्यात मुबई– पुणे या रा रा मार्गावर प्रचड सह्याद्रीच्या निसर्गरम्य पायथ्याशी हे महत्त्वाचे प्रसिद्ध शहर आहे पूर्वी या गावाचे नाव 'कपोळी' असे होते खोपोली हे रेल्वे स्टेशन आहे औद्योगिक दृष्टीने हे गाव सुधारलेले असून येथे १) टाटा इलेक्ट्रिक पॉवर हाऊस २) पेपर अॅन्ड पल्प कन्व्हर्शन लि (पेप्को)

**आटवणे ब्रदर्स**
डीलर्स अँड सप्लायर्स. मगलोर कौले, लादी टाईल्स, इमारती सामान, इलेक्ट्रिकल गुडस्, पाईप फिटिंग्ज, पेंटस्, हार्डवेअर वगैरे.
४५८, टिळक रोड, पनवेल, जि. कुलाबा

**भानुशाली ब्रदर्स**
मिरची गल्ली, पनवेल (कुलाबा), फो. नं. ४७७
सर्व प्रकारचा जुना व नवा बारदाना, सिमेंट गोणीचे व्यापारी व कमिशन एजट

**रंजना रेडिमेड क्लॉथ स्टोअर्स**
३०, भाजी मार्केट, पनवेल
लेटेस्ट डिझाईनचे तयार कपडे, लेटेस्ट फॅशनच्या साड्या व सर्व प्रकारचे कापड आणि होजियरी मिळण्याचे ठिकाण

फो. न. ४२१ **ज्योती आहार भवन** मिरची गल्ली, पनवेल
बंगाली मिठाई, गोल्डन काजू बर्फी, उत्तम पेढे, स्पेशल हेमामालिनी चिवडा व इतर प्रकारची उत्कृष्ट मिठाई व फरसाण मिळण्याचे पनवेलमधील एकमेव ठिकाण.

**Mohamad Hussain**
**Abdul Kadir Bakshi & Co**
Timber, firewood, Charcoal & Timber Merchant
**Phone No. 3 URAN**

हे एक लहान खाडीचे बदर आहे येथे ४१३ फूट उच डोगरावर ८०० वर्षे पुरातन असे मल्लिकार्जुन सिद्धेश्वराच स्वयभू मदिर आहे तसेच प्रसिद्ध गणपतीचे मदिर असून, मूर्तीचा वरचा भाग पुरुषाकृती व खालचा भाग स्त्रीकृती आहे, अशा प्रकारची मूर्ती सबध भारतात तरी नाही असे म्हणतात २०० वर्षापूर्वीचे सुदर विठ्ठल मदिर आहे मदिराच्या खाबाची शिल्पकृती फारच उत्कृष्ठ आहे दाऊद मलिक या पीराचा दर्गा आहे

गावात जुने व प्रसिद्ध तीन तलाव आहेत १) गाव तलाव (१२ एकर) २) विष्णू तलाव (८ एकर) ३) राम तलाव (४ एकर) सुमारे ४०० वर्षांपूर्वी अधिकारी, देसाई, पोतदार ही घराणी येथे राहण्यास आली कै वीर वामनराव जोशी याचे स्मरणार्थ येथे 'ज्ञान विकास' नावाचे उत्कृष्ट वाचनालय आहे महिला उत्कर्ष मडळीतर्फे येथील प्रसूतीगृह उत्तम चालविले जाते

**वरदेश्वर :** शकराच्या देवळात उभा नदी सहसा कुठे आढळत नाही, पण असा उभा नदी गोरेगाव (जि कुलाबा) येथे आहे हा नदी श्रीवरदेश्वर नावाच्या शकराच्या देवळात असून तो एकाच अखड दगडातून घडविलेला आहे नदीची आकृती प्रमाणबद्ध व सुबक असून, गळ्यातील घटा, पाठीवरील झूल, घुगुराची माळ वगैरे कोरीव काम हुबेहुब व प्रेक्षणीय आहे आणि विशेष म्हणजे हा नदी सुमारे १५० ते २०० वर्षापूर्वी स्थानिक कलावतानीच घडविलेला आहे श्रीवरदेश्वराचे देवळात उभ्या नदीची प्रतिमा का घडविली त्याबद्दलची आख्यायिका गोरेगावातील जुने लोक सागतात ती अशी–

गोरेगाव (जि कुलाबा) येथे मल्लिकार्जुन नावाचे एक शकराचे प्राचीन देवस्थान एका टेकडीवर आहे सखाराम जगन्नाथ उपाध्ये ह्या नावाचे गोरेगावचे एक गृहस्थ ह्या मल्लिकार्जुनचे परमभक्त होते रोज सकाळी शकराला बेलाचे पान वाहून त्याचे दर्शन घेतल्याशिवाय अन्नपाणी घ्यायचे नाही असा त्यांचा नेम होता बरीच वर्षे हा त्याचा नेम व्यवस्थित सुरू होता पुढे वृद्धापकाळामुळे त्याना टेकडी चढून जाववत नाहीसे झाले तरीही ते हळूहळू तसेच जात असत पण एक दिवस असा उगवला की, टेकडी चढून जाणे त्याना अशक्य झाले अर्धी टेकडी चढल्यावर डोळ्यापुढे अधारी येऊ लागली तेव्हा त्यानी तिथेच बेलाचे पान ठेविले व शकराला प्रार्थना केली की, 'आयुष्यभर तुझे दर्शन घेतल्याशिवाय अन्नपाणी ग्रहण केले नाही, पण आता वृद्धापकाळामुळे मात्र तुझे दर्शन घेणे शक्य होईल असे वाटत नाही, तेव्हा आजचे माझे हे शेवटचे बेलाचे पान गोड मानून घे' ते घरी आले, आणि त्याच रात्री त्याना स्वप्नात श्रीशकरानी दर्शन देऊन सागितले की, 'जर तुम्हास टेकडी चढून येऊन माझे दर्शन घेणे शक्य होणार नसेल तर मी खाली येऊन तुमच्या सन्निध राहीन, म्हणजे तुमच्या क्रमात खड पडणार नाही'

ह्याच सुमारास श्री उपाध्ये ह्यांच्या घरासमोर म्हणजे हल्ली जेथे श्रीवरदेश्वराचे देऊळ आहे, तेथे देवीचे देऊळ बाधण्याकरिता पाया खोदण्याचे काम चालू होते खणता खणता एका मजुराची कुदळ एका खडकावर आपटली व तिथून रक्त झिरपू लागले मजूर घाबरले व ते धावत समोर उपाध्ये याजकडे येऊन ही हकीकत सागू लागले. श्री उपाध्ये याना रात्री झालेल्या दृष्टाताची आठवण झाली त्यानी लगेच तिथ जाऊन शकराची प्रार्थना केली व गावकऱ्याना सागून देवीचे देऊळ बाधण्याचे काम स्थगित करून तिथच श्रीशकराची प्रतिष्ठापना करण्याच्या कामाला सुरुवात केली ज्या खडकाला कुदळ लागली व रक्त ठिबकू लागले त्याच अखड कातळातून शाळुकीसह शकराची पिंडी घडविलेली आहे जिथ कुदळ लागली ती खूण अद्याप पिंडीवर दिसते शकर नदीवर बसून टेकडी उतरून खाली आले व त्यांची वाट पहात नदी उभा आहे ह्या भावनेने उभ्या नदीची प्रतिमा ह्या देवळात आहे असा उभा नदी सबध भारतात कुठे असल्याचे ऐकिवात नाही ह्या देवस्थानाचे नाव कागदोपत्री सिद्धेश्वर असे लावलेले आढळते पण भक्ताना वर देण्याकरिता श्रीशकराचे आगमन झाले म्हणून मागाहून लोक ह्यालाच श्रीवरदेश्वर म्हणू लागले

महाशिवरात्रीला मोठा उत्सव होतो व महाप्रसाद वाटण्यात येतो उभा नदी हे गोरेगावचे भूषण आहे

सौ **निर्मला विजय गोखले**
गोरेगाव

## खारीवली

खडोजी मापकराचे हे गाव हे कान्होजी आंग्रे व पेशव्याचे मातब्बर नोकर होते येथे मापकर पिता पुत्राच्या दोघाच्याही दोन समाध्या जवळ जवळ आहेत मापकराचा जुना वाडा अजूनही चागल्या अवस्थेत आहे

## पाटणूस

येथे टाटा कपनीचा विजेचा कारखाना आहे

## मानगड

तालुक्यातील सर्वात लहान किल्ला हा किल्ला माणगाव पासून ८ मैलावर आहे हा किल्ला श्रीशिवाजीराजानी बाधला आहे

**आसरा लॉज** फोन न ३३
**मारुती नाका, अलिबाग**
राहण्याची, भोजनाची उत्तम व्यवस्था, स्वादिष्ट फराळाचे ताजे पदार्थ मिळतील तसेच मगलोरी कौले, शहाबादी लादी व नेरूचे व्यापारी

**संजय न्यूज एजन्सी**
**बाजार पेठ व एस टी बुक स्टॉल, अलिबाग**
सर्व वृत्तपत्रांचे एकमेव विक्रेते, मासिके, दिवाळी अक, धार्मिक पुस्तके तसेच महाराष्ट्र राज्य लॉटरीची तिकिटेही मिळतील
प्रो **एम्. पी. कवै**

**महाराष्ट्र जनरल स्टोअर्स** फोन ६९
**बाजार पेठ, अलिबाग**
अत्याधुनिक फॅशनचे रेडिमेड कपडे टेरिलीन व टेरिकॉट कापड ९ वारी, ६ वारी साड्या, कापूस, होजीयरी, छत्र्या, रेनकोटस्, मॅचिंग ब्लाऊज पिसेस वगैरे माल योग्य दरात मिळेल

**जयहिन्द रेस्टॉरंट**
**एस. टी. स्टॅन्ड जवळ, अलिबाग**
फराळाचे ताजे व स्वच्छ पदार्थ, कोल्ड्रिंक्स तसेच राईस प्लेट व उत्तम भोजनाची व्यवस्था कोका कोलाचे अधिकृत एजन्ट

सरकारमान्य **दांडेकर टाइप रायटिंग इन्स्टिट्यूट, अलिबाग**
टाईपिंगची हरप्रकारची कामे मराठी व इंग्रजी पोस्टाने पाठविल्यासही करून देऊ

**हायक्लास हेअर ड्रेसर्स, लेन आळी, पनवेल**
सर्व प्रकारचे काम समाधानपूर्वक केले जाते
प्रो **गुलाब विठ्ठल सातारकर**

महाराष्ट्र वैभव प्रकाशनास हार्दिक शुभेच्छा.
स्थापना १९३५) **पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पेण,** जि. कुलाबा (फोन न ४
शाखा **वडखळ,** फोन ८ (पी. पी.)
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातील

**करंजा मच्छिमार वि. का. स. सोसायटी लि.** करंजा–उरण, जि. कुलाबा
हेड ऑफीस **करंजा** फोन न १०७ * ब्रँच **ससून डॉक, कुलाबा** फोन न २१३२८१
मच्छिमार व्यवसायाच्या सर्वांगीण गरजा वेळेवर व स्वस्त दराने पुरविणारी सर्वोत्कृष्ट संस्था
वैशिष्टये– इंडियन ऑईल, गरवारे नारफील, डाबर व होड्याना लागणारा सर्व प्रकारचा माल मुबलक प्रमाणावर मिळेल

**कृष्णा हरिश्चंद्र कोळी** मेक्रेटरी — **बा क. पाटील** व्हॉईस चेअरमन — **धर्मा दादू कोळी** चेअरमन

|| **श्रीभुवनेश्वर प्रसन्न** ||

**भुवनेश्वर सहकारी भात गिरणी व खरेदी विक्री करणारी मंडळी लि.**
खारेपाट विभाग, मु. शिरवली, पो. हाशिवरे, ता. अलिबाग, जि. कुलाबा

श्री **शं ना. मोकल** मॅनेजर

श्री **शं. भि. पाटील** चेअरमन

## नांदवी

एके काळी हे गाव कोळी राजा नदा याची राजधानी होते असे म्हणतात हे गाव सावताचे म्हणून ओळखले गेले तरी पेशव्याच्या व सिद्दीच्या ताब्यात होते अजून येथे जुनी घरे आहेत येथे नगारेश्वराचे जुने मदिर आहे

## निजामपूर

माणगावच्या उत्तरेस ८ मैलावर हे लहानसे गाव आहे गावात दगडाने बाधलेले एक लहानसे तळे आहे येथे हेमाडपथी नमुन्याचे मोठे जुने देऊळ आहे पण त्याचे दगड पळविले गेले आहेत या गावाचे पूर्वीचे नाव निशामपूर असे होते

## गंगावली

हे गाव माणगावच्या पूर्वेस चार मैलावर आहे. याचे ऐतिहासीक महत्त्व म्हणजे ज्यावेळी सभाजी राजेना पकडण्यासाठी चौफेर शत्रू टपून फिरत होते त्यावेळी त्यानी आपल्या येसूबाई राणींना गर्भावस्थेत एका झोपडीत ठेवून निघून गेले त्याच झोपडीत नतर त्या बाळत होऊन त्याना पुत्रलाभ झाला तो पुत्र म्हणजेच छत्रपती श्रीशाहू महाराज होय त्या झोपडीच्याच ठिकाणी पुढे नानासाहेब पेशव्यानी श्रीशिवमदिर बाधले आजही ते मदिर चागले आहे

## तळागड

तळ्यापासून ४०० फूट व स स पासून १००० फूट उचीवर हा किल्ला आहे किल्ल्यावर १६ निरुपयोगी जुन्या तोफा आहेत त्यापैकी काहीवर अतिशय सुदर नक्षीकाम केलेले आहे डोंगरावर काही बाजूस दाट झाडी आहे व काही बाजूस लहान झुडपे आहेत किल्ल्यावरून परिसराचा उतम देखावा दिसतो

## तळा

माणगावपासून उत्तरेकडे ११ मैलावर हे गाव आहे गावात जुनी ५ तळी आहेत आजुबाजूच्या गावाना हे बाजारपेठेचे गाव आहे

## ताम्हणे

गोरेगावच्या उत्तरेस हे गाव आहे येथे गुजर लोकाची वस्ती जास्त आहे श्री शिवाजीराजाचे सरसेनापती प्रतापराव गुजर याचे हे जन्मग्राम

## टोळ

हे खेडेगाव परशुराम मदीराचा खर्च भागविण्यासाठी सिद्दीने ब्रम्हेंद्र स्वामीना इनाम दिले होते सध्या इनाम राहिले नसून श्री पाटणकर (वशपरपारिक) तेथे राहात असून तेच मदिराची व्यवस्था बघतात दासगाव व गोरेगाव याच्यामध्ये हे गाव आहे

## विश्रामगड

माणगावपासून उत्तरेकडे १३ मैलावर स स पासून २००० फूट उचीवर हा किल्ला आहे वर कुर्दवा देवीचे देऊळ आहे म्हणून याला कुर्डु किल्ला असे पण म्हणतात कुर्डु हे येसाजी कक याचे गाव किल्याचे पण हेच सरदार होते किल्ल्याचे पाठार अगदीच लहान असून त्यास नैसर्गिक सरक्षण आहे

## कुडे–मांदाड

माणगावपासून वायव्येस १३ मैलावर कुडे हे गाव आहे येथे २५० ते ३०० फूट उचावर ६०० फुटाच्या परिसरात २७ गुफा व ११ कोरकाम केलेले गाळे विखुरलेले आहेत काही वर व काही खाली अशा दोन रागा आहेत कुडे–मांदाडपर्यंत बसने जाण्याची सोय आहे तळ्याच्या सुप्रसिद्ध ऐतिहासिक किल्यापासून ८ मैलावर ह्या गुफा आहेत ह्या गुफा अजठा व वेरूळ याच्या अगोदरच्या काळातीलच्या आहेत कलेच्या दृष्टीने त्याच्याइतके नसल्या तरी कमी दर्जाच्या नाहीत

१) शिवभूतीच्या गुहा, २) गुहा न १ ची पुरक ३) शिवभूतीची खाजगी ४) सभागृह ५) योग निवास ६) चैत्य गृह ७) निवाऱ्याची जागा ८) खजिना खोली ९) चैत्य मदीर १०) रहिवासी गुहा ११) दिवाणखाना १२) रहिवासी गुहा १३) बैठकीची गुहा १४) रहिवासी गुहा १५) पुजाऱ्याची गुहा १६) चैत्य गृह, १७) ते २७) या सर्व रहिवासी गुहा आहेत

कुडे–मादाड समोरचा प्रदेश झाडीने भरलेला आहे पश्चिमेस समुद्र, तलावाप्रमाणे दिसणारी राजापूरची खाडी, समुद्रात दिसणारा जजिरा किल्ला, दुसऱ्या बाजूस तळे त घोसाळे किल्ले असा अतिशय सुदर, निसर्गरम्य देखावा दिसतो येथील लेणी या जिल्ह्यातील सर्व लेण्यात दर्शनीय व पुरातन आहेत

# महाड

**कुलाबा** जिल्ह्याचे दक्षिण टोक म्हणजे महाड तालुका होय तालुक्याचे क्षेत्रफळ २७१ १ चौ मैल असून तालुक्यात १६७ खेडी आहेत व ६४ ग्रामपचायती आहेत लोकसख्या सुमारे १,२५,००० आहे क्षेत्रफळाच्या दृष्टीने हा तालुका मोठा असून डोंगराळ आहे व त्यामुळे लोकवस्ती दूरवर पसरली आहे

महाडचे जुने नाव महिकावती असे होते हे गाव सावित्री नदीच्या उजव्या काठावर वसलेले आहे तेथून जवळच असलेल्या पाळे व कोल या गावी बुद्धकालीन पुरातन लेण्या आहेत सुमारे १३५८ च्या सुमारास येथे गव्हाचा व मद्याचा मोठा व्यापार चालत असे श्रीछत्रपतींच्या काळात हे जास्त भरभराटीस आले छत्रपती नेहमी येथे राहात असत. सन १६५१ मध्ये बाजी सम्राजच्या नेतृत्वाखाली मोगलाचे मोठे सैन्य श्रीशिवाजी राजेना पकडण्यासाठी येथे आले होते, परतु राजानी त्याचा पराभव केला महाडवर १६८२ मध्ये जजिऱ्याच्या सिद्दीने वारवार हल्ले केले व शेवटी दादाजी रघुनाथच्या पत्नीस पकडून नेले सन १७९६ मध्ये नाना फडणीस नी महाड येथेच इग्रजाशी व निजामाशी करार केला तोच महाडचा करार होय सन १८०२ मध्ये होळकरानी पुणे ताब्यात घेतल्यावर दुसरे बाजीराव पेशवे सुमारे ८००० सैन्य घेऊन रायगडावर आले तेव्हा महाड येथेच राहिले व तेथूनच त्यानी त्या वेळच्या मुबई गव्हर्नरास् पत्र पाठवून कुटुबियांना सुवर्णदुर्गास सुरक्षित पाठविण्याची विनती केली परतु तेथील किल्लेदाराने त्यांना आश्रय नाकारला होळकर पार खिंडीतून महाडला येत आहेत असे कळल्यावरून पेशवे खडेराव रास्ते याच्या मदतीने सुवर्ण दुर्गाकडे गेले.

## जयहिंद उपहारगृह

**म्युनिसिपल जकात नाक्यासमोर, खोपोली फाटा**

ताजे व स्वच्छ फराळाचे पदार्थ व उत्कृष्ट राईस प्लेट व थंड पेये मिळण्याचे एकमेव ठिकाण चहा, कॉफी, स्पेशालिस्ट, एकवेळ अनुभव घेऊन खात्री करा प्रो **आर. वी. शहाणे**

## वि ना रे स्टॉ रं ट

**पुणे–धरमतर रोड, पेण**

आमचेकडे चहा-कॉफी, ताजे व स्वच्छ फराळाचे पदार्थ व घरगुती पद्धतीचे सुग्रास भोजनही मिळते राईस प्लेट पूर्ण दिवस चालू असते एक वेळ अनुभव घ्या व खात्री करा

## आदर्श गृह उद्योग केंद्र

**गोरेगांव, जि. कुलाबा**

घरगुती पद्धतीने तयार केलेले आंबा लोणचे, मिरची लोणचे, लिंबू लोणचे, पोहा पापड, उडीद पापड वगैरे उत्कृष्ट व चविष्ट पदार्थ नेहमी तयार मिळतील एकवेळ अनुभव घेऊन पाहाच अनुभव हाच खात्रीचा पुरावा

## मे. प्रकाश वस्तू भांडार

**गोरेगाव, जि. कुलाबा**

सर्व प्रकारची स्टेशनरी व इलेक्ट्रिक सामान योग्य भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण :– शाखा **माणगाव**

इलेक्ट्रीक सामान व रेडियो रिपेअरची खास सोय

## यशधन प्लॅस्टिक इंडस्ट्रिज, गोरेगाव, जि. कुलाबा

आमचेकडे सव प्रकारच्या ब्रीफ केसेस, लेदर बॅग्ज् व लेडीज पर्सेस मनपसंत तयार स्टॉकमधून अगर ऑर्डरनुसार बनवून मिळतील तसेच सर्व प्रकारच्या सूटकेसेस पर्सेस रिपेअर करून मिळतील मालाची एक वर्षाची गॅरंटी मिळेल अनुभव घेऊन पाहाच

प्रो **जोशी** ॲन्ड **धनशे**

## नूतन इलेक्ट्रॉनिक्स बाजार पेठ, गोरेगांव, जि. कुलाबा

सर्व प्रकारचे रेडियो, ट्रॅन्झिस्टर्स, टेपरेकॉर्डस खात्रीशीरपणे दुरुस्त करून मिळतील प्रो **जे. जे. शाह**

## मनोहर लॉंड्री, वहिरी पेठ, गोरेगांव, जि. कुलाबा.

आमचे येथे टेरिलिन, टेरिकॉट कपडे उत्तम प्रकारे धुवून मिळतील उत्तम धुलाईसाठी कपडे देऊन खात्री करा

प्रो **मनोहर** ॲन्ड **प्रकाश**




## सौंदर्यप्रसाधनांतून केशरचना...

आकर्षक व कलात्मक केशभूषा करण्याकरिता एक सौंदर्यप्रसाधन, एवढेच नव्हे, तर केसाच्या आरोग्यपूर्ण भरदार वाढीसाठीं प्रकाशचे माका तेल आज सर्वमान्य ठरले आहे.

- केस काळेभोर होतात
- केस गळणे थांबते
- डोळ्याची आग थांबते
- शांत झोप लागते
- शास्त्रोक्त पद्धतीने तयार होते

**प्रकाशचे माक्याचे तेल** आयुर्वेदिक

**प्रकाश ट्रेडिंग कंपनी** गोखले रोड (नॉर्थ), मुंबई २८.

२४ एप्रिल १९१८ ला महाड इंग्रजांच्या ताब्यात गेले महाड त्यावेळेस अत्यंत महत्त्वाचे व मोठे व्यापारी ठिकाण होते

तालुक्यात महाड हेच चागले सुधारलेले शहर आहे याची रचनाही अलीकडे चांगली बनविली आहे हे पहिल्यापासूनच मोठे व्यापारी केंद्र आहे येथे मराठी व इंग्रजी शिक्षणाची उत्तम सोय असून एक प्रख्यात महाविद्यालयही आहे

तालुक्यात ३ हायस्कूल्स व २६० प्राथमिक शाळा आहेत कऱ्हाड-हून पुणे येथे जाण्यास वरंध घाटातून स्वतंत्र रस्ता आहे मुंबई-कोकण-गोवा हा रा रा मार्ग ह्या तालुक्यातूनच जातो महाडहून महाबळेश्वर मार्गे एक रस्ता सातारा जिल्ह्यात व दुसरा खेड-चिपळूण मार्गे रत्नागिरीला जातो याचे लगत दक्षिणेस रत्नागिरी व पूर्वेला सातारा जिल्हा येतो

गांधारी, सावित्री व काळ या तीन नद्या या तालुक्यातून वाहतात

जमीन कमी प्रतीची व लोकसंख्येच्या मानाने फारच अपुरी आहे बहुतेक भाग डोंगराळ असल्यामुळे, पाण्याची सोय नाही, उद्योगधंद्यास फारसा वाव नाही आर्थिक दृष्ट्या हा तालुका फार खडतर आहे सैन्यात भरती होण्याबद्दल हा तालुका आघाडीवर आहे महाड येथे उत्तम वाचनालय आहे

चवदार तळे, विश्वेश्वर तळे, हापूस तळे अशी तीन प्रसिद्ध तळी आहेत चवदार तळ्याच्या बुडाशी १४ विहिरी आहेत

जुन्या व चांगल्या देवळांपैकी विश्वेश्वर मंदिर, महिकावती देवीचे मंदिर ही दोन देवालये प्रसिद्ध आहेत

महाड येथील श्रीहनुमान लोकमान्य व्यायाम शाळा, तिच्या पाठीमागे ५० वर्षांचा इतिहास आहे अशी कुलाबा जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे

स्वातंत्र्य लढ्याच्या असहकार चळवळीच्या मोर्चावर १०-९-१९४२ रोजी जो गोळीबार झाला त्यात अग्रणी असलेले वसंत दाते हे गोळी लागून हुतात्मा झाले, त्याच्या नावाने वीर वसंत दाते म्हणून स्मारक चौक आहे

सन १९३० मध्ये दलितोद्धारक डॉ आंबेडकर यांनी हरिजनांसाठी पिण्यास पाणी सर्वांबरोबर मिळावे म्हणून जो ऐतिहासिक सत्याग्रह केला तो याच शहरातील चवदार तळ्यावर

शिवाजी राजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना ज्या रायगड किल्ल्यावर केली, त्याच किल्ल्याच्या पायथ्या जवळ भारतातील कोट्यावधी दलितांच्या चळवळीची स्थापना महान् घटनाकार डॉ आंबेडकर यांनी केली हा योगायोगच नव्हे काय !

महाराष्ट्राची राजकीय पंढरी 'किल्ले रायगड' याच तालुक्यात आहे

## बीरवाडी

इतिहाससंशोधक म म श्री दत्तो वामन पोतदार यांचे जन्मग्राम

## पाले

महाडच्या उत्तरेस २ मैलावर हे गाव असून सध्या महाडचे उपनगरच आहे हे गाव बौद्ध नमुन्याच्या जुन्या २९ लेण्यांबद्दल प्रसिद्ध आहे

## साव

मराठी ग्रं - महालय ठाणे २२६९८ ग्रुप्रवास ५९८

महाडच्या पश्चिमेस २ मैलावर आणि दासगावच्या पूर्वेस २॥ मैलावर हे गाव आहे या ठिकाणी ऊन पाण्याचे जवळ जवळ ३ झरे आहेत हे गाव सावित्री नदीच्या काठावर आहे हे पाणी अत्यंत औषधी असून पाण्याला गंधकाचा वास येतो खाजे खुजी व त्वचा रोग ह्या पाण्याने आंघोळ केल्यावर बरे होतात स्नानासाठी नेहमी लोक येतात पण येथे कोणी राहात नाही नवीन हौदपण बांधला आहे

## शिवथर घळ

महाडच्या पूर्वेस सुमारे १'१ मैलावर हे गाव आहे येथे श्रीसमर्थ रामदास स्वामी राहात असत शिवाजी राजे येथे त्यांना भेटण्यासाठी नेहमी येत असत

याच ठिकाणी समर्थांनी दासबोध ग्रंथ लिहिला या ठिकाणी स्वामी समर्थांची समाधी असून त्यांचा संपूर्ण आकाराचा पुतळा आहे हे ठिकाण निवांत व अतिशय रम्य आहे येथील व्यवस्था उत्तम असून रस्ता चांगला आहे

## वरंडोली

रायगडच्या पायथ्याशी असलेले गाव येथून गडावर जाण्याचा जुना रस्ता आहे मराठ्यांच्या भरभराटीच्या काळात अनेक अधिकाऱ्यांची विन्हाडे येथे राहात होती येथील प्रभू देशमुख घराणी प्रसिद्ध आहेत

## दासगाव

महाडच्या पश्चिमेस ५ मैलावर हे लहान गाव असून ऊन पाण्याच्या झऱ्याबद्दल प्रसिद्ध आहे येथे उत्तम नारळाची झाडी आहे प्रवासी नेहमी येथे येतात

## कांगोरी अथवा मंडणगड किल्ला

महाडपासून ११ मैलावर हे ठिकाण आहे सह्याद्रीच्या पठारावर स स पासून २४७५ फूट उंचीवर हा किल्ला आहे डोंगरावर झाडी कमी आहे किल्ल्याचे पठार १४८५ फूट लांब व २६४ फूट रुंद आहे जुने अवशेष शिल्लक नाहीत शिवाजी राजेंनी १६४८ मध्ये जिंकलेल्या ७ किल्ल्यांपैकी हा किल्ला आहे इ स १८१२ ते १८१८ मृत्युपर्यंत साताऱ्याच्या राजाचे बंधू या किल्ल्यावर कैदेत होते

## कोल

महाडपासून सुमारे १ मैलावर आहे या गावी टेकडी मागे २ लहान लेणी आहेत

## कौला किल्ला

महाडपासून उत्तरेकडे १५ मैलावर वरंधा घाटात परमाची खेड्याजवळ स स पासून २१२४ फूट उंच खडकाचा हा किल्ला आहे वर पाण्याची सोय नसून तेथे कोणीही नसते पूर्वी हा किल्ला दक्षिण व कोकण या मधल्या दळणवळणाचे केंद्र होते

## लिंगाणा किल्ला

महाडपासून १४ मैलावर हा किल्ला आहे येथे जुने अवशेष

काही नाहीत हा किल्ला स स पासून २९६९ फूट उंच असून सुमारे ४ मैल पठार आहे

## नाते

हे मोठ्या लोकवस्तीचे व मोठा बाजार असलेले गाव आहे डॉ सी डी देशमुखांचे हे जन्मग्राम सतकवी अनंत महाराज यांची समाधी आहे ज्या ज्या वेळी रायगडावर हल्ले झाले त्या त्या वेळी सैन्याचा तळ नेहमी या गावासच असे, असे सांगतात

## रायगड

**शिवकालीन** महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्याऱ्या महत्त्वाच्या घडामोडी ज्या रायगडावर झाल्या आणि श्रीशिवछत्रपतींनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या राजधानीचा पहिला मान ज्या रायगडाने मिळविला, तोच रायगड कुलाबा जिल्ह्यात गतस्मृतीची आठवण व स्फूर्ती आजही देत आहे

छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या अनेक डोंगरी किल्ल्यात रायगडचे महत्त्व फारच मोठे होते

'रायगड' हे कुलाबा जिल्ह्याचेच नव्हे तर भारताचे एक महान् भूषण आहे

हा किल्ला महाड तालुक्याच्या पूर्व भागी आहे रायगडची उंची स स पासून २८५१ फूट असून माथ्यावर सपाट आहे महाड-पासून जवळच कोंझर या गावाचे वर ९०० फूट उंचीवर पाचाड हे पुरातन गाव रायगडचा पायथा समजले जाते महाड ते पाचाडमधील अंतर ५॥ मैलांचे आहे मुख्य गड या गावापासून पुढेच चढावा लागतो महाड हे शहर पुणे व मुंबईपासून १४० मैल अंतरावर आहे दळण-वळण सारखे चालू असते रायगडच्या पूर्व व पश्चिम बाजूला काळ व गांधारी नद्यांची प्रचंड खोरी आहेत डोंगराच्या रांगेच्या मध्यावर रायगड असल्याने सर्व बाजूंनी सरळ तुटलेल्या कड्याचा रायगडचा प्रचंड सुळका कमळातील कर्णिकेप्रमाणेच आहे हा एक मृत ज्वाला-


सुक्या मच्छीची घाऊक व किरकोळ खरेदी-विक्री करणारी
एकमेव मच्छिमारी संस्था

**आग्राव मच्छिमार वि. का. स. सोसायटी लि. आग्राव**

फोन नंबर रेवदंडा } ४०

**ऑडिट वर्ग 'अ'**

रजिस्टर नं. ७८७४ (७)
स्थापना १७-३-३९

मच्छिमारीकरिता लागणाऱ्या सर्व साहित्य, साळ, डांबर, काथ्या, दोरखड, सूत, गारफील, लोखंडी सामान याचा माफक दराने पुरवठा करून, तालुक्याचे नियंत्रीत साखर, धान्य वगैरे मालाचा वाटप करून आग्राव मच्छिमार बंधूची मनोभावे सेवा करून दिवसेदिवस प्रगतीपथावर चालली असून देशाच्या अधिक मच्छि उत्पादन मोहिमेस हातभार लावीत आहे.

**एम्. इ. फिरफिरे** — सेक्रेटरी
**बी. के पाटील** — व्हा चेअरमन
**ला सु. लोदीखान** — चेअरमन

**HINDUSTAN ORGANIC CHEMICALS LTD.**

( A Govt of India Enterprise )

*Regd Office* P. O. RASAYANI, Dist KOLABA, ( Maharashtra )

**ACETANILIDE**

**An intermediate for production of Sulpha Drugs very commonly used by medical profession is now available Ex-Stock**

**Among other products, which will be very shortly available**

**Meta Amino Phenol, Sulphuric Acid 98%, Oleum, 65%, Oleum 24% Benzene Hexa Chloride and Aniline**

*For particulars please write to :*

Marketing Manager,
**Hindustan Organic Chemicals Ltd.**
Harchandrai House, 1st Floor
81, Maharshi Karve Road, Bombay 2
Phone No 290876





पुरुषार्थ प्रकाशन पनवेल

मुखी आहे सर्व बाजूनी दुर्गम काळ्या दगडाचा प्रचड गड तुटलेल्या कड्यामुळे दुर्गम व अजिंक्य आहे गडाचा माथा अडिच मैल लाब व दीड मैल रुद आहे गडावरील गगासागर तलावाचे पाणी अतिशय रुचकर व चांगले आहे या तलावाच्या काठचे जीर्ण परतु चित्तवेधक बाधणीचे मनोरे बघण्यासारखेच आहेत

रायगडावर काय पाहाल ?

१) जिजामाता समाधी–पाचाड २) जिजामाता वाडा–पाचाड ३) भिमाचे बोट घळ–पाचाड ४) खूबलढा बुरुज ५) चित्त दरवाजा ६) नाना दरवाजा ७) टकमक टोक ८) हिरकणी टोक ९) सभाजीचा मलखाब १०) हत्तीखाना तळे ११) बोर्डाची धर्मशाळा १२) गगासागर तलाव १३) पालखी दरवाजा १४) राण्याचे महाल १५) राणीमहालाची हवा खाण्याची जागा १६) कोषागार १७) पाकशाळा १८) खास महल १९) देव कोठी २०) शिरकाई माता २१) राजसिंहासन २२) नगारखाना २३) राजसभा २४) प्रधानवाडे २५) कुशावर्त तलाव २६) बाजारपेठ २७) श्री जगदिश्वर मदीर २८) श्रीशिवराय समाधी २९) वाघ्याची समाधी ३०) बारा टाकी ३१) भवानीची गुहा ३२) दारूची कोठारे ३३) भवानी टोक ३४) जुने हौद ३५) दिल्ली दरवाजा ३६) थोरला दरवाजा ३७) बुजविलेला दुसरा दरवाजा ३८) गडाचे प्रचड तट

रायगडला गेल्यावर जुन्या ऐतिहासिक गोष्टीचे स्मरण होते व ऊर अभिमानाने भरून येतो येथे आता फक्त स्मृतिचिन्हे दिसत असली तर त्यावरून त्या वेळच्या मराठ्याच्या वैभवाची कल्पना येते

रायगड हे राष्ट्रीय तीर्थक्षेत्र आहे

## कर्जत

**सह्याद्रीच्या** पायथ्याशी मुबई-पुणे लोहमार्गाच्या मध्यावर कर्जत हे महत्त्वाचे स्टेशन आहे हा तालुका कुलाबा जिल्ह्याच्या ईशान्येस आहे उत्तरेला ठाणे जिल्ह्याचा भाग असून पूर्वेला पुणे जिल्हा आहे कोंकण व देश यांचा सुदर मिलाफ येथे झाला आहे

तालुक्याचा पश्चिम भाग डोगराळ व पडीक असून दऱ्याखोऱ्याने समृद्ध आहे भिमाशकर, राजमाची किल्ला व ढाक किल्ला यावरून या गावाचे अवर्णनीय दृश्य दिसते कर्जत हे तालुक्याचे मुख्य ठिकाण आहे

उल्हास नदीमुळे कर्जतला फारच शोभा आली आहे कर्जतची नयनरम्य आमराई तर प्रसिद्धच आहे कर्जत व दहिवली याना जोडणारा पूल व उल्हास नदीचे अडविलेले पाणी कर्जतच्या सौंदर्यात भरच घालतात

पूर्वी कुलाबा जिल्ह्यात कर्जत हे एकच रेल्वे स्टेशन असल्याने या गावची वाढ झपाट्याने झाली गावात मारवाडी पेठ व नवीन पेठ अशा दोनच पेठा आहेत, त्यातूनच सर्व प्रकारची दुकाने आहेत

गावात अनेक धर्म मदिरे आहेत १ मशीद, १ चर्च व हिंदूचे कपालेश्वर मदिर, मारुती मदिर, ग्रामदेव मदिर, दत्त मदिर लक्ष्मीनारायण मदिर, त्र्यबकेश्वर मदिर व जैन मदिर आहे बोहरी प्रार्थना मदिर पण आहे

कर्जतमध्ये महिलामडळे, भजनीमडळे, मराठी वाङ्मय मडळ, पालक सघ अशा निरनिराळ्या सस्था आहेत राष्ट्रीय स्वयसेवक सघातर्फे चालविलेले रुग्णोपयोगी सामानाचे केद्र आहे कर्जत जिमखाना क्लब, बहिःशाल शिक्षण केंद्र, स्काऊट केंद्र वगैरे केंद्रे असून हुमात्मा कोतवाल व्यायाम मदिर पण आहे लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालय आहे

सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील वनश्री व येथील आमराईच्या नयनरम्य दृश्यामुळे सिनेमा क्षेत्रातील लोकाना याचे फारच आकर्षण असते, व त्याचा ते त्याच्या धद्यासाठी उपयोग करून घेतात

कर्जतला महाविद्यालय नाही मराठी मुलाची शाळा, मुलीची शाळा, गुजराथी शाळा, उर्दू शाळा व एक हायस्कूल आहे

तालुक्यात १७० खेडी असून लोकसख्या सुमारे ९५,००० आहे तालुक्यात ११५ प्राथमिक शाळा व ३ हायस्कूल्स आहेत

उद्योगाच्या दृष्टीने येथे पाच भाताच्या गिरण्या, एक बर्फ कारखाना, २ सॉ मिल्स, रुगी उत्पादन केद्र व ३ इजिनियरिंग वर्क्स आहेत

कुलाबा जिल्हा सहकारी बँक व युनायटेड कमर्शियल बँक याच्या शाखा आहेत

आशिया खडात नावाजलेले शेती सशोधन केद्र येथेच आहे

कर्जत येथून दहा मैलावर वैजनाथ येथे स्वयभू शकराचे जागृत स्थान आहे देवळाजवळ एक पाच फूट लांब, ४ फूट रुद व चार फूट खोल, बाराही महिने भरलेले असे गार पाण्याचे कुड आहे हे पाण्याचे कुड म्हणजे स्थापत्य शास्त्राचा एक उत्कृष्ट नमुनाच आहे


आद्य सस्थापक कै रामचद्र भगवान शेट

**दि गोरेगांव को-ऑप. अर्बन बँक लि.**

**गोरेगांव, जि. कुलाबा** स्थापना ३० मार्च १९४९

सुवर्ण महोत्सवी वाटचाल

| | |
|---|---|
| भाग भाडवल व निधी | १,८५,०००–०० |
| ठेवी | १२,००,०००–०० |
| खेळते भाडवल | १४,००,०००–०० |
| गुतवणूक | ४,००,०००–०० |
| कर्ज | १०,००,०००–०० |

१ जानेवारी १९७१ पासून अमलात आलेले नवीन आकर्षक व्याजाचे दर

| मुदत ठेव | व्याजाचे दर |
|---|---|
| ५ वर्षे | ७ टक्के |
| ७ वर्षे | ८ टक्के |
| सेव्हिंग्ज | ४½ टक्के |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात

**ब. बि. जोशी** चेअरमन

**शा. रा. शेट** मॅनेजिंग डायरेक्टर

# PLATO :66:

म्हात्रे उत्पादन

☆

## म्हात्रे पेन ॲण्ड प्लॅस्टिक इंडस्ट्रिज [प्रा.] लि.

तुलसी पाईप रोड, मुंबई २८.

: एकमेव वितरक :

## दि बेस्ट फाउन्टन पेन डेपो

पोस्ट बॉक्स नं. २४२१ मुंबई २.

दहिवली येथे सुदर विठ्ठल मदिर असून या मदिराचे उद्घाटनास सवाई माधवराव पेशवे आले होते

भारतात विकास योजना प्रथम कर्जतला सुरू झाली हे वैशिष्टच होय येथील योजना सफल्यानतर मग भारतात दुसरीकडे विकास योजनाचा प्रसार झाला असे पचवार्षिक योजनेतसुद्धा कर्जतचे वैशिष्टच आहे येथील विकास योजनेत बरीच कार्ये झाली पण 'राजा कालवा' हे सर्वात मोठे कार्य होय या कालव्यामुळे कर्जतचा परिसर सुजलाम सुफलाम झाला आहे या विकासाच्या प्रगतीमुळे सर्वांचे लक्ष इकडे लागून अनेक देशी व विदेशी मोठमोठ्या पाहुण्यानी कर्जतला भेटी दिल्या आहेत

कर्जतच्या आसपास जगल सपत्तीही विपुल आहे या जगलातून वाघ, चित्ते, तरस, कोल्हे, रानडुकरे, या हिंस्र पशुचा व हरणे, चितळे, ससे वगैरे अन्य पशुचा सचार होत असतो या जगलातून फिरणाऱ्याना या पशूचे दर्शन घडते लाकूड, मध, डिंक व औपधी वनस्पतीसुद्धा या जगलातून उपलब्ध होतात

येथून दोन मैलावर जगलात वेणगावजवळ एक प्रसिद्ध जागृत व नवसाला पावणाऱ्या देवीचे देऊळ आहे

तसेच वर्णेच्या जगलात रेल्वेच्या पॉवर हाऊस जवळ पण एक देवीचे देऊळ आहे त्याचे बाजूस मैदानात 'पाडवाचे दगड' म्हणून काही दगड आहेत पाडव येथे उतरले होते असे सागतात

कर्जत पासून नाणेघर नावाचा रस्ता आहे कुलावा, ठाणे, पुणे व नाशिक या जिल्ह्याना जोडणारा हा, पूर्वी फार मोठा चागला राज-मार्ग होता हल्ली हा रस्ता नादुरुस्त आहे हे दळणवळण पुन्हा सुरू व्हावे म्हणून या नाणेघाटाचे काम पुण्याचे प्रख्यात इजिनियर कै व्ही आर् जोशी यानी सुरू केले होते, पण पुढे बद झाले अनेक ऐतिहासिक पुरुषानी व साधुसतानी या घाटातून प्रवास केला आहे

कर्जतची माती लाल असून येथे पाऊसही अफाट आहे या तालु-क्याचे मुख्य पीक भात आहे राजा काल्यामुळे येथील शेतकरी उन्हा-ळ्यात सुद्धा भात पिकवू लागले आहेत येथे दुधाचे मोठे सेटर असून मुबईला नियमित दुध पुरवठा होत असतो

येथून जवळच भिवपुरी गावी टाटा कपनीचे इलेक्ट्रिकचे पॉवर हाऊस आहे

तालुक्यात ४३ ग्रामपचायती असून सबध महाराष्ट्रात आजपर्यंत स्वतःच्या मालकीचे विद्युत केंद्राचे वैशिष्टच असणारी ही एकुलती एकच ग्रुपग्रामपचायत आहे

कर्जत, तालुक्यात औद्योगिक दृष्टीने सर्व सुखसोयी असूनही तो मागासलेला आहे प्रगती केलेली नाही

रोज हजारो माणसे मुबईस कामास जातात, त्यामुळे कर्जत हे मुबईचे जणू उपनगरच आहे असे म्हणावे लागेल

## वेणगाव

कर्जतच्या पूर्वेस ३ मैलावर हे गाव असून हे दुसरे बाजीराव पेशव्याचे दत्तक पुत्र नानासाहेब पेशव्यांचे जन्मग्राम नानासाहेब पेशवे सन १८५७ च्या महान स्वातत्र्य सग्रामाचे सेनापती होते येथे महालक्ष्मीचे मदिर असून नवरात्रात मोठी जत्रा भरते

## अंबिवली

कर्जत पासून १६ मैलावर अबिवली येथे बुद्धकालीन गुहा आहे डोंगराच्या रागेवर व उल्हास नदीच्या वाकड्या वळणावर या गुहा आहेत सध्या जास्त रहदारी नाही

## हुमगाव

कर्जतच्या पूर्वेस ९ मैलावर कुमुरजवळ पानिपतच्या युद्धाचे वीर सदाशिवराव भाऊ याच्या विधवा पत्नीने बाधलेले एक राखीव दगडी बाधकामाचे तळे आहे तळ्याच्या बाजूस एक श्रीशिवाचे व एक मारुतीचे मदिर आहे

## कोंडाणे

कर्जत स्टेशनपासून ४ मैलावर हे गाव असून येथे पुरातन कोरीव लेणी आहेत

## कोंडीवडे

कै राम गणेश गडकरी यांचे जन्मग्राम हे गाव राजमाची किल्ल्याच्या पायथ्याशी आहे या गावात कोरीव लेणी आहेत

## कोताली गड

कर्जत पासून १४ मैलावर पेठ या खेड्याजवळ हा लहान किल्ला आहे

## नेरळ

मध्य रेल्वे वरील हे जक्शन आहे येथूनच माथेरानला रेल्वेने जाण्याची सोय आहे

## तुगी किल्ला

नेरळ स्टेशन पासून १२ मैल पुर्वेकडे स स पासून २०१९ फूट उचीवर हा किल्ला आहे या डोंगराच्या माथ्यावरून भिमाशकरकडे जाण्यास रस्ता आहे डोंगरावर दगडामध्ये काही गाळे आहेत त्याला 'कलावतिणीचा महल' म्हणतात

## माथेरान

भारतातील एक थड हवेचे प्रसिद्ध ठिकाण माथेरान हे कर्जत


महाराष्ट्र वैभव मार्गदर्शक प्रकाशनास शुभेच्छा.

टाईम्स ऑफ इडिया, महाराष्ट्र टाईम्स वगैरे, फ्री प्रेस जनरल, नवशक्ती वगैरे, मराठा, मुबई सकाळ अशा नामवत व अग्रगण्य वृत्तपत्र समुहाचे पनवेलमधील अधिकृत एजट--

**गडकरी ब्रदर्स**

— तसेच —

शालोपयोगी पुस्तके व सर्व प्रकारच्या उपयुक्त स्टेशनरीसाठी

**वसंत स्टोअर्स, शिवाजी रोड, पनवेल-कुलाबा**

महाराष्ट्र वैभव प्रकाशनास हार्दिक शुभेच्छा

# उदय इंडस्ट्रिज

उरणकोट, पो. उरण, जि. कुलाबा

वैशिष्ट्ये :

- सर्वोत्कृष्ट अनोडाईज्ड (प्लेटिंग) ॲल्युमिनियम दरवाजे.
- खिडक्या, टॉवर बोल्टस्, हिंजेस हँडल्स व लॅडर यांचे स्पेशॅलिस्ट.

महाराष्ट्रात प्रथमच निर्मिती करणारे

हरिश्चंद्र आर. भोईर

महाराष्ट्र वैभव प्रकाशनास शुभ शुभेच्छा

अनेक आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विद्वानांनी पसंत केलेले एकमेव दुकान

# शेखर अँड कंपनी

आधुनिक व निरनिराळ्या तऱ्हेच्या मिल्सच्या कापडानी सुसज्ज, जुन्या व सर्व प्रकारच्या नव्या फॅशन्सची उत्कृष्ट शिलाई, वक्तशीरपणा, सौजन्याची वागणूक यामुळे नावाजलेले, अँबॅसिडर्स, जज्ज, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील, कॉंट्रॅक्टर्स, सेल्समन्स, ऑफिसर्स व व्यापारी हे आमच्या वैशिष्ट्यपूर्ण शिवलेल्या सुटामध्ये विशेष आकर्षक दिसतात. पर्यायाने समारंभात व परिवारात ते कौतुकास्पद ठरतात.

* जेन्टस स्पेशॅलिस्ट टेलर्स *

फोन न.
४५३८७२

शेखर अँड कंपनी
९, डॉ. डिसिल्व्हा रोड, दादर, मुबई २८.

तालुक्यातच आहे माथेरानला जाणारी रेल्वे नेरळ स्टेशन (म रेल्वे) वरून सुटते नेरळपासून माथेरान १३ मैल आहे ही रेल्वे म्हणजे प्रवाशांचे एक मोठे आकर्षणच आहे येथे पाऊस फारच असल्याने साधारणपणे जुलै ते डिसेंबर कोणी प्रवासी येत नाहीत पण जानेवारी ते जूनमध्ये फारच रहदारी असते

माथेरान हे उत्तर अक्षांश १८५८ व पूर्व रेखांश ७३ १८ वर एकमेकास लागलेल्या डोंगराच्या तीन रांगावर वसले आहे

उत्तर– दक्षीण टोकामध्ये सुमारे सहा मैलाचे अंतर असून एकदर क्षेत्रफळ सुमारे ८ चौ मैल व घेर १८ मैल आहे माथेरान मधील एकूण रस्ते ४० मैल लांबीचे आहेत या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या नेरळची उंची फक्त ११३ फूट आहे पण माथेरानची उंची स स पासून २६५० फूट आहे येथे गर्द व उंच झाडी असल्याने माथेरानला गिरी निवासस्थानत्व प्राप्त झाले आहे

माथेरानचा हिवाळा असह्य असेल अशी अनेकांची भ्रामक कल्पना होते, पण अनुभवावरून ती सहज दूर होते माथेरानची थंड व कोरडी हवा आरोग्याला पथ्यकर आहे थकवा न येणारी व आल्हाददायक हवा व पाचक पाणी, सर्वत्र स्वच्छता, गर्द झाडी व अप्रतिम सृष्टी सौंदर्य यामुळे येथे येणाराचे मन उल्हसित होऊन जाते माथेरानच्या हवेबद्दल अनेकांनी मुक्त कंठाने स्तुती केली आहे सर्वच अभिप्राय येथे न देता त्यापैकी एक अभिप्राय खाली देत आहो

'सबंध युरोप खंडात माथेरानच्या हवेपेक्षा अधिक सुखकर हवेचे ठिकाण सापडणे कठीण आहे माथेरानची हवा थंड आहे पण अंगास झोंबणारी नाही येथील हवा शांत असून तीत रूक्षणा नाही उंच ठिकाणावरील हवा असून दमछाट न करता उलट उत्साह वाढविते येथील हवा कोरडी, शरीरातील पेशींना बळकटी देणारी व श्रम आणि व्यायाम यांनी अंगात जोम उत्पन्न करणारी आहे या हवेमध्ये कोणत्याही प्रकृतीच्या माणसाला पाहिजे तेव्हढी थंडी व उष्णता मिळू शकते ही सर्व सुखे राजविलासी, श्रीमंत व उद्योगी गरीब अशा सर्वांसही मिळण्याची येथे सुलभता आहे सर्व युरोप खंडात या गोष्टींची विपुलता व उत्कृष्ट मिलाफ असलेले ठिकाण क्वचितच आढळेल'

**टाइम्स ऑफ इंडिया**

चेरापुंजी, महाबळेश्वर नंतर पावसाचा नंबर माथेरानचाच लागेल माथेरानला दरवर्षी सरासरी २०३ इंचावर पाऊस पडतो पावसाळ्यात माथेरान अभ्राच्छादित असून पुष्कळ वेळा जिकडे तिकडे धुकेच पसरलेले असते बाहेर पावसाच्या मोठमोठ्या सरींची सतत धार व धुक्याचे पसरणारे साम्राज्य यामुळे घराबाहेर पडणे बिकट होते पाऊस व धुके घरात येऊ नये म्हणून घराच्या खिडक्या व दारे बंद करणे भाग पडते बंगले तर सर्व बाजूंनी झडचा व पत्रे यांनी आधीच झाकून टाकावे लागतात त्यामुळे दिवसासुद्धा घरात अंधारकोठडीच निर्माण होते

माथेरानला कोणत्याही ऋतूत जा, भरपूर व निरनिराळे सृष्टिसौंदर्य दिसून येईल उन्हाळ्यातील सुखाचा अनुभव सर्वांनाच आहे पावसाळ्यातील ऑगस्ट– सप्टेंबर या महिन्यात फारच बहार असते या काळातले सृष्टिसौंदर्य अवर्णनीयच असते

ज्या ऐतिहासिक काळात सह्याद्रीच्या रायगड, सिंहगड डोंगरास फार महत्त्व प्राप्त झाले, त्यावेळी माथेरानचा डोंगर अज्ञातच राहिला उत्कर्षाची वेळ यावी लागते जे डोंगर मराठेशाहीत प्रमुख किल्ले व राजधान्या बनले तेच इंग्रज राजवटीत मागे पडले व माथेरानसारखा मागे पडलेला डोंगर अतिशय लोकप्रिय होऊन वैभवास चढला व जगद्विख्यात बनला.

खानदेश व ठाण्याचे माजी कलेक्टर मि मॅलेट यानाच माथेरानच्या शोधाचे जनक म्हणावे लागेल त्यांनी १८५१ साली प्रथम आपले व आपल्या मित्राचे बंगले बांधविले व येथे वसाहत सुरू केली. नंतर त्या वेळचे मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड एलफिस्टन यांनी पण बंगला बांधला, त्यामुळे अधिकारी, श्रीमंत व व्यापारी यांचीही गर्दी माथेरानला वाढू लागली

माथेरान डोंगराला इतके महत्त्व येण्याचे कारण, त्याच्या माथ्यावर असणारे रमणीय हिरवे गर्द रान हेच होय येथील झाडी इतकी दाट आहे की एक एकरात सुमारे ४–५ शे झाडे आहेत येथील सर्व वनस्पतींचे वर्णन करणे शक्य नाही, पण काही नावे संक्षिप्त दिली आहेत १) हिरडा, २) कुंवळ ३) पांगळी ४) दिंडा ५) पानफुली ६) कोंबड नखी ७) दगडफूल ८) दुधवेल ९) माकडी १०) रवखत ११) भुता १२) आगासवेल १३) लोखंडी १४) कोकब १५) कारवी १६) पाढरी १७) पिसा १८) शिरडोळी १९) अंजनी २०) जांभूळ २१) चंवेणी २२) रामेठा

येथील झाडांना सरकारी परवानगीशिवाय तोडता येत नाही

जंगलात जंगली जनावरे दिसतात त्याचप्रमाणे माकडे व पक्षी विपुल आहेत

माथेरानची मध प्रसिद्ध आहे

माथेरानला राहणे इतर ठिकाणापेक्षा जास्त महागाईचे आहे

माथेरानला औषधोपचाराची सोय चांगली आहे

येथे रेसकोर्स असून, खेळासाठी जिमखाने आहेत २ चर्चेस, १ मशीद, श्रीराममंदिर, पिसारा नाथ मंदीर व शिवमंदीर

प्रवासी येथे आल्यावर त्यांची हिंडण्याची व प्रेक्षणीय मुख्य ठिकाणे येथील निरनिराळे पॉईंटस् होत मुख्य रस्त्यापासून जरा लांब दोन्ही बाजूंनी तुटक असा डोंगराच्या करवतीच्या दात्यासारखा जो भाग तोच पॉईंट अशा दोन टोकामध्ये मोठी दरी असते तेथून खालचा देखावा चांगला दिसतो, वाराही चांगला वाहतो त्यामुळे पॉईंटवर बसण्याची फारच मजा वाटते निरनिराळ्या पॉईंटवर हिंडणे हाच येथे आलेल्या हौशी प्रवाशांचा मुख्य हेतू असतो माथेरानला असे तेहतीस पॉईंट आहेत त्यांची जुनी नावेच दिली आहेत प्रत्येक पॉईंटवर जाण्यासाठी प्रमुख वाहन घोडे व रिक्षा आहेत

१) **माधवजी पॉईंट**–हा अगदी मध्यवस्तीत मार्केटजवळ रस्त्यालगत आहे यावरून समोर गार्बट पॉईंट व दरी, उजवीकडे कर्जत, पळसदरी, भिवपुरी ही दिसतात

२) **खंडाळा पॉईंट**–वाचनालयासमोर पूर्वेस ५०–६० पावलांवर आहे समोर खंडाळा दिसतो म्हणून हे नाव पडले आहे डावीकडे गार्बट व उजवीकडे अॅलेक्झांडर पॉईंट दिसतात

३ **अलेक्झांडर पॉईंट**–खंडाळा पॉइंटपासून फॉरेस्ट डेपोपर्यंत गेल्यावर डावीकडे माधवजी रोडने गेल्यास अॅलेक्झांडर पॉईंट लागतो. समोर कर्जत, खंडाळा, गार्बट पॉईंट दिसतो येथून खाली कर्जतकडे पायरस्ता गेला आहे

**मॉडर्न बकेट फॅक्टरी**
मु पो **चौक**, जि **कुलाबा**
गॅल्व्हनाईज्ड **नाग छाप** बकेटचे निर्माते
व्यापारी भावासाठी संपर्क साधा

**मे. चंद्रकांत स्वरूपचद कोठारी**
प्रो **सी. एम्. कोठारी**
तावा पितळेच्या व स्टेनलेस स्टीलच्या भाड्याचे व्यापारी
व मनीलेंडर्स

**न्यू प्रकाश भुवन**, मु पो **चौक**, जि **कुलाबा**
सर्व प्रकारचे ताजे फराळाचे जिन्नस थंड पेये मिळतील
मा **गोविंद भाऊशेट साखरे**

उरण, जि **कुलाबा**
**मेहेता क्लॉथ स्टोअर्स** फोन न ५
**बाजारपेठ, उरण**
आमचेकडे सर्व पेठाचे टेरिलिन, टेरिकॉट व फॅन्सी कापड तसेच
सर्व प्रकारच्या साड्या योग्य दरात व मनपसनपूर्वक मिळतील
तसेच रेडिमेड गारमेन्टस् मिळतील

**शुभेच्छा.**
**सदानंद टांकसाळे**

शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी,
**मोठा कृषी पावर टिलर**
एकमेव विक्रेते स्मॅको इजिनियर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स
**विठ्ठल आळी, पनवेल**

**मे. अशोक रेडिओ सर्व्हिस**
**मेनरोड, उरण**
बुश व मर्फी रेडियोचे व ट्रँन्झिस्टसचे अधिकृत विक्रेते तसेच
सर्व प्रकारचे रेडियो व ट्रॅन्झिस्टर खात्रीपूर्वक दुरुस्त केले जातील
प्रो **अशोक रामनाथ गीध**

महाराष्ट्र वैभव प्रकाशनास शुभेच्छा
**कृषी उत्पन्न बाजार समिती**
**सहकार नगर, पनवेल, जि. कुलाबा**
**पो. मु बोराडे** — सचीव.
**अ. आ. खतीब** — अध्यक्ष

**मे. महावीर क्लॉथ स्टोअर्स**
**उरण**, जि **कुलाबा.**
आमचेकडे सर्व प्रकारचे कापड मनपसंत व योग्य दरात मिळेल
बस्त्यासाठी वाखाणलेले एकमेव दुकान आमल्या सर्व गरजा-
साठी भेटा प्रो **ए. एल्. शेट** (गव्हर्नमेंट सप्लायर्स)

**क्षुधा शांती भुवन** फो न २
एम् टी स्टँडजवळ, **उरण**
**कृष्ण भुवन** मच्छिमार्केट जवळ
सर्व प्रकाराचे ताजे व स्वच्छ फराळाचे पदार्थ व थंड पेये मिळतील
प्रो **एस. के. राव**

**सर्वोदय क्लॉथ स्टोअर्स** फो न ५
मच्छिमार्केट जवळ, **उरण**
आमचेकडे सर्व प्रकारचे रेडिमेड कपडे, टेरिकॉट, टेरिलिन
कापड, ९ वारी व ६ वारी साड्या, मॅचिंग ब्लाऊज पिसेस,
पॉपलीन, कोटींग वगैरे सर्व प्रसिद्ध मिलसचे कापड मिळेल

महाराष्ट्र वैभव प्रकाशनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.
**मे. टी. रामचंद्र आणि कपनी**
किराणा मालाचे घाऊक व किरकोळ व्यापारी आणि कमिशन एजट
फोन न २४ मु **लोणेरे, गोरेगाव**, ता **माणगांव**, जि **कुलाबा**

महाराष्ट्र वैभव प्रकाशनास हार्दिक शुभेच्छा.
**'हरिविजय ऑटोमोबाईल्स', 'इडियन ऑईल डीलर' याजकडून.**
सर्व प्रकारचे पेट्रोलियम प्रॉडक्टस्, स्पेअर पार्टस् व स्टॅंडर्ड बॅटरीज याचा योग्य दरात नियमित पुरवठा केला जाईल
आपल्या सेवेस सदैव तत्पर **गोरेगाव, जि. कुलाबा**

"महाराष्ट्र वैभव" मार्गदर्शक प्रकाशनास
**हार्दिक शुभेच्छा.**
डॉ **म. गो. जोशी, पनवेल**

**४) रामबाग पॉईंट**–खालील रामबाग नावाचे दाट झाडीवरून हे नाव पडले येथून खाली उतरण्यास सोपा रस्ता आहे हे वनोपहार स्थळ आहे

**५) लिटल चौक पॉईंट**–अॅलेक्झांडर पॉईंट पासून दीड मैल व चौक पॉईंट पासून अर्धा मैल अंतरावर दोहोंच्या दरम्यान हा पॉईंट आहे डावीकडे रामबाग, अॅलेक्झांडर, खंडाळा हे पॉईंट व उजवीकडे चौक पॉईंट व समोर खोपोली दिसते

**६) चौक पॉईंट**–हा पॉईंट म्हणजे मधल्या रांगेचे अगदी दक्षीण टोक आहे समोर कर्नाळा किल्ला व पनवेल दिसतात व पायथ्याशी चौक गाव दिसते

**७) वन-ट्री-हिल, शिवाजी लँडर, व लायन्स हेड**–ही एकच झाड असलेली टेकडी होय तीवर जाण्यास चांगला मार्ग नाही, इथेने धोक्याची करमणूक करू नये वन-ट्री-हील जवळून खाली चौकला जाण्याचा जो शिडीसारखा उभा रस्ता आहे तोच शिवाजी लँडर होय

**८) मार्जोरिक नूक**–वन-ट्री-हिल पासून २ फर्लांगावर आहे या पॉईंटवरून धावरी नदी व प्रबळगड यांचा देखावा दिसतो

**९) बेलव्हेडर पॉईंट**–येथून प्रबळगड व खालची दरी यांचा देखावा दिसतो

**१०) लॉर्ड पॉईंट**–हा पॉईंट चारलोटी लेक जवळ असल्याने पावसाळ्यात क्षणोक्षणी बदलणारे देखावे येथे दिसतात येथे जवळच पाणी असून झाडीत वनोपहाराची सोय आहे

**११) सेलीया पॉईंट**–तळ्याचे दक्षीण बाजूस व जरा जास्त उंचीवर हा पॉईंट आहे

**१२) किंग जॉर्ज पॉईंट**–याचेजवळ एडवर्ड दी सेव्हथ व एको पॉईंट आहेत प्रवेश द्वारावर एव्हर ग्रीन बंगला आहे डावीकडे चारलोटी लेक, समोर प्रबळगड उजवीकडे लुईसा पॉईंट दिसतात

**१३) एडवर्ड दी सेव्हंथ**–हा तळ्यापासून पाऊण मैलावर असून येथून फारच छान देखावा दिसतो

**१४) एको पॉईंट**–या पॉईंट वरून मोठ्याने बोलले तर प्रतिध्वनी येतो म्हणून यास हे नाव पडले

**१५) लँड स्केप पॉईंट**–एको पॉईंट पासून अर्ध्या मैलावर रस्त्यालगत आहे

**१६) हनीमून पॉईंट**–नावाप्रमाणेच एकांतवासाचा व सृष्टिसौंदर्याने युक्त गर्द झाडीचा असा हा पॉईंट आहे

**१ ) लुईसा पॉईंट व लायनहेड**–पश्चिमेकडील रांगेने हे अगदी दक्षिण टोक असून पोस्ट ऑफिसपासून दोन मैल अंतरावर आहे हा सर्वात जुना पॉईंट आहे येथील एका तुटक टेकड्याचा आकार सिंहाच्यासारखा दिसतो म्हणून यास लायन्सहेड असेही म्हणतात पश्चिमेस प्रबळ, ठाणे जिल्हा, पलीकडे मुंबई व समुद्रातल्या बोटी वगैरे सुंदर नयनरम्य देखावा दिसतो मावळता सूर्य व रात्री मुंबईचे लुकलुकणारे दिवे येथून फारच छान दिसतात


'महाराष्ट्र वैभव'

**मार्गदर्शक प्रकाशनास**

# हार्दिक शुभेच्छा

**मे. टिळक बंधू**

**विश्वकृपा**

**खोपोली, जि. कुलाबा**

१८) **मलंग पॉईंट**–लुईसा पॉईंटच्या उत्तरेस १ मैलावर हा पॉईंट आहे

१९) **कॉरोनेशन पॉईंट**–१९०३ साली सातवे एडवर्ड बादशहाच्या दरबाराचे स्मरणार्थ हे नाव देण्यात आले

२०) **रुस्तुमजी पॉईंट**–येथून मुबईचा देखावा चागला दिसतो

२१) **चीनॉय पॉइंट**–येथून गाढेश्वर, मलगड, चदेरी ही दिसतात

२२ **पार्क्युपाइन पॉइंट**– पश्चिम रांगेचे हे अगदी उत्तर टोक असूनपोस्टापासून दीड मैलावर आहे मावळत्या सूर्याचा देखावा येथून फारच छान दिसतो येथून पनवेलकडे खाली जाण्यास पायरस्ता आहे

२३ **मॅलेट पॉइंट**– येथून मालडुग दरीचा देखावा उत्तम दिसतो

२४ **पेब व २५ मालडुंग पॉईंट**– हे दोन्ही पॉईंट जवळ जवळ आहेत

२६ **मंकी पॉईंट**– एल्फिन्स्टन लॉज वरून गेल्यावर हा पॉइंट लागतो पॅनोरमा पॉईंटला सर्पाप्रमाणे वळसे घालीत येणारी गाडी येथून मजेशीर दिसते

२७ **हार्ट पॉईंट**– हा मकी पॉईंटपासून ४ फर्लांगावर आहे

२८ **मेरी पॉईंट**– हा मकी पॉइंटपासून अर्ध्या मैलावर असून, गर्द झाडीचा एकाताचा व पक्ष्यांचे मधूर गायन ऐकू येणारा असा आहे

२९ **पॅनोरमा पॉईंट**– हा सर्व पॉईंटचा राजा समजला जातो पोस्टापासून तीन मैलावर आहे येथून करजे बदर, मुबई, घारापुरी, तुगी, कल्याण खाडी, बाबा मलग डोंगराचा उभा सुळका, प्रवळ, हरिश्चद्र गड, कळसुबाई, भीमाशकर, नागफणी ही दिसतात मावळता सूर्य, मुबईतील दिव्याची शोभा, वगैरे देखावा ह्या पॉईंटचे नाम सार्थ करणारा असाच आहे

३० **माऊंट बॅरी**– दस्तूरीपासून दीड फर्लांगावर उच असा हा पॉइंट आहे येथून नेरळ ते माथेरान रस्त्याचा सर्व देखावा दिसतो

३१ **गार्बेट**– दक्षीण टोकाला पोस्टापासून तीन मैलावर हा पॉईंट आहे येथून पुण्या–मुबईकडे जाणाऱ्या गाड्या व कर्जत खडाळा रेल्वे स्टेशन दिसतात

—**बिट्राईस क्लिफ**– येथून उत्तम देखावा दिसतो

३२ **मायरा पॉईंट**– या पॉईंटवरून समोर गार्बेट पॉईंट व उजवीकडे खडाळा पॉईंट दिसतो

३३ **आर्टिस्ट पॉईंट**– येथून नयन मनोहर विशाल सृष्टीसौदर्य दिसते

माथेरानला येणाऱ्या प्रवाशास सर्व प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध आहेत निवासाची व भोजनाची उत्तम सोय आहे मध्यमवर्गीयाना किवा प्रकृतीस्वास्थाकरिता येणाऱ्या लोकास जास्त दिवस राहावयाचे असेल तर आरोग्यभुवनात त्यांची सोय होऊ शकते अशी अनेक आरोग्यभुवने सपूर्ण सोयीनी सुसज्ज आहेत

माथेरान आपले सहर्ष सुस्वागतच करील !

# समालोचन

**ह्या** जिल्ह्याला ऐतिहासिक, भौगोलिक साहित्यिक, धार्मिक, पौराणिक, औद्योगिक, परपरा असून, अप्रतिम नैसर्गिक सृष्टिसौदर्य, अथांग सिंधूसागराचे सान्निध्य, अनेक देवदेवताच्या सर्व धर्ममदिराचे अस्तित्व हे जिल्ह्याचे वैशिष्टचच होय

हिंदवी सुस्वराज्याची स्थापना करणाऱ्या छत्रपती श्रीशिवाजी महाराजाची राजधानी व कर्मभूमी केंद्र हा जिल्हा असून, १८५७ च्या स्वातत्र्य युद्धाचे सरसेनानी नानासाहेब पेशवे व वासुदेव बळवत फडके याच्यासारखे महान क्रातीकारक, प पू समर्थ रामदासस्वामी आ प पू आचार्य विनोबा भावे याच्यासारखे थोर राष्ट्रसत, नर तानाजी मालुसरे, येसाजी कक, नेताजी पालकरासारखे शूर सेनानी, कान्होजी आग्र्यासारखे दर्यासरखेल, पेशव्यासारखे एकनिष्ठ प्रधान, रामगणेश गडकऱ्यासारखे प्रति कालीदास, समर्थांचा दासबोध, आचार्यांची गीताई, गडकऱ्याचे अलकृत नाटच, ठाकूर याचेसारखा भारतातील पहिला आय् सी एस् अधिकारी, प्रकांड पडित व महान इतिहासतज्ञ श्री दत्तो वामन पोतदार, महाराष्ट्रासाठी नेहरू सरकारच्या मत्तेचा त्याग करणारे, जागतिक कीर्तीचे, थोर, जगन्मान्य अर्थतज्ञ व महान विद्वान, डॉ चितामणराव देशमुख भारतीय घटनेचे शिल्पकार व दलितोद्धारक, डॉ बाबासाहेब आबेडकर याच्या महान चळवळीचा श्रीगणेशा, अनेक राजकारण धुरधर, शिवाय, सह्याद्रीच्या अनेक किल्ल्याच्या कड्याकोपऱ्यातून युद्ध खेळलेले रक्त व सागरावर चालविलेल्या सत्तेचे नसानसातून वाहणारे शौर्याचे वारे या जिल्ह्याने महाराष्ट्रालाच काय, पर्यायी भारताला दिले

अशीच अखड तेजस्वी परपरा हा जिल्हा यापुढेही ठेवीलच, अशी सर्वांगीण महान् पार्श्वभूमी या जिल्ह्याची असताना आणखी,

काय वर्णू महिमा तिचा हो !

जय कलाबा, जय महाराष्ट्र, जयहिंद, ! ! !

REFBK-0022618